# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार १९ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०




## चकमकीत 6 नक्षलवादी ठार

**रायपूर/वृत्तसंस्था :** छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यात सुरक्षा कर्मचारी आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत सहा नक्षलवादी ठार झाले. अबुझमद परिसरातील जंगलात नक्षलवाद्यांचा समावेश



असल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाल्यानंतर शोध मोहीम सुरू करण्यात आली. शुक्रवारी छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यात सुरक्षा कर्मचा-यांशी झालेल्या चकमकीत सहा नक्षलवादी ठार झाले. सुरक्षा दलांना अबुझमद परिसरातील जंगलात नक्षलवादी असल्याची माहिती मिळाली.यानंतर दुपारी शोध मोहीम सुरू झाली. आतापर्यंत चकमकीच्या ठिकाणाहून सहा माओवाद्यांचे मृतदेह, एके-४७/एसएलआर रायफल, इतर शस्त्रे, स्फोटके आणि दैनंदिन वापराच्या वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई अजूनही सुरू आहे. झारखंडमध्ये सेंट्रल कोलफील्ड्स लिमिटेडच्या एका कर्मचा-याकडून एक कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. या धमकीमागे भाकपाच्या (माओवादी) कोयल-शंख झोन कमिटीचं नाव समोर आलं होतं. आता पोलिसांनी या प्रकरणात चार कुख्यात नक्षलवाद्यांना अटक केली आहे. या नक्षलवाद्यांमध्ये योगेंद्र गंझू उर्फ पवन गंझू या अत्यंत क्रूर नक्षलवाद्याचाही समावेश आहे. याने एका जवानाच्या हौतात्म्यानंतर त्याचं पोट फाडून बाम्ब पेरण्याचं क्रूर कृत्य केलं होतं.

## पनवेलमध्ये सापडले तबल 35 कोटींचे ड्रग्ज!

### एका नायजेरियन महिलेला अटक

**पनवेल:** नवी मुंबईतील पनवेल रेल्वे स्टेशन सारख्या गजबजलेल्या ठिकाणांहून तब्बल ३५ कोटींच्या ड्रग्जचा माल सापडल्यानं खळबळ उडाली आहे. पनवेल रेल्वे स्टेशनवर बेंगळुरु मधील नारकोटिक्स नियंत्रण विभागाने (NCB) केलेल्या संयुक्त कारवाईत तब्बल ३५ कोटी रुपयांचे तब्बल साडेतीन किलो 'मेथ' ड्रग्ज जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी एका नायजेरियन महिलेला अटक करण्यात आली असून, पुढील तपास रेल्वे पोलीस आणि ग़क्ए एकत्रितपणे करत आहेत. ही कारवाई विशेषत? रेल्वे मार्गांचा गैरवापर करून ड्रग्ज वाहतूक करणा-या टोळ्यांविरुद्ध एक मोठा झटका मानला जात आहे.ग़क्ए व रेल्वे पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत असून, या नायजेरियन महिलेमार्फत कोणत्या टोळीशी संपर्क आहे, ही ड्रग्ज कुठून आणली गेली आणि कुठे पोहोचवायची होती, याचा शोध घेतला जात आहे.बेंगळुरु ग़क्एच्या गुप्त माहितीच्या आधारे, मंगला एक्सप्रेस या रेल्वेने प्रवास करणा-या महिलेवर लक्ष ठेवण्यात आले होते. संबंधित महिला पनवेल स्थानकावर पोहोचताच, ग़क्ए आणि पनवेल रेल्वे पोलीस यांच्या पथकाने तिला अटक केली. तिच्याकडून 'मेथाम्फेटामाइन' हा अत्यंत घातक आणि व्यसनाधीन बनवणारा पदार्थ सापडला. हे ड्रग्ज साडेतीन किलो वजनाचे असून, आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत सुमारे ३५ कोटी रुपये असल्याचे प्राथमिक अंदाज आहेत. सध्या जप्त करण्यात आलेले ड्रग्ज रेल्वे सुरक्षा दलाच्या (RPF) iाब्यात देण्यात आले आहे. तसेच आरोपी महिलेला न्यायालयात हजर करून पोलीस कोठडी घेण्यात आली आहे.

## अतिरिक्त दबावाला कंटाळून बँक ऑफ बडोदाच्या मॅनेजरची आत्महत्या

**पुणे:** बारामती शहरात गुरु वारी संध्याकाळी एका आत्महत्येच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. ती घटना म्हणजे, भिगवण परिसरात गुरूवारी मध्यरात्री बँक ऑफ बडोदामध्ये मुख्य प्रबंधक म्हणून पदभार संभाळणारे शिवशंकर मित्रा यांनी बँकेतच गळफास लावून आपले आयुष्य संपवले आहे. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनि सुसाईड नोट देखील लिहिली होती. ज्यात त्यांनी कामाच्या अतिरिक्त दबावाला कंटाळून हा निर्णय घेत असल्याचे म्हंटले होते. बँक मॅनेजर हे पद अतिमहत्वाचे आणि प्रतिष्ठेचे मानले जाते. चांगली नोकरी, चांगला पगार आणि सन्माननीय वागणूक मिळत असतानाही शिवशंकर मित्रा यांनी आत्महत्येचा निर्णय घेतल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. कामाचा भार असह्य झाल्यामुळे मानसिक नैराश्य येउन आतापर्यंत अनेकांनी आत्महत्येचा निर्णय घेतलेला आहे.

# पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले




**8 डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशन**

**मुंबई/प्रतिनिधी :** गोंधळ, गदारोळ, सभात्याग, सत्ताधारी-विरोधक आमने-सामने, हाणामारी या आणि अशा विविध घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अखेर राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन आज सूप वाजले. आता विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार, ८ डिसेंबर रोजी नागपुरात होणार आहे, अशी घोषणा विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली.राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना हिवाळी अधिवेशनाच्या तारखेबद्दलचा प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. तारांचा राज्यपालांनी दिलेल्या संदेशानुसार पावसाळी अधिवेशन स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा नार्वेकर यांनी केली.

अधिवेशनात झालेल्या कामकाजाचा आढावा सांगताना ते म्हणाले, या काळात एकूण १५ बैठका झाल्या आणि एकुण १३३ तास ४८ मिनिचे कामकाज झाले, तर ४५ मिनिटे वेळ वाया गेली. यात दिवसाचे सरासरी कामकाज ८ तास ५५ मिनिटे झाले. यामध्ये एक अभिनंदन प्रस्ताव, सात शोक प्रस्ताव, ८२७७ तारांकित प्रश्न, स्विकृत प्रश्न ५७९, उत्तरित झालेले प्रश्न ९२, प्राप्त सूचना ८, अस्विकृत सूचना ८, चर्चा ७, सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर प्राप्त सूचना १८१, मान्य सूचना ४२, त्यातील केवळ पाच विषयांवर चर्चा झाली. विधानसभेत १४ शासकीय विधेयके सादर झाली. १५ विधेयकांवर सहमती झाली, तर एक मागे घेण्यात आले. आमदारांकडून २४८१ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या, त्यातील ५११ स्विकृत सूचना करून १५२ सूचनांवर प्रत्यक्ष चर्चा झाली.

## महाराष्ट्र मराठी माणसाच्या बापाचाच!

### आता दुकाने नाही शाळाच बंद करेन-राज ठाकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठीच्या मुद्द्यावरून निघालेल्या मोर्च्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे मीरा भाईंदरमध्ये पोहोचले आहेत. मीरा रोड येथील मनसे शाखेच्या उद्घाटनानंतर आयोजित करण्यात आलेल्या सभेला राज ठाकरेंनी संबोधित केले. दुकाने बंद करून किती काळ राहणार आहात, असा सवाल राज ठाकरेंनी मीरा रोड येथील व्यापा-यांना दिला. यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही यावेळी राज ठाकरेंनी निशाणा साधला. इतर शाळांमध्ये आज मराठी सक्तीची केली पाहिजे असं राज ठाकरेंनी म्हटलं.



'कानावर मराठी समजत नसेल तर कानावर बसणारच. विनाकारण काहीतरी काढत असतात. इथल्या व्यापा-यांनी बंद पुकारला. तुमच्या कानाखाली मारली होती का? अजून मारलेली नाही. विषय समजून न घेता कुठल्यातरी राजकीय पक्षाचा दबावाखाली येउन तुम्ही असे बंद करणार असाल तुम्हाला काय वाटलं मराठी व्यापारी नाहीत का. दुकाने बंद करून किती काळ राहणार आहात. आम्ही काहीतरी घेतलं तरच तुमचं दुकान चालणार आहे. महाराष्ट्रामध्ये राहताय शांतपणे राहा. मराठी शिका, आमचं तुमच्याशी काही भांडण नाहीये. पण इथे मस्ती करणार असेल तर महाराष्ट्राचा दणका बसणारच,' असा इशारा राज ठाकरेंनी दिला. 'पहिली ते पाचवी हिंदी भाषा शिकली पाहिजे याच्यावरून हे सर्व सुरू झालं. काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, तिसरी हिंदी भाषा आम्ही सक्तीची करणार म्हणजे करणारच. आता राज्य सरकारला आत्महत्या

(पान २ वर)

## निवडणूक जाहीर झाल्यावर राज ठाकरेंसोबत चर्चा करणार

### ■ उद्धव ठाकरेंचे महत्त्वाचे विधान ■

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठीच्या मुद्द्यावरुन एकत्र आल्यानंतर आता उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे महापालिका निवडणुकांसाठी कोणती रणनिती आखणार याकडे सर्वांचेच लक्ष लागलं आहे. एकीकडे वरळीच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांनी एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो आहोत असं म्हटलं होतं. दुसरीकडे राज ठाकरेंनी याबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका घेतली नाही. मात्र दोन्ही पक्षातील नेते आणि पदाधिकारी निवडणुकीसाठी एकत्र येण्यासाठी सहमत आहेत.



अशातच उद्धव ठाकरे यांनी निवडणुकीच्या संदर्भात महत्त्वाचे विधान केलं आहे.हिंदी सक्तीच्या विरोधात अनेक वर्षांनंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकाच व्यासपीठावर एकत्र आले होते. राज्य सरकारने त्रिभाषा सुत्राचा निर्णय मागे घेतल्यानंतर ठाकरे बंधूंनी विजयी सभा घेतली. यावेळी उद्धव ठाकरेंनी एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठी असं सूचक वक्तव्य केलं होतं. त्यानंतर आता पुन्हा एकदा निवडणुकीच्या संदर्भात उद्धव ठाकरेंनी भाष्य केलं. निवडणूक जाहीर झाल्यावर राज ठाकरेंसोबत चर्चा करणार असल्याचे उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

(पान २ वर)

## जातीचे फसवे प्रमाणपत्र रद्द होणार

### विधान परिषदेत फडणवीसांची मोठी घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा लाभ केवळ हिंदू, बौद्ध आणि शीख धर्मीयांनाच मिळू शकतो. इतर धर्मीयांनी चुकीच्या पद्धतीने अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळवले असेल तर अशा प्रकरणात संबंधितांचे प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत म्हटले. शिवाय, कोणाचेही जबरदस्तीने धर्मांतर करता येणार नाही, याची तरतूद करू असे आश्वासनही त्यांनी दिले. विधान परिषद सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले की ख्रिश्चन धर्म स्वीकारणा-यांना अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देणे घटनेला धरून नाही. केवळ हिंदू, बौद्ध आणि शीख धर्मीयांनाच जातीचे प्रमाणपत्र मिळू शकते. अन्य धर्मीय त्यासाठी पात्र नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने २६ नोव्हेंबर २०२४ रोजी स्पष्ट केले आहे असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

पुढे फडणवीस म्हणाले की जर कोणी




चुकीच्या पद्धतीने जातीचे प्रमाणपत्र मिळवले असतील तर संबंधितांचे प्रमाणपत्र रद्द करण्यात येतील. शिवाय, जातीच्या

(पान २ वर)

## मराठा तरूणांना आदिवासी प्रमाणपत्राचे वाटप

### विभाग उपायुक्तांचे थेट विधानसभेतून निलंबन

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी काही दिवसांपूर्वी दिव्यांग आयुक्तांचे थेट विधानसभेतून निलंबन केले होते. आमदारांचा फोन न उचलणे, तसेच एका शिक्षण संस्थेबाबत सातत्याने तक्रारी असूनही कारवाई न केल्याने त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली होती. आता, आदिवासी विभागातील उपायुक्त संगीता चव्हाण यांचे निलंबन करण्यात आले आहे. संगीता चव्हाण यांनी मराठा समाजातील तरुणांना आदिवासी प्रमाणपत्र दिले होते, त्यामुळे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली असून याबाबत अधिवेशनात घोषणा देखील करण्यात आली.

(पान २ वर)




## काल युद्धाचा इशारा, आज राजधानी सोडून पळून गेले

### सिरियाचे राष्ट्राध्यक्ष अल-शारांचा अजब कारभार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सीरियाचेराष्ट्राध्यक्ष अहमद अल शरा आणि संरक्षण मंत्री त्यांच्या कुटुंबीयांसह राजधानी दमास्कसमधून पळून गेल्याचे वृत्त आहे. अल मायादीन वृत्तपत्राने सरकारी सूत्रांचा हवाला देउन हा दावा केला आहे. अल शारा यांनी कालच सिरियाशी युद्धाची भाषा केली होती. पण आज मात्र सीरियाच्या सैन्याने ड्रुझ समुदायाचे प्राबल्य असलेल्या स्वेदा प्रांतावर ताबा मिळवला असताना, अल शारा यांनी पळ काढल्याचे वृत्त समोर आले आहे. वृत्तपत्रानुसार, अल शारा आणि त्याचे कुटुंब इदबिबला रवाना झाले आहेत. सीरियातील इदबिब शहर हे तुर्कीच्या सीमेजवळ आहे. तर संरक्षणमंत्री कुठे गेले, याची माहिती मिळालेली नाही.



**तुर्कीने २ दिवसांपूर्वी दिला होता सल्ला-**१६ जुलैला जेव्हा इस्रायलाने दमास्कसमधील संरक्षण मंत्रालय आणि सीरियन लष्कराच्या मुख्यालयावर हल्ला केला, तेव्हा तुर्कीने सीरियन राष्ट्राध्यक्षांना तात्काळ राष्ट्रपती भवन सोडण्याचा सल्ला दिला होता. टार्गेट किलिंगचा मुद्दा लक्षात आणून देत त्यांना हा सल्ला देण्यात आला होता. अहमद अल शरा इस्रायलच्या रडारवर आहेत. इस्रायलच्या अंतर्गत सुरक्षा मंत्र्यांनी हमास कमांडरसारखीच अल शारा यांची हत्या करू अशी घोषणा केली आहे. तसेच, इस्रायली सैन्याने १६ जुलै रोजी अहमद अल शारा यांच्या घराजवळ क्षेपणास्त्र हल्ला देखील केला होता.

## बँकांमध्ये 36 हजार कोटींची फसवणूक

**नागपूर/प्रतिनिधी :** आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये देशातील विविध बँकांमध्ये ३६,३६१ कोटी रुपयांची १.७९ लाख फसवणुकीच्या प्रकरणांची नोंद झाल्याची माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेने दिली आहे. अभय कोलारकर यांनी माहिती अधिकार (आरटीआय) अंतर्गत दाखल केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात ही धक्कादायक माहिती रिझर्व्ह बँकेने उघड केली. ही आकडेवारी भारताच्या बँकिंग व्यवस्थेतील असुरक्षितता दर्शविते. आर्थिक फसवणूक थांबविण्यासाठी कठोर नियामक देखरेख आणि बँकांचे




रिअल-टाइम ऑडिट करण्याची आवश्यकता असल्याचे कोलारकर म्हणाले.

गत आर्थिक वर्षात देशातील आघाडीच्या बँकांमध्ये ॲक्सिस बँकेत ७९,६२९ प्रकरणांमध्ये ९८६.४६ कोटींची फसवणूक झाली. एचडीएफसी बँक लिमिटेडमध्ये ३९,८२२ प्रकरणांमध्ये ७१५.९६ कोटी, एअरटेल पेमेंट्स बँक लिमिटेड १९,८३८ प्रकरणांमध्ये ७५.२६ कोटी, आयसीआयसीआय बँक लिमिटेड १३,५३२ प्रकरणे ६०८.९४ कोटी आणि आरबीएल बँक लिमिटेड ८,६१० प्रकरणांमध्ये ६८.२७ कोटींची फसवणूक झाल्याची नोंद आहे.आघाडीच्या बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) १३,८३५ प्रकरणांमध्ये ७,७००.४४ कोटी, आयडीबीआय बँक

(पान २ वर)

## घुसखोरांवर कारवाई केली जाईल

### भाजप कोणताही कट यशस्वी होऊ देणार नाही, ही मोदींची हमी

**दुर्गापूर/ वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी पश्चिम बंगालमधील दुर्गापूर येथे सांगितले- तृणमूल काँग्रेसने स्वतःच्या स्वार्थासाठी बंगालमध्ये घुसखोरीला प्रोत्साहन दिले. यासाठी एक परिसंस्था तयार केली जात आहे. हे राज्य, देश आणि बंगाली संस्कृतीसाठी धोका आहे.ते पुढे म्हणाले- घुसखोरांच्या बाजूने टीएमसीने एक नवीन मोहीम सुरू केली आहे. मी स्पष्टपणे सांगतो- जे भारताचे नागरिक नाहीत आणि घुसखोरी केली आहे त्यांच्यावर संविधानानुसार कारवाई केली जाईल. भाजप बंगालविरुद्धचे षड्यंत्र यशस्वी होउ देणार नाही, ही मोदींची हमी आहे.

पंतप्रधान मोदींनी दुर्गापूरमध्ये ५००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. यामध्ये तेल, वायू, वीज, रस्ते आणि रेल्वेशी संबंधित अनेक विकास प्रकल्पांचा समावेश आहे. दुर्गापूर हे बंगालच्या पश्चिम वर्धमान जिल्ह्यातील एक शहर आहे. पुढील



वर्षी राज्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत. २०२५ मध्ये मोदींचा हा पश्चिम बंगालचा दुसरा दौरा आहे. यापूर्वी त्यांनी २९ आणि ३० मे रोजी पश्चिम बंगालला भेट दिली होती. अलीपुरद्वार आणि कूचबिहार येथे प्रकल्पांची पायाभरणी करण्यात आली. मुर्शिदाबाद घटनेत पोलिसांनी काहीही केले नाही: बंगालमध्ये मुर्शिदाबादसारखी घटना घडली आहे. एक खून होतो आणि पोलिसांनी काहीही केले नाही. जर येथील राज्य सरकार जीवित आणि दुकानांचे रक्षण करू शकत नसेल तर गुंतवणूकदारांनाही काळजी वाटते. बंगालमधील रुग्णालये सुरक्षित नाहीतः आज बंगालमधील रुग्णालयेही सुरक्षित नाहीत. जेव्हा एका ड?क्टर मुलीवर अत्याचार झाला, तेव्हा तृणमूल काँग्रेस सरकार गुन्हेगाराला वाचवण्यात व्यस्त होते. देश यातून सावरला नाही आणि दुस-या महाविद्यालयात एका मुलीवर अत्याचार झाला. या प्रकरणात तृणमूल काँग्रेसचे नेते आरोपींना वाचवण्यात व्यस्त आहेत. बंगालच्या विकासाच्या मार्गात तृणमूल काँग्रेस सरकार अडथळाः बंगालच्या विकासाच्या मार्गात तृणमूल काँग्रेस सरकार भिंतीसारखे उभे आहे. ज्या दिवशी तृणमूल काँग्रेसची भिंत पडेल, त्या दिवशी बंगाल विकासाची गती पकडेल. खरा

(पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# २१ शिवभक्तांचा जत्था बैद्यनाथधामासाठी रवाना

## ३५ वर्षांपासून परतवाडा कावड संघाकडून महादेवाची अखंड आराधना

**अचलपूर/प्रतिनिधीः-** श्रावण मासात भगवान शिवाच्या चरणी जलाभिषेक करण्यासाठी परतवाडा कावड संघाचा एक उत्साही शिवभक्तांचा जत्था आज गुरुवारी झारखंड राज्यातील बैद्यनाथधाम (देवघर) येथे रवाना झाला. 'बोल बम'च्या घोषणांनी आसमंत दुमदुमत असताना एक विशेष बसमधून २१ शिवभक्तांनी महादेवाच्या दर्शनासाठी प्रस्थान केलं. प्रस्थानापूर्वी सर्व भक्तांनी परतवाड्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात स्थित भक्तराज हनुमान मंदिरात पूजा-अर्चा केली. शहरातील प्रसिद्ध गोपाल अँड गोपाल फर्मचे संचालक भीकुलाल तिवारी यांनी सर्व भक्तांना तिलक लावून, पुष्पमाला अर्पण करून मंगलमय यात्रेची शुभेच्छा दिल्या.



परतवाडा कावड संघ मगील ३५ वर्षांपासून अखंडपणे ही कावड यात्रा आयोजित करत आहे. संस्थापक सदस्यांमध्ये विजयकुमार मामराज अग्रवाल व स्व. विजय जैस्वाल (हॉटेल द्वारका) यांचे मोलाचे योगदान आहे. जत्था आज इटारसी पोहचेल, तेथून रेल्वेने बिहारच्या सुलतानगंज येथे पोहचून गंगाजल घेत झारखंडातील देवघर जिल्ह्यातील बैद्यनाथधाम येथे १२० किमीची पदयात्रा सुरू करेल. यात्रेदरम्यान सर्व शिवभक्त पांढरे वस्त्र परिधान करून, कावड नियमांचे पालन करत यात्रेस प्रारंभ करतील.

**यात्रेचा विश्राम आणि नियोजन-**

१ रात्रः तारापूर, २ रात्रः जलेबिया मोड, ३ रात्रः बोल बम सेवा समिती, ४ रात्रः गुडियारी.

२३ जुलै रोजी सर्व शिवभक्त बैद्यनाथधाममध्ये प्रवेश करून महादेवाचे जलाभिषेक करतील. २४ जुलैला सर्व भक्त काशी विश्वनाथाच्या दर्शनासाठी वाराणसीकडे रवाना होतील. तेथून २६ जुलै रोजी संघमित्रा एक्सप्रेसने परत परतवाडाकडे प्रस्थान करतील.

पूर्ण यात्रेच्या भोजन व विश्रांती व्यवस्थेसाठी भागलपूर येथील गांधी केटरर्स यांच्याकडून सेवा दिली जाते. यात्रेचे नियोजन गुरु घनश्याम अग्रवाल (मिर्चीवाले) यांच्या नेतृत्वाखाली होत असून बोल बम प्रधान सेवक लड्डू उर्फ वैभव बंसल (हिंदुस्तान पेट्रोलियम डीलर) संपूर्ण यात्रेची देखरेख करत आहेत.

**कडक नियम आणि भक्तीमय शिस्त-**

कावड यात्रेदरम्यान शिवभक्त कडक नियमांचे पालन करतात. दीर्घशंका किंवा लघुशंका झाल्यानंतर भक्तांनी पुन्हा स्नान करूनच कावड पुन्हा खांद्यावर घ्यावी लागते. प्रवासादरम्यान फक्त संध्याकाळीच अन्न ग्रहण केले जाते. कावड मार्गावर असलेल्या हॉटेल-ढाब्यांवर स्नानासाठी शॉवरची सोय केली जाते. ही यात्रा शिस्त, भक्ती व तपश्चर्येचे प्रतीक बनली आहे.



**या वर्षीच्या जत्थ्याचे प्रमुख सहभागी-**

घन्नु उर्फ घनश्याम अग्रवाल, लड्डू उर्फ वैभव बंसल, संतोष दीक्षित, संजू उदापुरकर, संजय कूटे (कार्यकारी अभियंता - महावितरण), संजय चौधरी (सहाय्यक अभियंता - महावितरण), नंदू गुल्हाने, नरेश लोखंडे, जगदीश तिवारी, अमित बाजपेयी, राजा मिश्रा, सुनील वरयानी, श्याम हरचंदानी, मुकेश जाजू, उपेंद्र ओझा, मनोज वडस्कर, अतुल काजे, नीलेश खंडेझोड, गजानन गायकवाड, पप्पू महाराज पुरोहित, मनीष गणोरकर, संदीप पणढोले.

**बोल बम' म्हणजे काय?-** 'बोल बम' हा भगवान शिवाच्या भक्तांचा पवित्र जयघोष आहे. 'बोल' म्हणजे उच्चारण आणि 'बम' म्हणजे महादेवाचे रूप. हा नारा भक्तांमध्ये उत्साह, एकात्मता आणि आध्यात्मिक ऊर्जा निर्माण करतो. यात्रेदरम्यान हा नारा भक्तांच्या ओठांवर असतो आणि त्यांच्या श्रद्धेचा आवाज बनतो.

**बैद्यनाथधामचे महत्त्व आणि कथा-**

झारखंड राज्यातील देवघर जिल्ह्यातील बैद्यनाथ ज्योतिर्लिंग हे भगवान शिवाचे १२ पवित्र ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. पौराणिक कथेनुसार रावणाने भगवान शिवाची प्रसन्नता मिळवण्यासाठी स्वतःचे नऊ शिर अर्पण केले आणि दहावे अर्पण करण्याआधीच शिव प्रकट झाले. त्यांनी रावणाला आत्मलिंग दिले आणि सांगितले की ते पृथ्वीवर ठेवले गेले, की तिथेच स्थिर राहील. रावणाच्या वेदना शांत करण्यासाठी शिव वैद्यरूपाने प्रकट झाले, म्हणून या स्थळाला बैद्यनाथ म्हणतात.

# शेंदोळा येथे वृद्धाची आत्महत्या

**अमरावती/प्रतिनिधीः-नांदगाव पेठ पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या शेंदुळा बुद्रुक मध्ये राहणाऱ्या वृद्धाने आपल्याच घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना (दि.१८) आज दुपारी उघडकीस आली. रामराव बाबुराव चव्हाण (वय ५४,रा. शेंदोळा) असे मृतकाचे नाव आहे. माहितीनुसार मृतक रामराव चव्हाणला दारूचे व्यसन होते. तो नेहमी कुटुंबीयांना दारू पिण्यासाठी पैसे मागत होता. पैसे नाही दिले तर फाशी घेण्याबाबत म्हणत होता. गुरुवारी दुपारी रामरावची पत्नी अमरावती जाण्यासाठी नांदगाव पेठ बस स्टॉप वर आली होती. ती बसची वाट पाहत होती. त्यावेळी तिला काही लोकांकडून माहिती पडले की रामराव चव्हाण यांनी फाशी घेतली. यामुळे ती घरी गेली. घरात जाऊन पाहिले असता रामराव चव्हाण यांनी समोरच्या रूममध्ये टिनाचे लाकडी नाटेला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतला होता. हे पाहून पत्नीला धक्का बसला. तिने नांदगाव पेठ पोलिसांना घटनाची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टम साठी पाठवला. पत्नीच्या माहितीवरून पोलिसांनी कलम १९४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.**

# घरकुल धारकांना घरपोच मिळावी पाच ब्रास रेती

## क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाने घरकुल धारकांना पाच ब्रास रेती घरपोच देण्याची घोषणा विधिमंडळात केली होती,तरीपण घरकुल धारकांना रेती मिळत नाही. या निर्णयावर जिल्ह्यात लवकरात लवकर अमल करण्याची मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेने आज शुक्रवारी १८ जुलै रोजी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केलेली आहे. निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील धामणगाव तालुक्यामध्ये मंगरूळ दस्तगीर परिसरातील गोकुळसरा, न्यायगाव दिघी व इतर घाटांवर रेती तस्कर अवैध रेती तस्करी करत आहे.



हे स्थानिक प्रशासनाला माहीत असून यावर कार्यवाही नाही होत. रेती तस्करांना महसूल विभागाचे अधिकारी प्राधान्य देत आहे. मग घरकुलधारकांना पाच ब्रास रेती का नाही मिळाली. जर ८ दिवसात घरकुल धारकांना पाच ब्रास रेती घरपोच मिळाली नाही तसेच मंगरूळ दस्तगीर परिसरातील गोकुळसरा, नायगांव ,दिघी या रेती घाटावर तस्करी करण्याबाबत कार्यवाही नाही झाली तर आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयावर घरकुल धारकांना घेऊन आक्रमक आंदोलन करू असा इशारा देण्यात आला. निवेदन देतेवेळी कपिल पडघन, अंकुश ढोके, अक्षय राऊत ,शुभम पाटील ,नंदू शेरे ,शक्ति वानखडे, रवी मारोडकर आदि उपस्थित होते.

# भाजपा आमदार पडळकर यांच्यावर कारवाई करा

## ख्रिश्चन समाजाची पत्रकार परिषदेत मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** मागील काही दिवसापासून राज्यात ख्रिश्चन समाजाच्या विरोधात गरळ ओकण्याचे काम सातत्याने काही राजकीय मंडळी तसेच आमदार करत आहे. त्यामुळे समाजात ख्रिश्चन धर्मगुरू प्रचारकांना दडपणातून जावे लागत आहे. त्यामुळे अशाच प्रकारे वादग्रस्त वक्तव्य करणा-या भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी आज शुक्रवारी १८ जुलै रोजी पत्रकार परिषदेत समाज बांधवांनी केली. त्यांनी सांगितले की भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांच्यासह अन्य काही नेते मंडळी सातत्याने ख्रिश्चन धर्मप्रचारकांबाबत आकस पूर्ण वक्तव्य करीत आहे. त्यामुळे जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतात तसेच पुरोगामी महाराष्ट्रामध्ये ख्रिश्चन समाजासंदर्भात अनेक गैरसमज निर्माण होत आहे.

# पान १ व १० वरून

## महाराष्ट्र मराठी माणसाच्या

करायची असेल तर त्यांनी करावी. त्या दिवशीच्या मोर्चाच्या धक्क्याने निर्णय मागे घेतला होता. महाराष्ट्रात पहिली ते पाचवी हिंदी आणायचा प्रयत्न करून बघा, आता दुकाने नाही शाळाच बंद करेल. इतर शाळांमध्ये आज मराठी सक्तीची केली पाहिजे,' असं राज ठाकरे म्हणाले.

'मुंबई महाराष्ट्र पासून वेगळी करण्याचा लढा हा काही गुजराती व्यापा-यांचा, नेत्यांचा होता. मी आचार्य अत्रेंचे पुस्तक वाचत असताना मला धक्का बसला की मुंबई महाराष्ट्राला मिळू नये याच्यासाठी पहिले सरदार वल्लभभाई पटेल यांनी सांगितलं. मोरारजी देसाई यांनी गोळीबार करून मराठी माणसांना महाराष्ट्र ठार मारलं होतं. गेली अनेक वर्ष यांचा मुंबईवर डोळा आहे,' असेही राज ठाकरे म्हणाले.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीमध्ये बोलताना त्रिभाषा सूत्र १०० टक्के आम्ही महाराष्ट्रात लागू करणारच असं म्हटलं आहे. 'आमच्यासाठी हा प्रतिष्ठेचा विषय नाही पण एक गोष्ट निश्चित सांगतो, त्रिभाषा सूत्र महाराष्ट्रात लागू होईलच. ते पहिलीपासून होईल की पाचवीपासून हे समिती ठरवेल मात्र १०० टक्के त्रिभाषा सूत्र आम्ही महाराष्ट्रात लागू करू आणि माझा सगळ्यात जास्त विरोध हा इंग्रजीला पायघड्या घालायचे आणि भारतीय भाषांना विरोध करायचा हे योग्य नाही. भारतीय भाषांचा विरोध हा मी सहन करणार नाही,' असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

'भाजपचा एक दुबे नावाचा खासदार म्हणाला, 'मराठी लोगों को हम यहा पर पटक पटक के मारेंगे' म्हणजे मराठी लोकांना आपटून आपटून मारण्याची भाषा केली जात आहे. त्याच्यावर केस झाली नाही. हिंदी चॅनेल्सवाल्यांनी न्यूजही चालवल्या नाहीत. कशा पद्धतीने गोष्टी चालतात ते पाहा. माझं त्या दुबेला सांगणं आहे, दुबे... तू मुंबईत येउन दाखव, तुला मुंबईतल्या समुद्रात 'डुबे डुबे' के मारेंगे,' अशा शब्दांत राज यांनी निशिकांत दुबे यांनी प्रतिआव्हान दिले.

'या सगळ्यांना हिम्मत होते कशी, हा प्रश्न आहे. आपले मराठी लोक काही बोलले तर त्याची राष्ट्रीय बातमी होते. पण हे लोक जेव्हा बोलतात, त्यावेळी त्यांना माहिती असते की सरकार आमच्या पाठीशी आहे. कारण सरकारच जर या गोष्टी इथे लादत असेल, तर या लोकांची हिम्मत वाढतच जाणार. पण मी एक गोष्ट पुन्हा पुन्हा सांगतो, तुमची सत्ता लोकसभेत किंवा विधानभवनात असेल पण आमची सत्ता रस्त्यावर आहे. तुम्हीही ५६ इंचांची छाती बाहेर काढून फिरा. कारण हा महाराष्ट्र मराठी माणसाच्या बापाचा आहे. परत जर कोणी महाराष्ट्रात वेडंवाकडं वागायचा प्रयत्न केला तर माझा महाराष्ट्रसैनिक त्याचा गाल आणि त्याचा हात या सगळ्या गोष्टींची युती केल्याशिवाय राहणार नाही,' असेही राज ठाकरे म्हणाले. तुम्ही हिंदी भाषा करना मारता तुमच्यात जर हिम्मत असेल तर तुम्ही उर्दू भाषिकांना मारा तमिलियन्स ने मारा तुम्ही ज्या प्रकारच्या वाईट कृत्य करत आहात ते योग्य नाही तुम्ही तुमच्या महाराष्ट्रात ब?स असाल पण बिहार किंवा उत्तर प्रदेशात येउन दाखवा तामिळनाडूत जाउन दाखवा तिथे लोक तुम्हाला आपटून आपटून मारतील

## निवडणूक जाहीर झाल्यावर

'२० वर्षांनंतर आम्ही एकत्र एका व्यासपीठावर आलो. पहिल्यांदा आम्ही मराठीच्या विषयावर एकत्र आलो. ते मी आधीच सांगितलं की आम्ही एकत्र आलोय तर ते एकत्र राहण्यासाठीच. मराठीच्या विषयावर आम्ही एकत्रच राहणार आहोत. पुढे मुद्दा येतो तो राजकारणाचा. आता कोणतीही निवडणूक जाहीर झालेली नाही. जेव्हा निवडणूक जाहीर होईल, त्यावेळी आम्ही चर्चा करू,' असं उद्धव ठाकरे म्हणाले. यावेळी उद्धव ठाकरेंनी कार्यकर्त्यांच्या हाणमारीवरूनही भाष्य केलं. 'विधानभवनात हाणामारी झाली, अध्यक्षांनी उच्चस्तरिय चौकशी नेमली आहे. या गुंडांची इतकी हिंमत झाली आहे. कारवाई एकायला चांगली आहे, मात्र धाडस झालं कसं? असा सवाल ठाकरेंनी केला. सत्तेच्या लालसेपोटी हे राजकारण सुरु आहे. हे सत्तेच माजकारण आहे असे ठाकरे म्हणाले. चड्डी गँगवाले माईक टाईसन समजतात. गळ्यात दात घालून फिरणारे कसे माजलेत. यांना कोणी जाब विचारणार की नाही,' असे ठाकरे म्हणाले.

## जातीचे फसवे प्रमाणपत्र

प्रमाणपत्राद्वारे नोकरी किंवा काही लाभ मिळवले असतील, त्याचीही वसूली केली जाईल, फसवणूक, दबाव किंवा आमिष दाखवून धर्मांतर घडवून आणणा-या घटकांवर कठोर कारवाई केली जाईल असाही इशारा देण्यात आला.

## मराठा तरूणांना आदिवासी

दरम्यान, या निलंबनाच्या कारवाईनंतर उपायुक्त संगीता चव्हाण यांनी माध्यमांसमोर बोलण्यास नकार दिला आहे.

पावसाळी अधिवेशनात अनेक आमदारांकडून प्रशासनातील अधिका-यांच्या कामकाचा ढिगाळ आणि गलथानपणा समोर आणून त्यांच्यावर कारवाईची मागणी केली जात आहे. लक्षवेधीद्वारे सभागृहात हा भोंगळपणा समोर आणला जात आहे. काही दिवसांपूर्वी मुंबई शिक्षण विभागाच्या उपसंचालकांवर निलंबनाच्या कारवाईचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर, आणखी एका वरिष्ठ अधिका-यावर थेट विधिमंडळातून कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. विधानसभा सभागृहात दोन दिवसांपूर्वी आमदार संदीप जोशी यांनी नागपूरच्या गुलशननगर येथील दि मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद शाळेबाबत लक्षवेधी उपस्थित केली. त्यावरुन, दिव्यांग आयुक्त प्रविण पुरी यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली. त्यानुसार, विधानसभा सभापती राम शिंदे यांनी तात्काळ निलंबनाचे आदेश देत आयुक्त प्रवीण पुरी यांच्यावर कारवाई केली होती. आता, आदिवासी मंत्री अशोक उईके यांनी आदिवासी विभागातील उपायुक्तांवर निलंबनाची कारवाई करत प्रशासकीय अधिका-यांना एकप्रकारे इशाराच दिला आहे.

कारवाईबाबत माहिती नाही : चव्हाण

आदिवासी विभागातील उपायुक्त संगीता चव्हाण यांनी मराठा समाजातील तरुणांना आदिवासी प्रमाणपत्र दिले होते, त्यामुळे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी थेट विधानसभेत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केल्याची माहिती दिली. दरम्यान, आपल्यावर निलंबनाची कारवाई झाली, याची अद्याप वरिष्ठांकडून माहिती नसल्याचं संगीता चव्हाण यांनी स्पष्ट केले. बोगस प्रमाणपत्रांसंदर्भात आदिवासी विकास भवनात उपायुक्तांवर थेट निलंबनाची कारवाई झाल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांचे साखळी उपोषण

हिंगोलीच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मागील तीन दिवसांपासून आदिवासी विद्यार्थ्यांचे साखळी उपोषण सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने आदिवासी प्रवर्गातील १२,५२० पदे तत्काळ भरण्याचे आदेश दिले असताना सुद्धा अद्यापही पदभरती केली जात नसल्याने आदिवासी विद्यार्थ्यांच्यावतीने हे आंदोलन मागील तीन दिवसांपासून सुरू आहे. या आंदोलनामध्ये हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा सहभाग पाहायला मिळत आहे.

## घुसखोरांवर कारवाई केली

बदल तेव्हाच होईल जेव्हा तृणमूल काँग्रेस सरकार जाईल. आम्ही बंगालमध्ये संधीची मागणी करत आहोत.

बंगालचे धोरण भ्रष्ट लोक बनवतातः पश्चिम बंगालचे धोरण देखील भ्रष्ट लोकांसाठी बनवले आहे. येथे तरुणांच्या शिक्षण आणि कौशल्यांबाबत जे काही घडत आहे ते चिंतेचा विषय आहे. येथे तरुणांच्या शिक्षण आणि कौशल्यांबाबत जे काही घडत आहे ते चिंतेचा विषय आहे.

बंगालच्या उद्योगपतींनी देशाच्या उद्योगांचा पाया रचलाः पश्चिम बंगालची भूमी प्रेरणांनी भरलेली आहे, ही देशाचे पहिले उद्योग मंत्री श्यामा प्रसाद यांची भूमी आहे. त्यांनी देशाच्या उद्योगांचा पाया रचला. हे बिधानचंद्र र?य सारख्या उद्योगपतींचे शहर आहे. सर वीरेंद्र मुखर्जी या भूमीवर राहत होते, ज्यांच्या दूरदृष्टीने भारताच्या पोलाद उद्योगाचा पाया रचला गेला, अशा लोकांनी बंगालला पुढे नेले आहे.

बंगालमध्ये सर्वाधिक वंदे भारत गाड्या धावत आहेतः बंगालमध्ये रेल्वे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी बरेच काम करण्यात आले आहे. देशातील सर्वाधिक वंदे भारत गाड्या धावणा-या राज्यांपैकी हे एक राज्य आहे. कोलकाता मेट्रोचा विस्तार केला जात आहे. रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण केले जात आहे. आज बंगालमध्ये दोन नवीन रेल्वे ओव्हरब्रिज देखील आहेत.

## बँकांमध्ये 36 हजार

लिमिटेड ४३० प्रकरणे ६,१२९.५७ कोटी, कॅनरा बँक ५४२ प्रकरणे ४,९५१.६९ कोटी, युनियन बँक ऑफ इंडिया २८० प्रकरणे ३,७८२.९७ कोटी, पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) २,९७९ प्रकरणे ३,७८२.९७कोटी, इंडियन बँक २,१७१ प्रकरणे २,११४.११ कोटी आणि बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये २९२ प्रकरणांमध्ये ९४२.४३ कोटींची फसवणूक झाली. याशिवाय बँक ऑफ इंडियामध्ये १५३ प्रकरणांमध्ये ७,४४९.३६ कोटी, येस बँक २,८१४ प्रकरणांमध्ये ३८८.०२ कोटी, कर्नाटक बँक २२१ प्रकरणांमध्ये ३४८.९४ कोटी, फेडरल बँक ३,८०३ प्रकरणांमध्ये ७९.७५ कोटी आणि जम्मू आणि काश्मीर बँकेत ३५ प्रकरणांमध्ये १९८.१७ कोटींची फसवणूक झाल्याची माहिती रिझर्व्ह बँकेने दिली.

## आष्टीच्या राहुल तायडे

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने राहुलचे मित्र गौरव उर्फ सौरव परतेती (रा. झटामझीरी, वरुड) आणि गोपाल महादेवराव कुमरे (रा. आष्टी) यांच्यावर संशय घेतला. चौकशीदरम्यान ते हैदराबादकडे पसार झाल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिस पथक तातडीने हैदराबादकडे रवाना झाले. १७ जुलै रोजी सायंकाळी दोघांनाही अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या आरोपींनी विश्वासात घेतल्यानंतर खुनाची कबुली दिली. त्यांच्या सांगण्यानुसार, दारूच्या नशेत किरकोळ वाद झाला आणि त्यातूनच राहुलचा घातपात घडवून आणण्यात आला.

## कृषी नगर सशस्त्र

ने घटनास्थळ गाठत परिस्थिती नियंत्रणात आणली होते. तर शुक्रवारी या प्रकरणातील आठ आरोपींना सिव्हिल लाइन पोलिसांनी तत्काळ अटक केली. आरोपींना न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलिस कोठडी मिळाली असल्याची माहिती सिव्हिल लाइन पोलिसांनी दिली. अन्य आरोपींचा शोध सुरू असून त्यांना लवकर अटक करण्यात येईल अशी प्रतिक्रिया पोलिस निरीक्षक मालती कायटे यांनी दिली. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन पडघन, पोलिस निरीक्षक मालती कायटे, सहाय्यक पोलिस निरीक्षक गोपाल ढोले, पीएसआय गोपाळ जाधव, पोलिस निरीक्षक शिरीष खंडारे, पोलिस निरीक्षक शेख रहीम, पोलिस निरीक्षक नितीन लेव्हारकर, पोलिस निरीक्षक मनोज केदारे, पोलिस निरीक्षक धर्मा सोनूने यांसह सिव्हिल लाइन गुन्हे शोध पथक व राखीव पोलिस दलाचे कर्मचारी उपस्थित होते.

## यांना करण्यात

सदर प्रकरणी सतीश वानखेडे व आकाश गवई या दोन्ही गटांविरुद्ध भारतीय न्याय संहिता नुसार प्राणघातक हल्ला करणे, अवैध शस्त्र बाळगणे, असंघटित जमाव गोळा करणे यांसह विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले. त्यामध्ये भारतीय न्याय संहिता कलम १८९(२), १९०, १९०(२), १९१, १९१(३), २९६, ११५(२), ११८(१)(२), १०९, १२५, ३५२, आर्म ॲक्ट ३/२५, ४/२५, महाराष्ट्र पोलिस कायदा १२५ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## क्रुझर-टाटा एसची

एवढी भीषण होती की दोन्ही वाहनांचा समोरील भाग चकनाचुर झाला आहे.या अपघातानंतर नागरिकांनी वाहतूकीचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. चिखलदरा जाणाऱ्या पर्यटकांची या मार्गावर गर्दी असते. सुरक्षेच्या दृष्टीने या मार्गावर बंदोबस्त लावण्याची मागणी करण्यात येत आहे. वाढत्या अपघातावर नियंत्रण लावण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याची गरज आहे.

## बनावट सोनं दाखवून

आला आणि लक्ष्मणला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर कैलास जाधव यालाही अटक करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. अमोल देशमुख, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया आणि प्रज्वल राऊत यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## तपोवन परिसरात बिबट्याने

चिन्ह दिसले. त्यामुळे आता परिसरात खळबळ उडाली.

माहितीनुसार विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन मध्ये उपसचिव पदावर कार्यरत ऋषिकेश देशपांडे संस्थान परिसरात बनविण्यात आलेल्या क्वार्टरमध्ये कुटुंबीयांसह राहतात. त्यांच्या घरात एक पाळीव श्वानही होता. या श्वानला रात्रीच्या वेळी ते घरातील आवारात चेन ने बांधून ठेवत होते. गुरुवारीं रात्री पण त्यांनी श्वानाला नेहमीप्रमाणे अंगणात चेन ने बांधून ठेवले होते. शुक्रवारी सकाळी जेव्हा त्यांची झोप उघडली तेव्हा त्यांना श्वान कुठेच दिसला नाही. त्याच्या शोध सुरू करण्यात आला, त्यावेळी घरातील वॉल कंपाउंडवर फुट प्रिंट आढळले आणि श्वानाला ओढून घेऊन जाण्याचे चिन्ह दिसले. कुटुंबीय रक्ताचे थेंब आणि चिन्हानुसार समोर जात होते, त्यावेळी त्यांना झुडूपामध्ये श्वान विक्षिप्त अवस्थे मध्ये दिसला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती त्यांनी तत्काळ वन विभागाला दिली. माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी घटनास्थळावर दाखल झाले. त्यांनी परिसराचे निरीक्षण केले. तिथे त्यांना बिबट्याचे पग चिन्ह आढळले. वन विभागाने परिसरात दोन ट्रॅप कॅमेरे लावले आहे. बिबट्याला लवकरात लवकर पकडण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## पदोन्नती झालेल्या शिक्षक

मिळणाऱ्या वरिष्ठ वेतनश्रेणीची वेतननिश्चिती करताना केला जातो.परंतु अपदवीधर प्राथमिक शिक्षकांना / पदवीधर प्राथमिक शिक्षकांना जेव्हा मुख्याध्यापक /३.चे मुख्याध्यापकपदी पदोन्नती दिली जाते तेंव्हा त्याच्या कर्तव्यात आणि जबाबदाऱ्यामध्ये वाढ होत असल्याने जरी त्यांना चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठश्रेणी मंजुर झाली असली तरी त्या पदोन्नत पदाची वेतननिश्चिती मनासे (वेतन) नियम १९८५ मधील नियम ११(१) नुसार करने अभिप्रेत आहे.अमरावती जिल्हा परिषदने निर्गमित आदेशातील ३ आणि ४ क्रमांकाच्या अटी या आश्वासीत प्रगतीयोजनेचा लाभ घेणाऱ्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू आहे.

शासननिर्णयात जि.प. कडील चट्टोपाध्यय आयोगानुसार वरिष्ठश्रेणी प्राप्त शिक्षकांना मुख्याध्यापकपदी पदोन्नती दिल्यानंतर त्यांचे वेतन निश्चित करतांना मनामे (वेतन) नियम ११(१) नुसार करुन त्यामधील तरतुदीचा लाभ देण्याचे नमुद केले आहे. तसेच शासन निर्णयात पदवीधर प्राथमिक शिक्षकास पदवीधर प्राथमिक मुख्याध्यापकपदी पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांचे कर्तव्यात आणि जबाबदाऱ्या वाढ होत असल्यामुळे सदर पदाची वेतननिश्चिती मनामे (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११(१) मधील तरतुदी नुसार एक वेतनवाढ देवुन करण्यात यावी असे नमुद केले आहे.निर्गमित आदेशात नमुद केलेल्या ३ व ४ क्रमांकाच्या अटी रद्द करुन अपदवीधर /पदवीधर शिक्षकांना पदोन्नतीच्या अनुषंगाने मिळणाऱ्या लाभापासुन वंचित ठेवू नये. अश्या मागणीचे निवेदन देण्यात आले.पदोन्नती झालेल्या सर्व शिक्षकांना वेतन वाढीचा लाभ द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली,असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

## देशी पिस्तुल व जिवंत

पिस्तुल, मॅगझिनसह एकूण १५,००० रुपयांचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. या प्रकरणाचा तपास सुरू असतानाच पोलिसांनी फरार आरोपी दानियल आईश मोहम्मद शरीफ (वय २०, रा. जनता कॉलनी) याचा शोध घेऊन त्याला १८ जूलै रोजी अटक केली. त्याच्याकडून दोन जिवंत पितळी काडतुसे सापडली. दोघांविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे व सहायक पोलीस आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर, विजया पंधरे आणि समाधान वाठोरे यांच्या नेतृत्वात पार पडली. सहायक पोलिस निरीक्षक मनोज मानकर, पोलिस हवालदार भारत वानखडे, उपनिरीक्षक जावेद अहमद, पोलिस नाईक राजेश गुरेले, पोलिस शिपाई नंदकिशोर करोची, गुलरेज खान, महेश शर्मा, रुपेश हटकर व चालक पवन लाड यांनी या धडक कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली.

## महापलिकेची दक्षिण झोनमध्ये

यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाने ही कारवाई हाती घेतली.

मनपा प्रशासनाने पूर्वसूचना देऊनही अतिक्रमण हटवले गेले नसल्यामुळे ही कठोर कारवाई करण्यात आली आहे. कारवाईदरम्यान अतिक्रमण निरीक्षक, झोनल अधिकारी, पोलीस कर्मचारी आणि अतिक्रमण पथक उपस्थित होते.

यापुढे शहरातील कोणत्याही भागात अनधिकृत गाड्या, स्टॉल्स किंवा शेड लावल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा मनपाने दिला आहे.


## सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.४८०/२०२५** **ने.ता.२१/०८/२०२५**

- अर्जदार-

१. श्री.शिवदास रामरावजी तट्टे, **वय ६२ वर्षे, धंदा - शेती**
**रा.बोडणा,ह.मु.चमक (खुर्द),ता.अचलपूर, जि.अमरावती**

- गैरअर्जदार-

१. श्री अंबादास रामरावजी तट्टे, **वय ४२ वर्षे, धंदा - शेती**
**रा.बोडणा,ह.मु.चमक (खुर्द),ता.अचलपूर, जि.अमरावती**
२. श्रीमती निर्मला जर्नादन खेरोडकर, **वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम**
**रा.गोपाल नगर, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती**
३. श्रीमती प्रमिला किसनराव दोड, **वय ६० वर्षे, धंदा - घरकाम**
**रा.धनगरपुरा, तिवसा, ता.तिवसा, जि.अमरावती**
४. श्रीमती सुनंदा गणपतराव दापुरकर, **वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम**
**रा.काटी, ता.वरुड, जि.अमरावती**
५. श्रीमती जिजाबाई योगेंद्र शेटे, **वय ५० वर्षे, धंदा - घरकाम**
**रा.राजुरा बाजार, ता.वरुड, जि.अमरावती**
६. धनराज रामरावजी तट्टे मयताचे वारस
६अ. श्रीमती वंदना धनराज तट्टे, **वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम**
६ब. तुषार धनराज तट्टे,**वय २५ वर्षे, धंदा - शेती**
**दोघेही रा.बोडणा,ह.मु.चमक (खुर्द),ता.अचलपूर, जि.अमरावती**

**वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ ते ५ ची आई तर गैरअर्जदार नं.६ (अ) ची सासू तर अर्जदार नं.६ (ब) ची आजी नामे** बैनाबाई रामरावजी तट्टे ही दिनांक २३/११/२००४ रोजी चमक (खुर्द),ता.अचलपूर, जि.अमरावती येथे मय्यत झालेली आहे. **त्याचे मृत्यूनंतर त्याचे वारस अर्जदार व गैरअर्जदार आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदार व गैरअर्जदारा शिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.**

**तारीख- १७/०७/२०२५** शिक्का

**आदेशानुसार,**
(सहाय्यक अधीक्षक)
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

जनमाध्यम
अकोला | वाशिम | बुलडाणा
■ शनिवार, १९ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
एक प्रतिष्ठित सवय
epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

# सावरगावमध्ये अन्नत्याग उपोषणाची एल्गार : २१ जुलैपासून महिलेचे ग्रामपंचायतसमोर उपोषण

## रस्त्यावरील अतिक्रमणामुळे महिलेला त्रास ; ग्रामपंचायतीच्या उदासीनतेविरोधात आवाज

■ प्रतिनिधी | खेट्री ■

**पातूर तालुक्यातील सावरगाव ग्रामपंचायतीच्या कारभारातील दुर्लक्ष आणि मनमानी कारभारामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. विशेषतः मंजुळा जानकीराम डाखोरे या महिलेला न्याय मिळावा यासाठी आता तिने २१ जुलैपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर अन्नत्याग उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे.**



मंजुळा डाखोरे यांच्या घरासमोरील शासकीय रस्त्यावर एका इसमाने अनधिकृत बांधकाम केल्यामुळे त्यांच्या ये-जा करण्याच्या मार्गावर अडथळा निर्माण झाला आहे. या अतिक्रमणावर कारवाई करून रस्ता मोकळा करावा यासाठी त्यांनी ग्रामपंचायत आणि पातूर पंचायत समितीकडे वारंवार तक्रारी केल्या. मात्र, या तक्रारींकडे दुर्लक्ष करून अधिकारी आणि सचिवांनी कुठलीही कार्यवाही केली नाही, असा आरोप संबंधित महिलेकडून करण्यात आला आहे.

महिलेच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायत सचिवांनी तिचे निवेदन स्वीकारण्यास नकार दिला, तसेच फोन उचलणेही बंद केले आहे. त्यामुळे या प्रकारामुळे हतबल झालेल्या महिलेला अन्नत्याग उपोषणाचा मार्ग पत्करावा लागला आहे. १८ जुलै रोजी त्यांनी तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, २१ जुलैपासून उपोषण सुरू होणार आहे.

**सचिवांची मनमानी : निवेदन घेण्यास स्पष्ट नकार -** महिलेने तक्रारी केली असताना ग्रामपंचायत सचिवांनी तिचे निवेदन घेण्यास नकार दिला असून, तिच्या फोनला प्रतिसाद देणेही टाळल्याचा आरोप आहे. ही टाळाटाळ आणि उडवाउडवी महिला निवेदना आणि उपोषणाची दखल घेतल्याशिवाय थांबणार नाही, असे तिचे म्हणणे आहे.

**ग्रामपंचायतीचा कारभार चव्हाट्यावर -** ग्रामपंचायतीच्या गलथान कारभारामुळे सावरगावमधील ग्रामस्थ देखील नाराज झाले आहेत. रस्त्यावरील अतिक्रमण काढून टाकणे ही जबाबदारी ग्रामपंचायतीची असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे सावरगाव ग्रामपंचायतीचा कारभार चव्हाट्यावर आला असून, ग्रामस्थांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याप्रकरणी लक्ष घालून संबंधित महिलेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली आहे.

महिलेच्या जीवाला काही धोका पोहोचल्यास यास पूर्णपणे प्रशासन जबाबदार राहील, असा स्पष्ट इशारा देखील निवेदनातून देण्यात आला आहे.

# गावठाण अतिक्रमणाचा मुद्दा विधानभवनात धगधगला

## उपमुख्यमंत्री शिंदेंचा ठाम आदेश!

■ प्रतिनिधी | वाशिम ■



जिल्ह्यातील अनेक गावात ग्राम पंचायत हद्दीतील गावठाण क्षेत्रात घुसखोरी होत असल्याची बाब जनमाध्यमच्या वृत्ताने उजागर केली होती.परिणामी सदर वृत्तची चर्चा जिल्हाभर गाजत असून, या गंभीर प्रकरणाचे पडसाद पावसाळी अधिवेशनात देखील उमटले आहेत. या गंभीर प्रकाराबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी आक्रमक भूमिका घेत. सदर अतिक्रमित गावठाण क्षेत्राची मोजणी करून ते अतिक्रम हटवा मग ती ईमारत असो अथवा विहीर, ती सरकारी जागा ताब्यात घेऊन तार कुंपण बांधा व ग्राम पंचायतच्या ताब्यात घ्या..! असे आवाहन केले आहे.

पावसाळी अधिवेशनात बोलतांना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी गावठाण हद्दीतील घुसखोरी बाबत चिंता व्यक्त केली आहे. पुढे बोलतांना उपमुख्यमंत्री म्हणाले की, ग्राम पंचायत हद्दीतील गावठाण क्षेत्रात अतिक्रमण करून शासकीय जमीन हडप करणे ही एक गंभीर बाब आहे. गावठाण म्हणजे, गावातील सार्वजनिक वापराची पारंपरिक जागा असते. सदर जमीन ग्राम पंचायतच्या म्हणजे पर्यायाने सरकारच्या मालकीची असते. अशा जागेवर काही घुसखोरांनी अतिक्रमण करून अवैध बांधकाम तर केलेच पण सदर कामाची नोंद खाजगी सात - बारावर केली असल्याची धक्कादायक वास्तव समोर येत आहे. अतिक्रमामुळे किंव्हा इतर गैरप्रकारे सदर जमीन खाजगी स्थावर मालमत्तेत नोंद होणे हे महसूल विभागासाचे अपयश आहे. यावर सबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करावी व गावठाण क्षेत्राची मोजणी करून सरकारी जमीनीला तार कुंपण बांधावे असे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अधिवेशनात बोलतांना केले आहे.

माझे शेलुखडसे शेतशिवारात ग्राम पंचायत गावठाण हद्दीला लागून गट नंबर ५९९ मध्ये जमीन आहे. सदर गटाची सरकारी मोजणी केली असता शेजारच्या गट नंबर ६०२ मधील जवळपास १७ ते १८ गुंठे शेत माझ्या मालकीचे निघाले आहे. याआधी सुद्धा गट नंबर ६०२ ची सरकारी मोजणी झालेली असून दोनही मोजणीत गट नंबर ६०२ ची गावठाण हद्दीत घुसखोरी असल्याचे सिद्ध झाले आहे. त्याचे पुरावे म्हणून माझ्याकडे गट नंबर ५९९ व गट नंबर ६०२ च्या उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाने प्रमाणित केलेला मोजणी अहवाल आहे. या प्रकरणाची तक्रार जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी आणि तहसिलदार यांचेकडे करणार आहे.

**वसंत खडसे**
शेतकरी, शेलुखडसे

# युवकांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी : वाशिममध्ये २२ जुलै रोजी रोजगार मेळावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र वाशिम अंतर्गत मॉडेल करीयर सेंटर वाशिम व संमती अभियांत्रिकी महाविद्यालय वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता संमती अभियांत्रिकी महाविद्यालय सावरगाव बर्डे मालेगांव रोड वाशिम येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर रोजगार मेळाव्यात जिल्यातील व इतर जिल्यातील विविध कंपन्यांचे उद्योजक, नियोक्ता, प्लेसमेंट एजन्सी सहभागी होणार आहेत व त्याच दिवशी नियुक्ती मिळणार आहे. वाशिम जिल्यातील इच्छुक उमेदवारांनी सदर रोजगार मेळाव्यात जास्तीत जास्त संख्येत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रवीण वा. खंडारे, सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र वाशिम अंतर्गत मॉडेल करीयर सेंटर वाशिम यांनी केले आहे.

आवश्यक पात्रता - इयत्ता १० वी व १२ वी पास, आयटीआय तसेच कोणत्याही शाखेचा पदवीधर अशा पात्रता असणाऱ्या बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी आहे. उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, बोयोदाटा, पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे आवश्यक असल्याचे

**प्र.वा. खंडारे,** सहायक आयुक्त
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम

# झरंडी जंगलातील मृतदेह पुरुषाचा असल्याचे निष्पन्न

## चान्नी पोलिसांकडून तपास सुरू; उत्तरीय तपासणी अहवालाच्या प्रतीक्षेत



■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या झरंडी परिसरातील वन विभागाच्या जंगलात जमिनीमध्ये पुरलेला मृतदेह गुरुवार, १७ जुलै रोजी आढळून आल्याने एकच खळबळ उडाली होती. या घटनेची माहिती मिळताच चान्नी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मृतदेह जमिनीतून बाहेर काढून पंचनामा केला. मृतदेह पूर्णपणे कुजलेल्या अवस्थेत असल्यामुळे तो पुरुषाचा आहे की महिलेचा, हे तातडीने स्पष्ट होऊ शकले नव्हते.

मात्र शुक्रवारी प्राथमिक उत्तरीय तपासणी व पोलिस चौकशीनंतर तो मृतदेह पुरुषाचा असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात पाठवला आहे. पुढील तपासाची दिशा ठरविण्यासाठी पोलिस प्रशासन उत्तरीय तपासणी अहवालाची प्रतीक्षा करत आहे. दरम्यान, पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला असून मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासह मृत्यूचे कारण शोधण्याचे काम सुरु आहे.

झरंडी परिसरात मृतदेह पुरण्यात आल्याने ही हत्या असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.पुढील तपासासाठी उत्तरीय अहवाल महत्त्वाचा ठरणार असून, तो प्राप्त झाल्यानंतरच तपासाला वेग येणार आहे, असे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात आले.

# माहुलीतील नाली बांधकाम अर्धवट अवस्थेत

**मानोरा :** तालुक्यातील अनेक गावे व मानोरा शहरातून अकोला आर्णी या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय महामार्गाची निर्मिती राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाकडून करण्यात आली असून शहर व तालुक्यातील काही ठिकाणचे बांधकाम अर्धवट व अपूर्ण असल्याने ही खोळंबलेली कामे कधी पूर्णत्वास जाणार असा सवाल या निमित्ताने पुढे येत आहे.

साखरडोह, कोलार, आमगव्हाण, धामणी या गावातून राज्य शासनाच्या अधीन असलेला जुना मार्ग पूर्णपणे खोदून काढून जुन्या मार्गावर असलेली सगळी जुनी पुलांची नवनिर्मिती करण्यात आली असून मानोरा शहरातीलच केवळ एक पूल राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाने बांधलेला नाही तो तसाच अरुंद व उंचीने सुद्धा कमी असल्याने पावसाळ्यात रहदारीला समस्या निर्माण होतात.

# पंचशील ध्वजाची विटंबना करणाऱ्यांवर कारवाई करा

**वाशीम :** लोणार तालुक्यातील वेणी या गावातील बौद्ध वस्तीमध्ये असलेला पंचशील ध्वज उखाडून त्या भौवती असलेले कंपाऊंडची तोडफोड गावातील समाजकंट, गावगुंडांनी यांनी केली.त्यासाठी गावातील बौद्ध उपासक व काही मंडळी मुलाबाळासह त्यांना विरोध करण्यासाठी गेले असता महीलांना, पुरुष व लहान मुलांना देखील धक्का बुक्का करून मारहाण केली.

# बसस्थानक परिसरातील चोरी प्रकरण उघडकीस - एका महिलेला अटक

● ५ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त
● अकोट शहर पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट शहरातील बसस्थानक परिसरात गेल्या काही महिन्यांपासून चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली होती. या चोरीच्या घटनांचा तपास करत असताना अकोट शहर पोलिसांनी एका महिलेला अटक करत एकूण ५ लाख ६७ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, संबंधित महिलेनं याआधी बसस्थानक परिसरात चार चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

सदर प्रकरणातील एक घटना जुलै महिन्यात घडली होती. अकोट ते तेल्हारा बसमध्ये प्रवास करत असताना एका महिलेच्या पर्समधून १३,५०० रुपयांची रक्कम अज्ञात चोरट्याने लंपास केली होती. या घटनेचा तपास करत असताना पोलिसांनी एका संशयित महिलेला ताब्यात घेऊन तिच्याकडून १२,००० रुपये रोख रक्कम जप्त केली. पुढील चौकशीत तिने याआधी केलेल्या इतर तीन चोरींची कबुली दिली असून त्या प्रकरणात तिने १५ ग्रॅम सोन्याची पोथ, ४६ ग्रॅम सोन्याची लगड, आणि ४ ग्रॅम सोन्याची लगड चोरल्याचे स्पष्ट झाले आहे. या सर्व चोरीतून मिळालेला एकूण मुद्देमाल ५,६७,००० रुपये इतका झाला आहे.




ही यशस्वी कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, प्रभारी एस.डी.पी.ओ. गजानन पडघन, आणि पोलीस निरीक्षक अमोल माळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तपास पथकात गुन्हे शोध पथक प्रमुख वैभव तायडे, तसेच नरेंद्र जाधव, गणेश सोळंके, विपुल सोळंके, कपिल राठोड, मुकेश सोळंके, अश्विन चव्हाण, आणि शितल बोंडे यांचा सक्रिय सहभाग होता.

# शेतकरी बांधवांनो...! नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नैसर्गिक शेती ही केवळ शेतीपद्धती नाही, ती आरोग्य, पर्यावरण आणि आर्थिक समृद्धी यांचा संगम आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा,व शेतीची नवसंस्कृतीची जपावी असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी केले.



स्व. संजय रोमन यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आयोजित बायोडायनामिक कंपोस्ट स्पर्धा २०२४-२५ चा पुरस्कार वितरण सोहळा आज जिल्हाधिकारी कार्यालयातील 'राजे वाकाटक सभागृहात' आज दि.१७ जुलै रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. बोलत होत्या. यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक आरिफ शहा, सर्ग विकास समितीचे राजेश तिवारी व विनीता शहा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विनीता शहा यांनी यावेळी नैसर्गिक व बायोडायनामिक शेतीतील नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण करत शेतकऱ्यांना सखोल माहिती दिली. स्पर्धेमधून निवडलेल्या उत्कृष्ट बायोडायनामिक कंपोस्ट तयार करणाऱ्या शेतकऱ्यांना आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. या दरम्यान पिक विमा योजनांच्या पत्रकाचे अनावरण देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या पत्रकातून शेतकऱ्यांना विमा योजनांची सविस्तर माहिती मिळणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली. कार्यक्रमाचे संयोजन प्रेरणादायी वातावरणात पार पडले. नैसर्गिक शेतीच्या दिशेने हा उपक्रम एक सकारात्मक पाऊल ठरल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमात सर्व विकास समितीचे पदाधिकारी, शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आभार अभिजीत वंजारे यांनी मानले.


# नगर परिषद कारंजा लाड, जि.वाशिम

**विद्युत विभाग, ई-निविदा सूचना क्र. ०२, सन २०२५-२६**

मुख्याधिकारी, न.प. कारंजा लाड, न.प. निधी / वैशिष्ट्यपूर्ण योजनेचे निधी अंतर्गत महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर खालील कामाकरीता दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा मागवीत आहे. सदर बाबतीत सर्व कार्यवाही उक्त संकेतस्थळावर ऑनलाइन पहावयास मिळेल.

१) सौर ऊर्जा प्रकल्पासाथी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व इतर अनुषंगिकबाबींकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमणूक करणे. प्रकल्पाची अंदाजे किंमत रक्कम रु.३० कोटी, बयाना रक्कम रु.५०,०००/-, कोरे निविदा प्रपत्र रु.१,५००/, कामाचा कालावधी - एक महीना.

**स्वा/ -**
**(श्री. महेश वाघमोडे)**
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद कारंजा लाड


# ग्राहकहितासाठी ठोस पावले ! वाशिममध्ये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची मासिक बैठक संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आज जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची पहिली मासिक सभा पार पडली. या बैठकीस शासकीय सदस्य जिल्हा पुरवठा अधिकारी दादासाहेब दराडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पी.एस.ठोंबरे, जिल्हा माहिती अधिकारी यासिरोद्दिन काझी,प्र.उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रफुल्ल भोरखडे अधिकारी,पोलिस उपनिरीक्षक आर.व्ही. भोंडवे, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक चेतन बावणे, सहाय्यक पुरवठा अधिकारी भारती सोनटक्के आणि अशासकीय सदस्य गजानन साळी, अभय खेडकर, जुगलकिशोर कोठारी ,प्राचार्य डॉ. कमल किशोर अग्रवाल, प्रदीप टाकळकर ,प्रवीण वानखडे, नामदेव बोरचाटे,



संगीता इंगोले, कविता खराट वृषाली टेकळे चंद्रशेखर राठी सुनील महाजन, प्रमोद लकरस यांच्यासह ग्राहक संरक्षण क्षेत्राशी पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी जिल्हा पुरवठा अधिकारी दादासाहेब दराडे यांनी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या कामकाजाबाबत माहिती दिली. त्यांनी ग्राहक आयोगाची जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कार्यपद्धती, तसेच प्रलंबित तक्रारींच्या निवारणासाठी असलेली प्रक्रिया यावर सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी यापुढे दर महिन्याला नियमितपणे परिषदेस बैठक घेण्याचे आदेश दिले आणि ग्राहकांच्या हिताचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत असे निर्देश दिले. ग्राहकांवर अन्याय होऊ नये यासाठी परिषद सक्रियपणे काम करेल असे त्यांनी नमूद केले. बैठकीत ग्राहक जनजागृती मोहीम राबविण्याचे नियोजन करण्यात आले असून शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत आणि बाजारपेठांमध्ये जनजागृतीपर उपक्रम घेतले जातील. ग्राहकांना त्यांच्या हक्क व कर्तव्यांबाबत माहिती देणे, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट राहील.

**ग्राहक संरक्षण परिषदेविषयी थोडक्यात माहिती :** ग्राहक संरक्षण परिषद ही न्याय मंत्रालयाच्या अधिपत्याखालील एक स्वायत्त संस्था असून ती ग्राहकांच्या हितासाठी कार्य करते. ग्राहक पंचायत समित्या ही या कार्यपद्धतीचा एक भाग असून त्या स्थानिक पातळीवर तक्रारींचे निरसन करण्यासाठी सजग असतात.

या परिषदेचा उद्देश ग्राहकांना योग्य माहिती, सुरक्षित सेवा, वस्तूंची गुणवत्ता, निवडीचा अधिकार आणि तक्रार निवारणाची सुविधा पुरवणे हा आहे. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, पुरवठा विभाग आणि स्थानिक संस्थांमार्फत या परिषदेच्या उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २३४ ■ शनिवार, १९ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# पुलगांव कॉटन मिल व लॅन्को च्या जागेवर उद्योग उभारण्याची पालकमंत्री भोयर यांची मागणी

## -महसूल मंत्री बावनकुळे यांचे जमीन ताब्यात घेण्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश



**वर्धा जनमाध्यम :** पुलगांव येथील कॉटन मिल व मांडवा येथील लॅन्कों विदर्भ थर्मल पॉवरची जमीन ताब्यात घेऊन त्यांवर जिल्ह्यातील युवकांना रोजगार मिळावा यासाठी उद्योगांची निर्मिती करण्याची मागणी पालकमंत्री डॉ. भोयर यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. पालकमंत्र्यांच्या मागणीची दखल घेत बावनकुळे यांनी जिल्हाधिका-यांना तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

पुलगाव येथील कॉटन मिल अनेकांना रोजगार देणारी होती. मिल मुळे अनेकांना रोजगार मिळाला होता. परंतु काही वर्षांपासून मिल बंद पडलेली आहे. त्यामुळे मिलच्या जागेचा कोणत्याही प्रकारचा उपयोग सध्या स्थितीत होत नाही आहे.मिलची नझूल शिट क्र. २ भूखंड क्र. १८ क्षेत्रफळ ३८१२०.६० (९.५ एकर) जागेचा कोणत्याही प्रकारचा उपयोग सध्या होत नाही. ज्या कार्यासाठी ही जमीन देण्यात आली त्याचा शर्तभंग झालेला आहे. तथापि, ही जमीन शासन दरबारी जमा करणे आवश्यक आहे. मोक्याच्या जागी असल्याने या जागेवर एखादा उद्योग निर्माण केल्यास जिल्ह्यातील बेरोजगारांच्या हाताला काम मिळू शकेल. तसेच आर्थिक गतीचक्रावर देखील त्याचा परिणाम होणार आहे. तसेच लॅन्को थर्मल पॉवर लिमी. कंपनी ने मांडवा, पुलई, बेलगाव येथील सर्वे क्रमांक १८६ ची ३८४.६६ हेक्टर जमीन खेरदी केली आहे. या जमीनीवर ६६६ मेगावॅटचे दोन पावर प्लॉंट तयार करण्यात येणार होते.सर्वे क्रमांक १५५ मधील २९८.५४ हेक्टर आर जमीन खरिदीस सुधारित परवानगी देण्यात आली होती. मात्र याजागेवर पावर प्लॉट अदयाप अस्तित्वात आलेला नाही. त्यामुळे या जमीनाचा कोणत्याही प्रकारचा वापर आज होत नाही आहे. लॅन्कों विदर्भ थर्मल पावर ने विहीत मुदतीज जमीनीचा वापर न केल्यामुळे महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम विदर्भ प्रदेश १९५८ मधील कलम ८९ चा भंग झालेला आहे. त्यामुळे ही जमीन नियमानुसार शासन दरबारी जमा होणे क्रमप्राप्त असल्याचे पालकमंत्री डॉ. भोयर यांनी महसूल मंत्री बावनकुळे यांच्या निर्दशनास आणून दिले. ही जमीन शासन दरबारी जमा करून या जागेवर एखादा मोठा उद्योग निर्माण करण्यात यावा. जेणे करून जिल्ह्यातील व विदर्भातील युवकांच्या हाताला काम मिळेल, असे ही पालकमंत्री डॉ. भोयर यांनी म्हटले आहे.

वर्धा जिल्ह्यातील उद्योगांची कमतरता आहे. उद्योग नसल्याने जिल्ह्यातील व व लगतच्या जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या शोधासाठी इतरत्र जावे लागते. या दोन्ही जागेवर उद्योग निमिर्ती झाल्यास युवकांच्या हातला काम मिळेल तसेच जिल्हा देखील आर्थिक दृष्टया सक्षम होईल, असे ही पालकमंत्री भोयर यांनी म्हटले आहे.

### महसूल मंत्र्यांनी घेतली तत्काळ दखल

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पुलगांव येथील कॉटन मिल व मांडवा येथील लॅन्को विदर्भ थर्मल पावर कंपनीची जागा शासन दरबारी जमा करण्याची मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी वान्मथी सी यांना दोन्ही जागा शासन दरबारी जमा करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहे.

# हत्येच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना हैदराबाद येथून अटक



**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** येथील राहुल तायडे याच्या हत्येचा छडा पोलिसांनी लावला आहे. मित्रांसोबत गेलेला राहुल घरी परतला नसल्याने कुटुंबियांनी तो बेपत्ता असल्याची तक्रार आष्टी पोलिस ठाण्यात दाखल केली होती. तर नंतर राहुलचा मृतदेह आष्टी-राजुरा बाजार मार्गावर अमरावती जिल्ह्याच्या वघाळ परिसरात नाल्यात आढळल्याने या प्रकरणी बेनोडा ता. वरूड पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली होती. या प्रकरणाचा छडा अमरावती पोलिसांनी व स्थानिक गुन्हे शाखेच्या चमूने लावला असून राहुल तायडे याला ठार करणाऱ्या दोघांना हैद्राबाद येथून ताब्यात घेत अटक करण्यात आली आहे. गौरव उर्फ सौरव परतेती (२०) रा. झटामझीरी ता. वरुड व गोपाल कुमरे (२३) रा. आष्टी अशी आरोपींची नावे आहेत.

### -स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणची कारवाई -आधी ढोसली दारू, नंतर केली हत्या

अमरावती जिल्ह्यातील बेनोडा पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या आष्टी-राजुरा बाजार मार्गावरील वघाळ भागातील नाल्यात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह मिळून आल्याने बेनोडा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली. मृतक आष्टी येथील राहुल तायडे असल्याचे निष्पन्न झाले. तो मित्रांसोबत गेला होता. पण, रात्री उशीर होऊनही तो परत न आल्याने त्याच्या कुटुंबियांनी आष्टी पोलिसात राहुल बेपत्ता असल्याची तक्रार नोंदविली. हे प्रकरण नेमके काय याची इत्यंभूत माहिती जाणून घेण्यासाठी अमरावती पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या चमूने तपासाचे चक्र फिरविले. पोलिसांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी केल्यावर घातपाताचा संशय बळावला. ज्या मित्रांसोबत राहुल गेला होता त्याचा शोध घेण्यास पोलिसांनी सुरूवात केली. दरम्यान, ठोस माहितीच्या आधारे गौरव परतेती व गोपाल कुमरे या दोघांना अमरावती एलसीबीच्या चमूने हैद्राबाद येथून ताब्यात घेतले. त्यांची विचारपूस केल्यावर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पहिले दारू ढोसली नंतर जेवन केले तर नंतर वाद झाल्याने राहुलला ठार करण्यात आल्याची कबुली पोलिसांना दिली आहे.

राहुल व त्याचे दोन्ही मित्र दुचाकीने वरुड येथे गेले. तेथे दारू ढोसली. नंतर त्यांनी राजुरा बाजार परिसरात हरितमध्ये जेवन केले. ते दुचाकीने आपटीकडे जात असताना मद्यधुंद असलेल्या राहुलने शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. त्यानंतर राहुल व त्याच्या मित्रात चांगलाच वाद झाला. वघाळ गावाजवळील नाल्याच्या पुलावर दोन्ही आरोपींनी राहुल याला मारहाण केली. अशातच तोल जात राहुल नाल्याच्या चिखलात पडला. त्यानंतरही दोघांनीही राहुलचे मुंडके चिखलात दाबत मारहाण करून ठार केले. त्यानंतर कुणी आपल्याला बघेल हे लक्षात येताच राहुलला तेथेच सोडून पोबारा केल्याचे पोलिसांच्या आतापर्यंतच्या तपासात पुढे आले आहे.

# देवळी तालुक्यात युरिया खताचा तुटवडा

## -शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात युरीया खत उपलब्ध करून देण्याची युवा संघर्ष मोर्चाची मागणी



**देवळी जनमाध्यम :** तालुक्यात युरिया खताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात असल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. देवळी तालुक्यातील एकाही कृषी केंद्रात युरिया खत उपलब्ध नाही. ऐन पिकांच्या वाढीच्या वेळी खताचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे पिकांची वाढ, उत्पादन यावर गंभीर परिणाम झाल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे. सोबतच खतांची लिंकिंग करून देखील शेतकऱ्यांची लुटमार करण्यात येत आहे. खरीप आणि रब्बी हंगामात बियाणे खरेदीच्या वेळी आणि खतांची विक्री करताना लिंकिंगचे प्रकार समोर येत असतात. या लिंकिंगच्या प्रकारामुळे शेतकऱ्यांना अधिकचा खर्च करावा लागतो. ज्या खताची मागणी अधिक असते त्याची लिंकिंग केली जाते. मागणी असलेले खत हवे असल्यास त्यासोबत इतर खत किंवा औषध घेण्याची सक्ती करण्यात येते. अन्यथा खत देण्यास नकार दिला जातो. त्यामुळे नाईलाजाने शेतकऱ्यांना खतासोबत इतर खत आणि औषध घ्यावी लागतात. तसेच आर्थिक भार देखील शेतकऱ्यांना सोसावा लागतो.

शेतकऱ्यांना युरिया खताचा पुरवठा तातडीने व मुबलक प्रमाणात वाढवण्यात यावा. लिंकिंग व्यवस्था रद्द करून, प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या गरजेनुसार खत मिळू शकेल अशी पारदर्शक यंत्रणा तयार करावी. या प्रमुख मागणीसाठी युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष किरण ठाकरे यांनी तालुका कृषी अधिकारी यांना भेटून शेतकऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. शासनाने या बाबींकडे गंभीरतेने लक्ष देऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळावे. अन्यथा शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी करणाऱ्या सरकार व प्रशासनाच्या विरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. यावेळी किरण ठाकरे यांचेसह प्रविण कात्रे, गौतम पोपटकर, स्वप्नील मदनकर, गौरव खोपाळ व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# आजपासुन चार दिवस पालकमंत्री जिल्ह्याच्या दौऱ्यावर



**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खानीकर्म राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. भोयर दि. १९ ते २२ जुलै पर्यंत जिल्ह्याच्या दौ-यावर असून ते दि.१९ जुलै रोजी सकाळी १० नागपूर येथून वर्धा कडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता विश्रामगृह वर्धा येथे आगमन दुपारी १ वाजता पर्यंत प्रशासकीय कामासाठी राखीव. दुपारी १ वाजता विश्रामगृह येथे पोळा उत्सव समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी २ वाजता न्यू आर्टस कॉलेज येथे आयोजित पारधी विकास परिषद बैठकीस उपस्थिती. दि.२० जुलै रोजी दुपारी १२ वाजता ओकेझन सेलेब्रेशन हॉल येथे आयोजित वर्धापनदिन व सेवानिवृत्त पोलीस बांधव स्नेह सम्मेलन कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १ ते ५.३० वाजता पर्यंत राखीव. दि.२२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता लेप्रोसी फाउंडेशन गेट समोर येथे आयोजित मृगनयनी शिक्षण व ग्रामीण विकास संस्थेच्या उद्घाटन व वृक्षरोपण कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १० वाजता चारखागृह येथे आयोजित मोतीबिंदू मुक्त वर्धा जिल्हा आरोग्य शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत राखीव, सायंकाळी ५ वाजता नामदेव मठ येथे आयोजित संजीवन समाधी सोहळा व सांप्रदायिक सत्कार सोहळा कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी सोईनुसार नागपूर कडे प्रयाण करतील.

# कुंभी येथे अज्ञात व्यक्तीकडून हनुमान मुर्तीची विटंबना



**हिंगणघाट जनमाध्यम:** तालुक्यातील कुंभी येथे अज्ञात व्यक्तीने हनुमान मूर्तीची विटंबना करण्यात आल्याची बाब सकाळी गावातील गावकऱ्यांच्या लक्षात येताच हिंगणघाट पोलीस स्टेशनला माहिती दिली, हिंगणघाट पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ठाकूर यांनी कुंभी येथील मंदिरात जाऊन पहाणे केली आणि विटंबना करणाऱ्या अज्ञात आरोपीचा शोध घेऊ अशी ग्वाही दिली.त्याच सोबत हिंगणघाट तालुक्यातील विश्व हिंदू परिषद, बजरंग दल पदाधिकाऱ्यांनी ज्या कोणत्याही अज्ञात व्यक्तीने हे कृत्य केले त्यास लवकरात लवकर अटक करावी अशी मागणी केली आहे.

विश्व हिंदू परिषद व बजरंग दल हिंगणघाट पदाधिकाऱ्याने कुंभी येथे जाऊन हनुमानाच्या मुर्तीवर दुपट्टा चढवून, हार चढविण्यात आला व मनोभावे दर्शन घेतले व गावकऱ्यास काही मदत लागल्यास आम्हाला त्वरित कळवावे असे बजरंग दलाच्या वतीने सांगण्यात आले.

या वेळी विहिप चे वर्धा जिल्हा धर्म प्रसार प्रमुख अजय भोंग, जिल्हाप्रमुख अनुकूल कोचर, हिंगणघाट शहर विहिप मंत्री देवा वाघमारे, मठ मंदीर प्रमुख रवी खंडाळकर,सेवा प्रमुख संजय कडू,प्रचार प्रसार प्रमुख शुभम जयस्वाल,बजरंग दल सुरक्षा प्रमुख रितिक खोडे, प्रतीक हिवज, रणजित कच्चवाहा, राहुल फंटिंग, बजरंग दल पदाधिकारी आणि गावातील गावकरी हनुमान मंदिरात उपस्थित होते.

# ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या तालुकाध्यक्ष पदी जयंत ठाकरे यांची निवड



**समुद्रपुर जनमाध्यम :** पंचायत समितीच्या सभागृहात ग्राम पंचायत अधिकारी संघटनेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीत ग्राम पंचायत अधिकाऱ्यांच्या विविध समस्या व विषयावर चर्चा करीत तालुका समितीचे पुनर्गठन करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला यावेळी सर्वानुमते तालुकाध्यक्ष पदी जयंत ठाकरे यांची तर सचिवपदी स्नेहल महाजन,उपाध्यक्ष नरेश डेहनकर, महिला उपाध्यक्ष कु.रमाताई सुटे,कोषाध्यक्ष दिनेश चांदेवार,सहसचिव अमित तिमांडे संघटक हरिचंद्र कळमकर, संघटिका कु. अजया झामरे मुख्य मार्गदर्शक हेमंत भोमले,महेंद्र ठाकरे, विकास सिडाम, प्रसिद्धी प्रमुख दिलीप बांबोळे यांची सर्वानुमते निवड करण्यांत आली.यावेळी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी प्रफुल्ल कांबळे,किशोर जाधव,ईश्वर परतेकी, भागवत आघावं, येरकुडे, महेंद्र ठाकरे सह तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

# पुणे येथील राष्ट्रीय सरपंच संसद परीषद बैठकीला वर्धा जिल्ह्यातील सहा सरपंचांचा सहभाग



**वर्धा जनमाध्यम :-** पुणे येथे आयोजित वारकरी संसद व सरपंच संसद पदाधिकारी परीषद बैठकीत सहभागी होण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील सहा सरपंच नुकतेच रवाना झाले आहे.

दिनांक १९ आणि २० जुलै रोजी आळंदी ,पुणे येथील हनुमान वाडी येथे वारकरी संसद आणि सरपंच संसद परीषद आयोजित करण्यात आली आहे. या संसद परीषदेत गाव तेथे वृक्षारोपण,सरपंच विमा कार्ड, गाव विकास आराखडा यावर तसेच विदर्भातील सरपंच संसद परीषदेबाबत चर्चा करण्यात येणार आहे.या सरपंच संसद परीषद बैठकीला वर्धा जिल्ह्यातील, दिनकर अंबुलकर (वरूड), सुनील साबळे (लहान आर्वी ), सुशील वडतकर (वडत), बाबाराव पाटील (पालोती) सौ. सुजाता ताकसांडे (सेवाग्राम), सौ. सविता अंबुलकर (काचनुर) सहभागी होत आहे. दरम्यान विदर्भातील सरपंच संसद परीषदेचे कार्यक्षेत्र विस्तारीत करण्याबाबत राष्ट्रीय समन्वयक योगेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली वेगळ्या बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय सरपंच संसद परीषद बैठकीचे वर्धा जिल्हा संयोजक दिनकर अंबुलकर यांनी दिली.

# मारहाण प्रकरणी पाचही आरोपीची न्यायालयीन कोठडीत रवानगी

**हिंगणघाट जनमाध्यम :** काही आक्षेपार्ह मजकुर समाज माध्यमावर प्रकाशित केल्याने राहुल दारुणकर व त्याचे आई-वडिल यांना मारहाण करण्याचा आरोप असलेल्या पाचही आरोपींना येथील कनिष्ठ न्यायालयाने एक दिवसाची न्यायालयीन कोठडी दिली असून या पाचही व्यक्तींना वर्धा न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे. शुक्रवारी सकाळी ८ वाजता सतीश धोबे, मनिष देवढे, दिनेश धोबे, भास्कर ठवरी, शकील अहमद हें स्वतःहून हिंगणघाट पोलीस ठाण्यात शरण आल्या नंतर पोलिसांनी त्यांना विविध कलमा अंतर्गत अटक करून त्यांना न्यायालयात हजर केले. न्यायमूर्तींनी या सर्वांना एक दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. न्यायालयात या पाचही व्यक्ती तर्फे ॲड अक्षय वाशीमकर व ॲड गजू वैद्य यांनी काम पाहिले.

### दिलगिरी

दिनांक १८ जुलै २०२५ रोजी 'दैनिक जनमाध्यम' मध्ये चुकीने २ जुलै २०२५ असे प्रकाशित झाले, त्याऐवजी १८ जुलै २०२५ असे आहे, चुकी बद्दल दिलगिरी व्यक्त करीत आहे,

**संपादक**

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

# मोतिबिंदू विरहीत अभियानः जिल्ह्यात २ लाख रुग्णांची होणार मोफत तपासणी

**वर्धा जनमाध्यम :** मोतिबिंदू मुक्त महाराष्ट्र अभियानांतर्गत एक पाऊल मोतिबिंदू विरहीत वर्धा जिल्हा हे अभियान पालकमंत्री यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र तपासणी शिबिर घेतले जात आहे. या शिबिरांमध्ये तब्बल २ लाखावर रुग्णांची तपासणी व ५ हजार रुग्णांची शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ दि.२२ जुलै रोजी चरखा सभागृह येथे होणार आहे.

जिल्हास्तरीय शुभारंभ व अभियानाच्या तयारीचा आढावा आज जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खताळे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हास्तरीय शुभारंभाच्या यशस्वीतेसाठी २७ समित्यांचे गठण करण्यात आले आहे. समिती प्रमुखांसह जबाबदारी सोपविलेले इतर अधिकारी, कर्मचारी देखील यावेळी उपस्थित होते.

चरखा सभागृह येथे जिल्हास्तरीय शुभारंभाला अनेक मंत्री व अन्य अतिथी उपस्थित राहणार आहे. भव्य स्वरुपात आयोजित शुभारंभ व आरोग्य तपासणीची सर्व प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी गठीत समितीच्या प्रमुखांकडून जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. जिल्ह्यात मोतिबिंदू विरहीत अभियान आरोग्य विभाग, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे, कस्तुरबा रुग्णालय सेवाग्राम, वर्धा नेत्र चिकित्सा असोशिएशन, खाजगी नेत्रतज्ज्ञांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.

शिबिरात नि:शुल्क मोतिबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया, नेत्र तपासणी व चष्मे वाटप, दंत तज्ञांमार्फत दंतरोग तपासणी, मधुमेह व उच्च रक्तदाब तपासणी व औषधोपचार केले जाणार आहे. तसेच आयुष्मान कार्ड नोंदणी व शासकीय आरोग्य योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मंगळवार दि.२२ जुलै रोजी अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ व वर्धा तालुकास्तरीय शिबिर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. सर्व आठही तालुक्यात एकून ८ तपासणी शिबिरे होणार आहे. सर्व ठिकाणी तज्ञ डॉक्टर्स उपस्थित राहतील. या डॉक्टर्सच्यावतीने २ लाखावर अधिक मोतिबिंदू, नेत्र व इतर आजाराची तपासणी करण्यात येणार असून शस्त्रक्रियांची आवश्यकता असलेल्या जवळपास ५ हजार रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे. वर्धा शहरातील तीन वेगवेगळ्या रुग्णालयांसह नागपूर येथील काही धर्मादाय रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया केल्या जातील. अभियान २२ जुलै रोजी सुरु होऊन दि.१४ ऑगस्ट पर्यंत संपणार आहे.

अभियानाच्या यशस्वीतेसाठी जिल्हास्तरावर समन्वय समिती व कार्यकारी समिती अशा दोन समित्या करण्यात आल्या आहे. समन्वय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी तर कार्यकारी समितीचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी आहे. तालुकास्तरावर उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत समित्या करण्यात आल्या आहे. या समित्या रुग्णांची नोंदणी, त्यांची शिबिराच्या ठिकाणी वाहतूक व्यवस्था, तपासणीच्या दिवसाचे नियोजन आदींचे सुक्ष्म नियोजन करणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीचे चोखपणे नियोजन करण्याच्या सूचना बैठकीत केल्या.



# विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात १६ विधेयके मंजूर-मुख्यमंत्री

## अंतिम आठवडा प्रस्तावावरील उत्तरातून राज्याच्या पुढील वाटचालीची दिशा केली स्पष्ट

**मुंबई/प्रतिनिधी :**विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकासह महत्त्वाची १६ विधेयके मंजूर करण्यात आली. तसेच अंतिम आठवडा प्रस्तावावरील उत्तरामध्ये महाराष्ट्राच्या पुढील वाटचालीची दिशा स्पष्ट केली आहे. सर्व निर्णय सामान्य जनतेच्या हितासाठी घेतले गेले असून, विकासाला वेग देण्याचे काम अधिवेशनात झाले असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.



महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाची सांगता झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ऊमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ऊमुख्यमंत्री अजित पवार यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत अधिवेशनातील कामकाजाची माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, यंदा राज्यात ९० टक्के पावसाची नोंद झाली असून, काही भागांत पूरपरिस्थितीही उद्भवली आहे. अशा ठिकाणी एनडीआरएफ व एसडीआरएफच्या माध्यमातून मदत पोहोचवण्यात आली असून, नुकसानग्रस्तांसाठी पंचनामे सुरू झाले आहेत. ज्या ठिकाणी पंचनामे पूर्ण झाले तेथे निधी वितरण करण्यात येत आहे. राज्यातील मोठ्या धरणांमध्ये ६७ टक्के पाणीसाठा झाला आहे. यंदाचा खरीप हंगाम समाधानकारक ठरेल, असे ते म्हणाले. अधिवेशनात एकूण १६ विधेयके मंजूर करण्यात आली. त्यामध्ये अनुसूचित जाती आणि जमाती आयोगांना वैधानिक दर्जा देणारी विधेयके, महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक, गौण खनिकर्म प्राधिकरण विधेयक, त्र्यंबके□ार-नाशिक कुंभमेळा प्राधिकरण विधेयक आणि मकोका कायद्यात अंमलपदार्थांचा समावेशासंबंधातील सुधारणा अशा अनेक महत्त्वाच्या विधेयकांचा समावेश होता. महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा लोकशाही मार्गाने तयार केला असून, कोणालाही थेट अटक करण्याचा अधिकार यामध्ये नाही. संस्थांवर बंदी घालण्यासाठी न्यायालयीन समितीची परवानगी आवश्यक आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, पुरवणी मागण्यांतून मेट्रो प्रकल्प, महानगरपालिका, जिल्हा परिषद, तसेच पिण्याचे पाणी, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शिष्यवृत्ती योजना यांना भरघोस निधी वितरित करण्यात आला आहे. दिव्यांगांना देण्यात येणा-या भत्त्यांमध्ये १५०० रुपयांवरून २५०० रुपये करण्यात आला असून, शिक्षक टप्पा अनुदान देखील जाहीर करण्यात आले. तसेच अनुकंपा धोरणात सुधारणा करण्यात आली आहे. पशुसंवर्धन क्षेत्राला कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय या अधिवेशनात घेण्यात आला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.विधीमंडळाच्या आवारात काल घडलेली घटना दुर्देवी असून अशी घटना यानंतर घडू नये, यासाठी विधानसभा अध्यक्षांनी दखल घेतली आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**■ गडकोट किल्ल्यांचा जागतिक वारशामध्ये समावेश महाराष्ट्रासाठी गौरवाचा क्षण**

छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ गडकोट युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाल्याची घोषणा हा महाराष्ट्रासाठी गौरवाचा क्षण आहे. याबद्दल दोन्ही सभागृहात आनंद व्यक्त करण्यात आला. तसेच महाराष्ट्राचे सुपूत्र, देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा हृद्यसत्कारही या अधिवेशन काळात करण्यात आला, असेही त्यांनी यावेळी सांगितले.मराठा समाजाच्या विकासासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला ७५० कोटींचा निधी देण्याचा निर्णय घेतला असून यातील पहिला टप्प्याच्या निधीची वितरण करण्यात आल्याची माहितीही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिली.

**■ पावसाळी अधिवेशनात सर्वसमान्यांच्या हिताचे निर्णय घेतले** - ऊमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ऊमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सर्वसमान्यांच्या हिताचे निर्णय घेतले. विरोधी पक्षाच्या प्रत्येक प्रश्न, लक्षवेधीवर ऊत्तर देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. याशिवाय अधिवेशनात झोपडपट्टी पुनर्विकास, क्लस्टर योजना, परवडणा-या घरांची निर्मिती, महिलांसाठी वसतीगृह, पोलिस व गिरणी कामगारांसाठी घरांची कामगिरी यावरही महत्त्वाचे निर्णय घेतले आहे. मुंबईच्या झोपडपट्टी विकासाला चालना देण्यासाठी शासकीय यंत्रणा व खासगी क्षेत्रात संयुक्त ऊक्रम राबवण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.अधिवेशनाच्या कामकाजाशिवाय विविध बैठकांच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात कामे करण्यात आली आहेत. मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतील १५० दिवस कृती आराखड्याचा आढावा घेण्यात आला असून यामाध्यमातून प्रशासनास गती देण्याचे काम करण्यात आले आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**■ अर्धातास चर्चा व लक्षवेधी सूचनांवर सर्वाधिक चर्चा** - ऊमुख्यमंत्री अजित पवार

ऊमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, या अधिवेशनात ५७ हजार ५०९ कोटींची पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या. अनेक चांगली कामे या अधिवेशनात झाली आहे. यापूर्वी पेक्षा यंदा मोठ्या प्रमाणात अर्धातास चर्चा व लक्षवेधी सूचनांवर चर्चा झाली. रात्रभर तयारी करून अधिका-यांनी लक्षवेधी प्रश्नांची ऊत्तरं दिली. एकेका दिवशी २५-३० लक्षवेधी मांडल्या गेल्या, जे अभूतपूर्व होते.विधीमंडळाच्या आवारात काल घडलेल्या घटनेवर तीनही मान्यवरांनी खेद व्यक्तकरून अशी घटना यानंतर घडू नये, यासाठी ऊाययोजना करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### विधेयकांची माहिती

| | |
|---|---|
| दोन्ही सभागृहात मंजूर विधेयके | - १७ |
| विधानसभेत प्रलंबित विधेयके | - ०० |
| विधान परिषदेत प्रलंबित विधेयके | - ०० |
| मागे घेण्यात आलेली विधेयके | - ०१ |

### दोन्ही सभागृहात मंजूर विधेयके

(१) महाराष्ट्र (ग्रामपंचातीचा, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२५ (ग्रामविकास विभाग)

(२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२५ (विशेष सभेमध्ये संमत केलेल्या ठरावाद्वारे, पंचायत सदस्यांनी अध्यक्षास काढून टाकणेबाबतच्या कलम ३४१ ब-५ मधील तरतुदीमध्ये बदल करणे) (नगर विकास विभाग)

(३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ (मालमत्ता कर भरण्यासाठी रकमेत सूट देण्याची तरतूद करण्यासाठी कलम १५० क मध्ये सुधारणा) (नगर विकास विभाग)

(४) नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण विधेयक, २०२५ (नाशिक व त्रंबकेश्वर तालुक्यांमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याकरिता) (नगर विकास विभाग)

(५) गडचिरोली जिल्हा खणिकर्म प्राधिकरण विधेयक, २०२५ (गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण स्थापन करण्याकरीता) (खनिकर्म विभाग)

(६) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५ (महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातींच्या हिताचे संरक्षण व रक्षण करण्याच्या आणि त्यांचे कल्याण व विकास करण्यासाठी सुधारात्मक ऊाययोजनांची शिफारस करण्याच्या दृष्टीने राज्यात अनुसूचित जमाती आयोग घटीत करण्याकरीता)

(७) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५ (महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातींच्या हिताचे संरक्षण व रक्षण करण्याच्या आणि त्यांचे कल्याण व विकास करण्यासाठी सुधारात्मक ऊाययोजनांची शिफारस करण्याच्या दृष्टीने राज्यात अनुसूचित जाती आयोग घटीत करण्याकरीता) (सामाजिक न्याय विभाग)

(८) महाराष्ट्र (द्वितिय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२५ (वित्त विभाग)

(९) महाराष्ट्र वस्तु व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२५ (वित्त विभाग)

(१०) महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती, किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील ऊक्रम कंपनीला प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ (वित्त विभाग)

(११) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (प्रवेश व फी यांचे विनियमन) ('अनिवासी भारतीय' शब्दाची व्याख्या बदलण्याकरीता) (सुधारणा) विधेयक, २०२५ (ऊच्च व तंत्र शिक्षण विभाग)

(१२) महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४ (गृह विभाग)

(१३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२५ (गृहनिर्माण विभाग)

(१४) महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५ (गृह विभाग)

(१५) महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ (ऊच्च व तंत्र शिक्षण विभाग)

(१६) महाराष्ट्र ग्रामपंचात (सुधारणा) विधेयक, २०२५ (ग्रामविकास विभाग)

(१७) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) विधेयक, २०२५

## राजमाता जिजाऊ मासाहेब स्मारकाच्या जतन, संवर्धनासह विकासकामांना आवश्यक निधी देणार-मंत्री इंद्रनील नाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** राजमाता जिजाउ मासाहेब यांच्या पाचाड ( जि. रायगड) आणि सिंदखेडराजा ( जि. बुलढाणा) येथील स्मारकांचे जतन , संवर्धन आणि विकासकामांना आवश्यक निधी ऊलब्ध करून दिला जाईल. तसेच भारतीय पुरातत्त्व विभागाकडून अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आली आहे, असे पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या सूचनेच्या ऊत्तरात सांगितले.



विधानसभा सदस्य सिद्धार्थ खरात यांनी पाचाड ( जि. रायगड) आणि सिंदखेडराजा ( जि. बुलढाणा) येथील राजमाता जिजाउ मासाहेब यांच्या स्मारक कामासंदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधी चर्चेत सदस्य अभिजीत पाटील यांनी ऊप्रश्न विचारात सहभाग घेतला.राज्यमंत्री श्री. नाईक यांनी सांगितले, की पाचाड येथील राजमाता जिजाउ मासाहेब यांचे समाधीस्थळ व तेथील राजवाडा भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागामार्फत संरक्षित स्मारक आहे. त्या ठिकाणच्या संवर्धनाची जबाबदारी केंद्रीय पुरातत्व विभागाची असल्यामुळे त्या ठिकाणी कोणतीही सुविधा त्यांच्या पूर्व परवानगीशिवाय करता येत नाही. आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत पाचाड येथे शिवसृष्टी ऊभारण्यासाठी ५० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, रायगड यांना ऊलब्ध करून देण्यात आला आहे. या ठिकाणी करण्यात येणा-या विकासकामांना आवश्यक परवानग्या घेउन ती काम जात आहेत.सिंदखेडराजा येथील राजमाता जिजाउ मासाहेब यांचे जन्मस्थळ हे राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय अंतर्गत राज्य संरक्षित स्मारक आहे.

## राज्यात 357 ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला मिळणार नवीन इमारती

### जिल्हा नियोजन मधून 458 कोटी होणार खर्च– पंकजा मुंडे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या नियोजनबद्ध आणि गतिशील काम करण्याच्या पध्दतीमुळे राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. जिल्हा वार्षिक योजनेतून इमारत बांधकामासह दवाखान्याची दुरूस्ती, स्वच्छतागृह व ऊकरण खरेदी यासाठी ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाची सुत्रे हातात घेतल्यापासून श्रीमती पंकजा मुंडे यांनी एका मागोमाग एक चांगल्या निर्णयासह आपल्या कामाचा धडाका सुरू केला आहे. पशुसंवर्धनला कृषी व्यवसायाचा दर्जा देणारे देशातील पहिले राज्य करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती देण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या सात महसूली विभागातील ३४ जिल्ह्यात एकूण ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. नवीन इमारत बांधण्याकरिता २८७ कोटी ७६ लाख ४४ हजार तर दुरुस्तीसाठी १२१ कोटी ११ लाख ८२ हजार, स्वच्छतागृह साठी २५ कोटी १७ लाख २० हजार, विविध ऊकरणे खरेदीसाठी २४ कोटी ३५ लाख ८८ हजार असा एकूण ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपये निधी ऊलब्ध करून देण्यात येणार आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ही सर्व कामे प्रस्तावित करण्यात येणार आहेत.

बीड जिल्ह्यात सर्व सहा मतदारसंघात २४ इमारतीसाठी ९ कोटी ४० लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात ज्या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत, त्यांची विभागनिहाय संख्या पुढील प्रमाणे- मुंबई विभाग - ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात १३, पुणे विभाग - पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यात १२५, नाशिक विभाग - नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर जिल्ह्यात ५५, छत्रपती संभाजीनगर विभाग - छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड जिल्ह्यात ५१, लातूर विभाग- लातूर, नांदेड, धाराशिव, हिंगोली जिल्ह्यात ३९, अमरावती विभाग- अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ जिल्ह्यात ३८, नागपूर विभाग- नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यात ३६ अशा एकूण ३२७ ठिकाणी नवीन इमारतीसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

## राज्यात गणेशोत्सव होणार आता राज्य महोत्सव

**मुंबई/प्रतिनिधी :** शेकडो वर्षाची घरगुती गणेशोत्सव परंपरा व अनेक वर्षापासूनची सार्वजनिक गणेशोत्सव परंपरा म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व सामाजिक समरसतेचे मानबिंदू आहे. त्यामुळे राज्यात आता गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार आहे, अशी घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज विधानपरिषद आणि विधानसभेत निवेदनाद्वारे केली. शेलार म्हणाले, गणेशोत्सवाचे महत्त्व व ओळख संपूर्ण जगभर व्हावी, आपल्या परंपरेची आधुनिकतेशी सांगड व्हावी, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे असणारे गणेशोत्सव हे व्यासपीठ आणखी मजबूत व्हावे, गणेशोत्सवासंबंधी सर्व घटक एकत्र जोडले जावेत, पर्यटन वाढावे, आपल्या समृद्ध परंपरा रीतीरिवाजांचे जतन-संवर्धन व्हावे आणि महाराष्ट्राचे स्थान जगाच्या नकाशावर ठळक व्हावे, यासाठी




गणेशोत्सव आता राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

राज्याच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीचा पाया सामाजिक एकरु पतेने घातलेला आहे. ही एकरू पता निर्माण होण्यासाठी गणेशोत्सवाने मोलाची भूमिका पार पडलेली आहे. गणेशोत्सवाचे परंपरागत स्वरूप कायम ठेवून त्यास आधुनिकतेची जोड देण्यासाठी आणि राज्याचा प्रत्येक नागरिक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या या महोत्सवाशी जोडला जाण्यासाठी राज्य महोत्सव होणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र शासन सुलभकर्ता म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, असेही सांस्कृतिक कार्यमंत्री शेलार यांनी सांगितले.

एका लोगोचे अनावरण, व्याख्यानमाला, अध्यात्म नाट्यरंग महोत्सवाचेही आयोजन करण्यात येईल. राज्यातील महत्वाची मंदीरे आणि सार्वजनिक गणेशोत्सवाचे देखावे यांचे ऑनलाइन दर्शन घरबसल्या घेता येण्यासाठी सुविधा ऊलब्ध करून देण्यात येतील. ऊत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळ अंतर्गत तालुका स्तरावर स्पर्धेद्वारे विविध पारितोषिके देण्यात येतील.

## विदर्भातील नझूल जमीनींबाबत विशेष अभय योजनेला एक वर्षाची मुदतवाढ देणार

**मुंबई/प्रतिनिधी :** विदर्भातील अमरावती आणि नागपूर विभागात निवासी प्रयोजनार्थ भाडेतत्त्वावर दिलेल्या नझूल जमिनींबाबत विशेष अभय योजना सध्या अस्तित्वात आहे. या योजनेला एक वर्षाची मुदतवाढ देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे सांगितले.

महसूल मंत्री श्री बावनकुळे म्हणाले, याबाबत १६ मार्च २०२४ रोजी शासन निर्णयानुसार निवासी प्रयोजनार्थ लिलावाद्वारे व अन्य पद्धतीने भाडेतत्त्वावर दिलेल्या जमिनींना ही विशेष अभय योजना लागू आहे. अशा नझूल जमिनींबाबत प्रचलित वार्षिक दर विवरण पत्राच्या बाजार मूल्याच्या दोन टक्के अधिमूल्य आकारण्याची तरतूद आहे. ही अभय योजना ३१ जुलै २०२५ पर्यंत कार्यान्वित होती. या योजनेला एक वर्षाची मुदतवाढ देउन ३० जुलै २०२६ पर्यंत लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या मान्यतेने घेण्यात येईल.

## मी कोणाला छेडत नाही; पण मला कुणी छेडले तर सोडत नाही-शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी माणूस, मराठी भाषा आमचा श्वास आहे आणि हिंदुत्व आमचा प्राण आहे. पालिका निवडणुका जवळ आल्या की मराठीबद्दल, महाराष्ट्राबद्दल आणि मुंबईबद्दल जो काही अपप्रचार होतो तो सगळ्यांना माहिती आहे. 'वरु न किर्तन आणि आतून तमाशा' असा ऊबाठाचा प्रकार आहे. बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघेंच्या तालमीत तयार झालेला मी प्रामाणिक कार्यकर्ता आहे. मी कोणाला छेडत नाही. पण मला कुणी छेडलं किंवा त्रास दिला तर मी कोणालाही सोडत नाही', अशा शब्दांत ऊमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऊद्धव ठाकरेंच्या ऊबाठा गटाला इशारा दिला. विधान परिषदेत अंतिम आठवडा प्रस्तावाला ऊत्तर देताना ते बोलत होते.

'मराठीचं प्रेम आम्हाला शिकवण्याची गरज नाही. आम्ही जन्मलो मराठी, मराठीसाठीच जगणार आणि मराठीसाठीच खपणार. मराठी माणूस तुमच्या फेक नरेटिव्हला आता फसणार नाही. कारण तुमच्या तोंडी 'म' म्हणजे महापालिकेचा, मलिद्याचा, मतलबाचा आणि मतांचा आहे. तुमच्या मनात फक्त मतांचे राजकारण आहे. पण मी आरोपांना आरोपाने नाही, तर कामातून ऊत्तर देणारा कार्यकर्ता आहे,' अशी खरमरीत टीका शिंदे यांनी केली.

'इतक्या झटपट रंग बदलणारा सरडा महाराष्ट्राने पाहिला नाही. ज्यांना कस्पटासमान समजले, संपलेले लोक असल्याचे हिणवले; आज मात्र त्यांच्याच मागे रोज जावे लागत आहे. 'चल मेरे भाई, तेरे हाथ जोडतां हू' अशी त्यांची अवस्था झाली आहे. भरलेल्या ताटाचे विचारता पण निकालानंतर जनतेच्या मतांची माती कोणी केली ते सांगा. २०१९च्या निवडणूक निकालानंतर देवेंद्रजींनी ५० फोन केले. ते का नाही ऊचलले ते सांगा. देवेंद्रजींच्या पाठीत खंजीर कोणी खुपसला हे आम्हाला माहिती आहे. आम्ही सत्ता सोडून गेलो पण गद्दारी तुम्ही केली', अशी टीकाही ऊमुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

**फडवणीसांमुळे शिवसेनेला मुंबईचे महापौरपद**

'मुंबई महापालिकेच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपला मिळालेलं महापौरपद केवळ आपल्या विनंतीमुळे शिवसेनेला बहाल केलं गेलं. या घटनेला आमदार मिलिंद नार्वेकर साक्षीदार आहेत. भाजपने महापौरपदाची तयार केली होती, मात्र तुम्ही देवेंद्रजींना विनंती केली की महापौरपद सोडा आणि शिवसेनेला द्या. त्यांनी अर्ध्या तासात विचार करु न पत्रकार परिषद घेत महापौरपद शिवसेनेला देउन टाकले. पण २०१९ मध्ये तुम्ही दगा, धोका आणि विश्वासघात करु न त्याची परतफेड



केलीत,' अशी टीकाही शिंदे यांनी केली.

## विधानभवनातून

### राज्यातील महत्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांना गती- मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्रातील विविध महत्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांना गती



देण्यात येत असून मेट्रो, विमानतळ, रेल्वे, टनेल, सी-लिंक आणि क?रिड?र यांसारख्या प्रकल्पांना वेगाने चालना देण्यात येत आहे. राज्याच्या विकासासाठी आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करून शहरी आणि ग्रामीण विकास अधिक गतिमान केला जात आहे. तसेच, गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यात आली आहे. यामुळे सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणुकीसारखे गुन्हे ऊघडकीस आणण्याचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. सुरक्षिततेपासून विकासापर्यंत महाराष्ट्राच्या विकासाची वाटचाल सुरू आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. विधानसभेत म.वि.स.नियम २९२अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऊत्तर देताना बोलत होते.

### राज्यातील गुन्हेगारीत लक्षणीय घट, सायबर कॉर्पोरेशन स्थापन।

राज्यात २०२३ च्या तुलनेत यावर्षी तब्बल ११ हजार ६५९ गुन्ह्यांत घट झाली असून, गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण कमी झाले आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये ऊघडकीस येण्याचे प्रमाण १६ टक्क्यांवरून १९ टक्क्यांवर पोचले आहे. आर्थिक फसवणुकीतील परत मिळणा-या रकमेचे प्रमाण २०.७५ टक्क्यांवरून ६१ टक्क्यांवर आले आहे. गोल्डन अवरमध्ये माहिती मिळाल्यास ९० टक्के प्रकरणांत पैसे वाचवता येतात. सायबर सुरक्षेसाठी सायबर कार्पोरेशन स्थापन करण्यात आले असून जिल्ह्यांत ५० सायबर प्रयोगशाळा सुरु करण्यात आल्या आहेत. तसेच सायबर तक्रारींसाठी १९४५ व १९३० हे विशेष क्रमांक कार्यान्वित करण्यात आले आहेत. महिला अत्याचाराच्या घटनेतील ९१ टक्के प्रकरणे ऊघडकीस आणण्यात यश आले आहे, बलात्काराच्या घटनेत ९८ टक्के आरोपींची ओळख पटली आहे. तसेच बलात्कार प्रकरणांत ६० दिवसांत निर्णय होण्याचे प्रमाणही ९७.३ टक्क्यांपर्यत वाढले आहे.

### रेल्वेचे सर्व डबे एसी होणार; तिकीट दर वाढणार नाही

ऊनगरीय रेल्वेला दरवाजे नसल्याने दुर्दैवी दुर्घटना घडत आहेत. यावर ऊाययोजना म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री यांच्याकडे मेट्रोसारखे डबे ऊनगरीय रेल्वेला द्यावे, अशी मागणी केली आहे. या संदर्भात सकारात्मक निर्णय झाला असून याची लवकरच घोषणा केली जाईल. त्यामुळे प्रवाशांना मुंबईतील ऊनगरीय रेल्वेचे सर्व डबे मेट्रोसारखे एसी आणि दरवाजे बंद असणारे ऊलब्ध होणार आहेत. यामध्ये तिकीटदर न वाढवता प्रवाशांना ही सेवा ऊलब्ध होणार आहे. तसेच मेट्रो, रेल्वे, मोनोरेल आणि बेस्ट बसमधून एकाच तिकिटावर प्रवास करणे लवकरच मुंबईकरांना शक्य होणार आहे. यासाठी एकात्मिक तिकीट प्रणाली विकसित करण्यात येत आहे.

### अंमली पदार्थविरोधात कठोर कारवाई

अंमली पदार्थाच्या विरोधात राज्यशासनाने कारवाईची कडक भूमिका घेतली आहे. २०१८ अखेरीस १५६८ आरोपींना अटक करण्यात आली होती, तर २०२५ अखेरीस ही संख्या वाढून २१९८ झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक पोलिस ठाण्यात आता नार्कोटिक्ससाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात आले आहेत. अंमली पदार्थ प्रकरणांमध्ये जे अधिकारी थेट किंवा अप्रत्यक्षपणे गुंतलेले आढळतील, त्यांचे केवळ निलंबन न करता आता थेट बडतर्फीची कारवाई करण्यात येणार आहे.

### शेतक–यांसाठी हरित वीज क्रांती।

शेतक-यांना 'हरित वीज' (ग्रीन एनर्जी) पुरवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. या निर्णयामुळे राज्याला वीज खरेदीत १० हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे. राज्याच्या शाश्वत विकासासाठी 'ब्लू प्रिंट' तयार करण्यात आली असून, सध्या ५० टक्के वीज हरित स्रोतांतून निर्माण होते. पुढील पाच वर्षांत विजेचे दर कमी होतील. पीएम कुसुम योजनेअंतर्गत राज्यात ६० टक्के कृषी पंप बसविले आहेत तीन महिन्यात ३ लाख ८६ हजार कृषी पंप बसवण्यात आले आहेत.यामुळे २३ लाख एकर जमीन ओलिताखाली आली आहे. प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेंतर्गत घराच्या छतावर 'सोलर रूफ टॉप' यंत्रणा बसवण्यात येत आहे. या योजनेचा लाभ ३० लाख कुटुंबांना होणार असून वीजबिल भरावे लागणार नाही.

### जनसुरक्षा कायदा

जनसुरक्षा कायद्यानुसार कोणत्याही व्यक्तीला थेट अटक करता येत नाही. व्यक्तीविरोधात अटकेची कारवाई करण्यासाठी ठोस आणि न्यायिकरित्या ग्राह्य धरता येणारे पुरावे आवश्यक असतात. तसेच, एखाद्या संघटनेवर बंदी घालायची असल्यासही ती कार्यवाही न्यायालयीन देखरेखीखाली होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान आणि लोकशाही तत्वांचे काटेकोर पालन करूनच महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा तयार करण्यात आला आहे.

### बनावट शासन निर्णय; गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई केलेल्या अधिका-यांची चौकशी करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्ह्यात बनावट शासन निर्णयाच्या आधारे केलेल्या कामासंदर्भात गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई, हलगर्जीपणा केलेल्या संबधित अधिका-यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या ऊत्तरात सांगितले. विधानसभा सदस्य काशिनाथ दाते यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात लेखाशीर्ष २५१५ १२३८ मध्ये बनावट शासन निर्णयाच्या आधारे झालेल्या कामांच्या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडली. ग्रामविकास मंत्री श्री. गोरे यांनीं सांगितले, बनावट शासन निर्णयाद्वारे अहिल्यानगर जिल्ह्यात लेखाशीर्ष २५१५ १२३८ मधून ६ कोटी ९५ लाखाची ४५ कामे मंजूर केल्याचे निदर्शनास आले. ही बाब लक्षात येताच याबाबत तातडीने संबंधितावर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश शासनाकडून देण्यात आले. गुन्हे दाखल करण्यास स्मरणपत्र पाठवूनही ज्या अधिका-यांनी गुन्हे दाखल करण्यास विलंब केला त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच बनावट शासन निर्णय संदर्भात चौकशी करून दोषींवर गुन्हा दखल केला जाईल.

### दिव्यांगांसाठीच्या अनुदानात दरमहा 1500 वरून 2500 इतकी वाढ

**मुंबई/प्रतिनिधी ::** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत राज्यात विविध योजनांच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना नियमित आर्थिक सहाय्य दिले जाते. सध्या दिव्यांग लाभार्थ्यांना १५०० इतके अनुदान दिले जात होते. हे अनुदान दरमहा २५०० रुपये देण्यात येणार असल्याची घोषणा इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे केली. या निर्णयामुळे संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजनेच्या लाभार्थ्यांना दरमहा २५०० रुपये इतके अर्थसहाय्य मिळणार आहे.

### यावर्षी दीड लाख गोविंदांना विमा संरक्षण

**मुंबई/प्रतिनिधी :**दहीहंडीमध्ये मानवी मनोरे रचण्याच्या पारंपरिक प्रथेस साहसी खेळाचा दर्जा शासनाने दिला आहे. गोविंदाचा वाढता प्रतिसाद विचारात घेवून सन २०२५ मधील दहीहंडी ऊत्सवाच्या अनुषंगाने क्रीडा विभागाकडून राज्यातील दीड लाख गोविंदाना शासकीय विमा कंपनीमार्फत विमा संरक्षण देण्याचा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत दिली. यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना क्रीडामंत्री श्री. भरणे म्हणाले, राज्य शासनाच्या या निर्णयामुळे गोविंदामध्ये ऊत्साहाचे वातावरण आहे. याकरिता अंदाजे १ कोटी २५ लाख एवढा निधी राज्य क्रीडा विकास निधीतून ऊलब्ध करून देण्यात येईल. सन २०२३ व २०२४ मध्ये प्रत्येकी ७५ हजार गोविंदांना ओरीएंटल इन्शुरन्स कंपनीमार्फत विमासंरक्षण देण्यात आले होते.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# अर्थव्यवस्थेचा आलेख

जीवनावश्यक वस्तूंची वाढती दरवाढ, अत्यावश्यक सेवांच्या दरात वाढ आदी कारणाने सर्वसामान्यांना महागाईच्या झळा बसत असताना आणि त्याकारणाने जगणे असह्य होत असताना एक सुवार्ता आहे. या झळांची तीव्रता कमी झाली असून त्याचे बाजारावरील अनुकूल परिणामही दिसू लागले आहेत. अन्नधान्य आणि इंधनाच्या किमती लक्षणीयरीत्या घसरल्याने, जूनमध्ये घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर ०.१३ टक्क्यांवर घसरला. ऑक्टोबर २०२३ नंतर प्रथमच घाऊक महागाई दर शून्याखाली गेला. सोमवारी प्रसिद्ध झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार, जून २०२५ मध्ये घाऊक महागाईचा नकारात्मक दर हा मुख्यतः अन्नधान्य वस्तू, खनिज तेल, मूलभूत धातूंचे उत्पादन आणि नैसर्गिक वायू इत्यादींच्या किमतींत घट झाल्याचा परिणाम आहे. इस्त्रायल विरुद्ध इराण युद्ध आणखी भडकले असते, तर कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू या दोन्हींचे भाव आकाशला भिडले असते. तशी चिन्हे दिसू लागलेली होती. परंतु युद्ध थांबल्यामुळे परिस्थिती सुधारली. ३० मे २०२५ रोजी कच्च्या तेलाचे दर प्रतिबॅरल ६२ डॉलर इतके खाली घसरले. परंतु इस्त्रायलने इराणमधील अण्वस्त्रांच्या ठिकाणांवर हावाई हल्ले केल्यामुळे हे भाव ७८ डॉलर प्रतिबॅरलवर पोहोचले होते. आता कच्च्या तेलाच्या किमती प्रतिबॅरल ६९ डॉलरच्या आसपास आलेल्या आहेत. केंद्रीय उद्योग मंत्रालयाने दिलेल्या निवेदनानुसार, भारतातील उत्पादित वस्तूंच्या किमतींतही घट झालेली आहे. घाऊक किंमत निर्देशांकावर आधारलेला महागाई दर मे २०२५ मध्ये ०.३९ टक्के होता. त्या तुलनेत जूनमध्ये त्यात ५२ आधारबिंदूंची घसरण झाली. २०२४ च्या जूनमध्ये भाववाढीचा दर ३.४३ टक्के इतका होता. मुळात यावर्षीच्या जूनमध्ये वार्षिक तुलनेत भाज्यांच्या किमती २२ टक्क्यांनी घसरल्या. त्याअगोदरच्या मे महिन्यात त्यात २१ टक्क्यांची घसरण झाली. यावेळच्या मे महिन्यात अन्नधान्यांच्या वस्तूंत १.५६ टक्के, तर जूनमध्ये पावणेचार टक्क्यांची घसरण झाली. इंधन आणि विजेच्या किमतीही २.६५ टक्क्यांनी जूनमध्ये कोसळल्या; तर उत्पादित वस्तूंच्या किमतीतील वाढ जूनमध्ये फक्त १.९७ टक्के इतकी होती. सणासुदीचे दिवस जवळ आल्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने महागाईबाबत दिलासा मिळणे, हे फार महत्त्वाचे आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांना आयकरावर अनेक सवलती जाहीर करण्यात आल्या. त्यामुळे भाववाढीला तोंड देणे त्यांना अधिक सोपे जात आहे. केंद्र सरकारने राजकोषीय तुटीचे प्रमाण कमी केले आहे. २०२४ च्या अर्थसंकल्पातच 'खाद्यतेल मिशन'ची घोषणा करून त्यासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. कडधान्यांत आत्मनिर्भरता साधण्यासाठीही सहा वर्षे कालावधीची दीर्घकालीन योजना राबवली जाणार आहे. संपूर्ण खाद्यतेल आत्मनिर्भरता निदान पुढील २० वर्षांत तरी शक्य नसली, तरी मागील अनुभव पहिल्यास कडधान्यांतील आत्मनिर्भरता येत्या दोन वर्षांत गाठणे शक्य होईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. कारण डाळींची टंचाई फार तीव्र नाही. तूर, मूग आणि मसूर या खाण्यासाठी वापराच्या दृष्टीने एकमेकींशी संलग्न असलेल्या डाळींचे एकूण उत्पादन जरी ३०-३५ लाख टनांनी वाढले, तरी ते पुरेसे आहे. कारण क्षेत्रवाढ आणि उत्पादकतावाढ असा दुहेरी प्रयत्न करून हरभऱ्याच्या उत्पादनातदेखील १०-१५ लाख टन वाढ सहज शक्य आहे. म्हणजे एकूण अतिरिक्त उपलब्धता ५० लाख टनांची झाल्यास आपण किमान कडधन्यांत आत्मनिर्भर होऊ शकू. कडधान्यांच्या क्षेत्रात २०१७ ते २०२१ या काळात भारत ८५ ते ९० टक्के आत्मनिर्भर होता. मागच्या अर्थसंकल्पात पंचवार्षिक कालावधीचे 'कापूस मिशन' सुरू करण्याची घोषणा झाली. त्यात उत्पादकतावाढ आणि शाश्वतता या गोष्टींवर भर देण्यात आला आहे. उत्तम दर्जाच्या कापूस उत्पादनावर लक्ष्य केंद्रित करण्यात आले आहे. यामुळे आज ना उद्या कपड्यांचे भावही कमी होऊ शकतील. याव्यतिरिक्त मत्स्य उत्पादन आणि निर्यातीला उत्तेजन देण्यासाठी 'पंतप्रधान धनधान्य कार्यक्रमांतर्गत' १०० जिल्ह्यांत उत्पादकतावाढ अभियान राबवले जात आहे. दुसरीकडे, गेल्या काही दिवसांत आवक वाढल्यामुळे लसूण, घेवडा आणि शेवग्याच्या दरांतही घट झाली. भाज्या, डाळी, मांस आणि दुधासह अन्नपदार्थांच्या किमती कमी झाल्यामुळे जूनमध्ये किरकोळ महागाई दराची साडेसहा वर्षांतील विक्रमी अशी २.१० टक्क्यांपर्यंत घसरण दिसून आली. म्हणजे घाऊक किमतींबरोबरच किरकोळ किमतीही घसरत आहेत. एकीकडे हा दिलासा मिळत असला तरी यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच अवकाळीच फटका बसला. अतिवृष्टीमुळे पिके पाण्याखाली गेल्याने महाराष्ट्रात शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले. सातत्याने होणाऱ्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पिके सतत पाण्याखाली राहिल्यामुळे कुजून गेली. यंदा मे महिन्याच्या अखेरीस पूर्वमोसमी पाऊस झाला. त्यानंतर लगेचच मोसमी पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांना धूळवाफ पेरणी करता आली नाही. सध्या देशातील बहुतेक भागांत मोसमी पाऊस पोहोचला असून, एकूण पाऊसमान सरासरीपेक्षा खूप अधिक राहिले. विदर्भ व अन्य ठिकाणचे काही अपवाद वगळता एकंदर खरीप पेरण्या चांगल्या झाल्या असल्याची सरकारी आकडेवारी आहे. रिझर्व्ह बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी देशांतर्गत सकल उत्पादनवृद्धीचा, म्हणजेच जीडीपीवाढीचा अंदाज ६.५ टक्क्यांवर कायम ठेवला आहे. जागतिक अस्थिरता आणि अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था स्थिर व समर्थ असून, नवनव्या संधी उपलब्ध होत असल्याचे आशादायी चित्र रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी अलीकडेच रंगवले आहे. मात्र भाववाढ कमी झाली असली, तरी शेतकऱ्याच्या मालाला पुरेसे भाव मिळत नाहीत आणि अतिवृष्टीमुळे तो अडचणीतही आला आहे. त्याचप्रमाणे देशातील उत्पादन क्षेत्राचा विकास अपेक्षेप्रमाणे नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. या स्थितीत त्याची झळ समाजातील कमुकवत घटकाला आणि कामगार वर्गाला बसते. त्याकडे लक्ष देताना अर्थव्यवस्थेच्या कमजोर स्थळांवर लक्ष्य केंद्रित केल्यासच गोरगरीब वर्ग व शेतकऱ्यांना खरा दिलासा मिळू शकेल.

# हे कसले सभागृहातील सभ्य शहाणे ?



काल परवा लोकशाहीच्या पवित्र मंदिरात म्हणजे महाराष्ट्र विधान भवनात दोन सभ्य समर्थकात प्रचंड हाणामारी झाल्याचे वृत्त महाराष्ट्राने पाहिले. सभागृहाचे सभासद असलेल्यांना सभ्य म्हणतात म्हणून ते सभ्य अन्यथा ते कुठल्याच दृष्टीने सभ्य नाहीत. ते सभ्यगृहातील असभ्य आहेत. श्रीमान जितेंद्र आव्हाड आणि श्रीमान गोपीचंद पडळकर हे दोघेही महाराष्ट्र विधिमंडळाचे सदस्य आहेत. महाराष्ट्र प्रगती पथावर नेण्याची जवाबदारी यांच्याही खांद्यावर आहे पण 'यांच्यासारखे बेजबाबदार हेच' असे म्हणायची पाळी आपल्यावर आली.

दोघेही एका पेक्षा एक आहेत. कुणीच कमी जास्त नाही. विधानभवनातील राड्याला जवाबदार दोघेही आहेत. चोराचा भाऊ डाकू हीच उपमा शोभते. कुणी आपल्या गाडीचा दरवाजा रागाने लोटतो तर कुणी मंगळसूत्र चोर म्हणून ओरडतो. कुणी वात्रट बोलतो तर कुणी असभ्य वर्तन करतो. अन हे म्हणे महाराष्ट्राचे आमदार? गावगुंड बरे जे सामाजिक नियम पाळतात. पण हे पांढऱ्या कपड्यातील खलनायक महाराष्ट्रासाठी घातकच आहेत.

विधान भवनात परवानगी शिवाय 'परिंदा भी पर नही मार सकता' म्हणतात. मी ज्या ज्या वेळी विधानभवनात विधिमंडळाचे कामकाज पाहण्यासाठी गेलो त्या त्यावेळी प्रचंड सुरक्षा आणि प्रचंड शिस्तीचे दर्शन मला झाले. म्हणजे गॅलरीत खुर्चीवर पायावर पाय टाकून बसलो तरी सुरक्षा रक्षक येवून पायाची घडी काढायला सांगायचा. इतकी शिस्त असतांना दोन्ही आमदारांचे समर्थक गुंड विधान भवनात येतात आणि रस्त्यावरच्या भंटला सारखे मारामारी आणि कपडेफाडी करतात. दोन्ही आमदारांनी लाज काढली महाराष्ट्राची कालच्या घटनेने.

जितेंद्र आव्हाडांचा पूर्व इतिहास सर्वानाचा माहीत आहेत. मंत्री असतांना अनंत करमुसे नावाच्या सामान्य नागरिकाला केलेली बेदम मारहाण पाहवत नव्हती. जातीयवाद, मुस्लिमधार्जिणेपणा, हिंदुधर्मावर टीका, अफजलखानाचे उदात्तीकरण, औरंग्या होता म्हणून छत्रपती शिवरायांचे महत्व अशी बरळणी महाराष्ट्र अभिव्यक्तीच्या नावावर सहन करतच होता. आता तर थेट विधानभवनात झुंडशाही.

काल रात्री दोन तास पोलिसांची गाडी अडवून बसले. पोलिसही बसले शांत. हेच कृत्य सामान्य माणसाने केले असते तर पोलिसांनी फरफटत नेले असते आणि टायर मध्ये टाकून सोलून काढले असते. पण हे सभ्य सभासद समजून पोलीस बसले हातावर हात देवून. अखेर दोन तासांनी पोलीसी खाक्या दाखवला खरा पण दोन तास महाराष्ट्र आव्हाडांच्या कृतीवर आणि पोलिसांच्या मूग गिळून बसण्यावर संताप व्यक्त करीत होता.

पडळकर यांचेही तसेच. पवारांवरची यादृच्छिक टीका सुरुवातीला गोड वाटत असली तरी महाराष्ट्राला असे आवडत नाही. टीका जरूर केली पाहिजे, वाभाडे देखील बाहेर काढा पण शब्दांना मर्यादा हवीच. श्री.मोदी, शहा, फडणवीस यांनी श्री.शरद पवार साहेबांच्या पक्षाचा संपूर्ण नि:पात केला पण पवारांविषयी बोलतांना भाषेचा संयम सदैव कायम ठेवला. वयाची, पदाची, अनुभवाची ज्येष्ठता असते. पडळकर मात्र शब्द मर्यादा सतत उल्लंघत होते.

बर! आव्हाड आणि पडळकर यांच्यावर त्यांच्या त्यांच्या पक्षाचे नियंत्रण अजिबात नाही. त्यांनी वाटेल ते बोलायचे, वाटेल ते असभ्य वर्तन करायचे आणि पक्षाने कानाडोळा करायचा. ही कृती वारंवार होत गेली. ते कोडगे झालेत. त्यांनी कळस गाठला आणि विधीमंडळ अपवित्र केले.

श्री.संजय राऊत, अमोल मिटकरी, नितेश राणे, सुषमा अंधारे, नाना पटोले यांच्यासारखे काहीजण याच वाटेवर आहेत. बेछूट वक्तव्ये करायची आणि वातावरण गढूळ करायचे. ना नेत्यांचा धाक ना संवैधानिक जवाबदारी. तोंड दिले म्हणून काहीही बरळत बसायचे. पक्षाची ध्येय धोरणे, युती किंवा आघाडी धर्म, महाराष्ट्राची सभ्यता सगळे यांनी वेशीवर टांगून ठेवले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सभापती, राज्यपाल, न्यायपालिका, विधीमंडळ यांचा एक मान असतो, प्रतिष्ठा असते. त्यांच्या विषयी मोहल्ल्यात बोलावं तस असभ्य भाषेत काहीही बोलायचं.

लोकांनाही हे नित्याचेच झाले. यांच्या तोंडून आलेली गरळ जनता गांभीर्याने घेत नाही. हे जरी खरे असले तरी त्यांचा हा कोडगेपणा पक्षातील वरिष्ठांनी दुर्लक्ष केल्याने आला हेच सत्य आहे. पुढील पिढीला हाच आदर्श द्यायचा का? काहीही बोला, कसेही वागा काहीच होत नाही. हेच त्यांनी डोक्यात घ्यायचे का?

महाजनो: येन गत: स पंथ:।मोठी माणसे ज्या मार्गाने जातात त्याच मार्गावर अन्य चालतात. हा मार्ग नव्या पिढीने चालायचा का?

श्रीगीता सांगते

यद्यदाचरती श्रेष्ठ:
,तत्तदेवेतरो जन: ।
स यत् प्रमाणं कुरुते, लोक:
तदनू वर्तते!

तुम्ही जसे वागता त्याप्रमाणे लोक आचरण करतात. महाराष्ट्रातील पिढी बरबाद करण्याचा तुम्हाला कोणी अधिकार दिला? एक सभ्य पिढीचा खून तुम्ही करताय! तुमच्यावर सदोष मनुष्यवधाचा, अनिष्ठ आणि असभ्य पसरवण्याचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. तुमचे सभासदस्यत्व कायम नष्ट केले पाहिजे. स्वैर वागणे, झुंडशाही खपवून घेणार नाही जनता. तुम्ही मालक असल्यागत वागू नका. आम्ही तुम्हाला विधीमंडळ दिले आहे. आमच्या मालकीच्या विधानमंडळात असभ्य वागण्याचा तुम्हाला कोणताच अधिकार नाही.

कालची हाणामारी महाराष्ट्राची इज्जत वेशीवर टांगणारी होती. त्या घटनेचा निषेधच. त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही होईल. पण प्रत्येक पक्षाच्या वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज आहे. सभागृहातील हे सभ्य नव्हे असभ्य सभासद आहेत. त्यांना वेळीच आवरा नाहीतर जनता आवरणार नाही तुमच्याच्याने !

तुका म्हणे ऐशा नरा, मोजूनी हाणाव्या पैजारा!

**विद्यावाचस्पती**
**प्रा.दिलीप जोशी,** वाशिम.
मो.९८२२२६२७३५

# ममता आणि बंगाली अस्मिता !



पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या सध्या आंदोलनाच्या मूडमध्ये आहेत. २०११ मध्ये ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसने, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीला विधानसभा निवडणुकीत पराभूत करुन, डाव्या आघाडीची तब्बल ३४ वर्षांची सत्ता संपुष्टात आणली. त्यानंतर गेली १४ वर्षे, ममता बॅनर्जी या पश्चिम बंगाल मध्ये अव्याहतपणे राज्य करत आहेत.

१९७७ ते २०११ अशी ३४ वर्षे पश्चिम बंगालवर राज्य करणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला, ममतांनी जवळ जवळ संपुष्टात आणले आहे. डाव्या आघाडीची पश्चिम बंगालमधील ही घसरण, राजकीय पंडितानाही आश्चर्यचकित करणारी आहे. २०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला विधानसभेची एकही जागा जिंकता आली नाही. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगाल मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची पाटी कोरी राहिली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची, पश्चिम बंगालमध्ये ही अधोगती होत असताना, भाजपाने राज्यात आपले पाय भक्कमपणे रोवले आहेत.

भाजपाचा पुर्वावतार असलेल्या जनसंघाचे संस्थापक डॉ.शामाप्रसाद मुखर्जी हे बंगाली होते, तरीही जनसंघाला आणि नंतर भाजपाला पश्चिम बंगालमध्ये बरीच वर्षे आपले पाय रोवता आले नव्हते. २०१४ मध्ये भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकार केंद्रात सत्तेवर आल्यानंतर पश्चिम बंगालमधील भाजपाची स्थिती हळूहळू सुधारु लागली. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या दोन जागा जिंकून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. परंतु भाजपाची घोडदौड तिथेच थांबली नाही.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या एकूण ४२ जागांपैकी १८ जागा जिंकून सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला तोडीसतोड लढत दिली. त्या निवडणुकीत भाजपा आणि तृणमूल काँग्रेसला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत फारसा फरक नव्हता. २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला अपेक्षित असे यश मिळाले नाही. मात्र विधानसभेच्या ७७ जागा जिंकून भाजपाने, तृणमूल काँग्रेसला चांगली लढत दिली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाची कामगिरी पुर्वीसारखी चांगली झाली नाही. त्या निवडणुकीत भाजपाने पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या १२ जागा जिंकल्या. या पार्श्वभूमीवर पुढील वर्षी पश्चिम बंगाल मध्ये विधानसभेच्या निवडणुका होत आहेत.

लेखात वर म्हटल्याप्रमाणे, ममता बॅनर्जी या सध्या आंदोलनाच्या मूडमध्ये आहेत. त्याला कारण अर्थातच भाजपा हीच आहे. गेली १४ वर्षे पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर असूनही, ममता बॅनर्जी या अधूनमधून विरोधीपक्ष नेत्याच्या भूमिकेत वावरत असतात. डावी आघाडी पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर असताना, ममता बॅनर्जी या विरोधी पक्ष नेत्या होत्या. तेंव्हा त्या उठसूठ मोर्चे काढत असत, बंद पुकारत असत, धरणे धरत असत, उपोषणाला बसत असत. आता राज्याच्या मुख्यमंत्री होऊन १४ वर्षे उलटल्यानंतरही, आपण आता विरोधी पक्ष नेत्या नाही, ही गोष्ट त्यांच्या लक्षात रहात नाही. भाजपाशासीत काही राज्यांमध्ये पश्चिम बंगाल मधील नागरिकांना, बांगलादेशी नागरिक ठरवून, त्यांचा जो छळ केला जात आहे, (असा ममतांचा आरोप आहे) त्या विरोधात ममतांनी कोलकात्यामध्ये नुकताच एक निषेध मोर्चा काढला होता.? त्यावेळी त्यांनी अतिशय आक्रमक भाषण केले.

त्या म्हणाल्या की, देशातील इतर राज्यांत सुमारे २२ लाख बंगाली काम करत आहेत. त्यांच्याकडे आधार कार्ड, इलेक्शन कार्ड इत्यादी ओळखपत्रे आहेत. तरी सुध्दा, महाराष्ट्र, ओडिशा, गुजरात, आसाम दिल्ली इत्यादी भाजपाशासीत राज्यांत ते बांगलादेशी असल्याचा संशय व्यक्त करुन, त्यातील काही जणांना ताब्यात घेतले जात आहे.

त्यांना अटक केली जात आहे. त्यांना स्थानबद्धता छावणीत पाठवले जात आहे. काही जणांना तर, त्यांनी ओळखपत्रे सादर केल्यानंतरही, बांगलादेशी नागरिक ठरवण्यात आले आणि त्यांना बांगलादेशमध्ये ढकलण्यात आले. हे सर्व ठरवून करण्यात येत असल्याचा आरोप ममतांनी केला आहे.

ममतांच्या आरोपात काही प्रमाणात तथ्य असले तरी, ममतांनी भाजपाशासीत राज्यांवर केलेला आरोप पुर्णपणे खरा नाही. भाजपाशासीत काही राज्यांमध्ये जे अवैध बांगलादेशी नागरिक पकडले गेले, त्यांची व्यवस्थितपणे छाननी करण्यात आली होती. आधार कार्ड, इलेक्शन कार्ड ही ओळखपत्रे, ममता म्हणतात त्याप्रमाणे सरसकट पुरावा मानता येणार नाहीत. पश्चिम बंगालमध्ये बनावट ओळखपत्रे मिळवून देणारे अनेक एजंट आहेत. त्यामध्ये तृणमूल काँग्रेसचे बरेच कार्यकर्ते आहेत. बांगलादेशी घुसखोर हे तृणमूल काँग्रेसची व्होट बँक असल्याने, बांगलादेशी घुसखोरांना आधार कार्ड, इलेक्शन कार्ड अवैधरित्या मिळवून देण्यात, तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते आघाडीवर असतात. ही ओळखपत्रे मिळाल्या नंतर, बांगलादेशी घुसखोर हे भारतातील इतर राज्यांत प्रवेश करतात आणि तेथे कामधंदा मिळवतात.

भाजपाशासीत काही राज्यांत बंगाली नागरिकांचा जो तथाकथित छळ होत आहे, त्याबद्दल ममतांना काही पडलेली नाही. खरी गोष्ट अशी आहे की, त्याचे राजकारण करुन, ममतांना, त्याचा फायदा पुढील वर्षी होणाऱ्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत उठवायचा आहे. बंगाली अस्मिता वगैरे गोष्टी या फक्त दिखावा आहेत. पश्चिम बंगाल मधील मुस्लिम समाज ही त्यांची व्होट बँक आहे आणि त्या समाजाला खूष ठेवण्यासाठी त्या कोणत्याही थराला जातील.

एखादा माणूस बंगाली भाषा बोलतो म्हणून त्याला बांगलादेशी नागरिक ठरवले जात नाही, ही गोष्ट ममतांना चांगल्याप्रकारे ठाऊक आहे, परंतु बंगाली भाषिकांवर, भाजपाशासीत काही राज्यांमध्ये अन्याय केला जात आहे, अशी आवई उठवून, ममता, बंगाली अस्मिता जागृत करत आहेत, कारण पुढील वर्षी पश्चिम बंगाल मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत ममता, याच मुद्यावर प्रामुख्याने जोर देण्याची शक्यता आहे. भाजपा ही हिंदी भाषीक पट्ट्यातील पार्टी असल्याचा प्रचार, तृणमूल काँग्रेसकडून नेहमी केला जातो. भाजपाला ते आऊटसाईडर म्हणून संबोधतात. आता त्याचा प्रतिवाद भाजपाकडून कसा केला जातो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. ममतांनी सांगितले आहे की, त्या आता जास्तीतजास्त बंगाली भाषेत बोलणार आहेत. मला अटक करून दाखवा असे आव्हान त्यांनी भाजपाला दिले आहे. हा त्यांचा निव्वळ पोरकटपणा आहे.

मतदार याद्यांच्या छाननीत असंख्य अवैध बांगलादेशी नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात येणार आहेत आणि ही ममतांची व्होट बँक असल्याने, त्या सैरभैर झाल्या आहेत व त्यातून आलेल्या नैराश्यामुळे त्या आदळआपट करत आहेत.

**अभय गोखले**

# बीटी तंत्रज्ञानबाबत चुकीचा प्रचार करू नये

**मा.माणिकराव कोकाटे**
कृषीमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुबंई

**विषय-** अमेरिका-ब्राझील देशात कापसाचे बीटी-७ तंत्रज्ञान वापरात आहे, असा चुकीचा प्रचार सरकारने कृपया करू नये.

**नमस्कार,**

देशाचे कृषीमंत्री मा. श्री. शिवराजसिंहजी चौहान यांनी ११ जुलै २०२५ ला कोयम्पतूरला कापूस उत्पादक शेतकरी यांना चांगले बियाणे व देशाचे कापसाचे उत्पादन वाढावे यासाठी एका बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीच्या पार्श्वभुमीवर कृषीमंत्र्यांनी शेतक-यांना काही सुचना करायच्या असतील तर एक नंबर १८००१८०१५५ दिला होता. या नंबर वर मी फोन केला, मराठीत मला सांगण्यात आले की, आम्ही मंत्र्याना निरोप देवू शकत नाही. मग हा नंबर का दिला होता? असो !!

या बैठकीताने आपले १५ मिनिटाचे भाषण मी ऐकले. आपण हे जाहीर पणे मान्य केले की महाराष्ट्रात ५० टक्के कापसाचा पेरा अनधिकृत एचटी बीटी चा आहे. शेतक-यांना या बियाण्यांचा फायदा होत असेल म्हणूनच ते चोरून या बियाणांचा वापर करीत आहेत. आपण केन्द्र सरकारने या एचटी बीटीला मान्यता द्यावी ही विनंती कृषीमंत्री श्री. चौहान यांना केली. ही विनंती करताना आपण असे ही म्हणालात की, बीटी ३ ला मान्यता देण्याचा विचार करतो आहो पण, अमेरिका-ब्राझील या देशात तर बीटी ७ पर्यंत तंत्रज्ञान वापरले जात आहे. मी आपणास विनंती करतो की, असा चुकीचा प्रचार सरकारच्या कार्यक्रमातून होवू नये. एच टी बीटी बियाणांबद्दल काही शेतकरी संघटनांनी असा ही प्रचार केला की हे तंत्रज्ञान गुलाबी बोंडअळी साठी परिणामकारक आहे हा प्रचारही चुकीचा आहे.

आज बाजारात बीटी २ व एचटीबीटी चे बियाणे एफ२ श्रेणीचे मोठ्या प्रमाणात आहे. शेतक-यांचा एफ१ बियाणे हवे असते. त्यांनी एफ१ एफ२ याची ओळख कशी करावी? या साठी आपण पुढाकार घेऊन एक मेळावा नागपूर किंवा अकोला येथे आयोजित करावा ही विनंती.

**विजय जावंधिया**
शेतकरी संघटना पाईक
मो.९४२१७२७९९८

# शिवकालीन गडांवर उमटली जागतिक मोहर!

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्र आणि तमिळनाडू या राज्यांतील १२ गडांना 'जागतिक वारसा मानांकन' मिळणे, हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या गडांचे नाव घेताच त्यांनी केलेले पराक्रम डोळ्यांसमोर येतात आणि ऊर अभिमानाने भरून येतो.

म्हणूनच, छत्रपतींच्या गडांना 'युनेस्को'कडून मिळालेले मानांकन हा केवळ त्या गडांचा नव्हे, तर हिंदवी स्वराज्याचा सन्मान आहे, असे म्हणणे योग्य ठरेल.

**प्रिया बागडदेव**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# शिक्षणाशिवाय पर्याय नाही : प्रा. प्रवीण देशमुख

## लो. अण्णाभाऊ साठे स्मृतिदिनी प्रबोधन व सत्कार

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त साहित्यरत्न कला, संस्कृती व विकास फाउंडेशन, यवतमाळच्या वतीने एक प्रबोधनात्मक व प्रेरणादायी कार्यक्रम संविधान चौक येथील लॉर्ड बुद्धा कार्यालयात गुरुवार, १८ जुलै २०२५ रोजी पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देविदास महाले होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. प्रवीण देशमुख, तर प्रमुख पाहुणे प्रा. बाळकृष्ण सरकटे, प्रा. यशवंत खंडारे, नवनीत महाजन व रमेश तेलंगे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात समाज प्रबोधनाचा प्रभावी संदेश देताना प्रा. प्रवीण देशमुख यांनी लो.अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकला. गिरणी कामगार असताना त्यांनी अनुभवलेल्या कामगारांच्या हालअपेष्टा, भांडवलशाहीचा निषेध, श्रमिकांचे शोषण, यावर आधारित त्यांनी जागृती पर लढा दिल्याचे त्यांनी नमूद केले. बुद्ध, फुले, आंबेडकर, बसवेश्वर, संत गाडगेबाबा यांच्याप्रमाणेच अण्णाभाऊ साठे यांनीही समाज जागृतीची चळवळ उभी केली. देशमुख पुढे म्हणाले, "शिक्षणाशिवाय पर्याय नाही", हे लक्षात घेऊन मातंग समाजाने अज्ञान झुगारून शैक्षणिक प्रगतीच्या प्रवाहात यावे. आजही समाज गावकुसाबाहेर राहतो, व्यसनाधीनतेने ग्रासलेला आहे, यासाठी नव्या पिढीने शिक्षणाच्या माध्यमातून समाज उभारणीचे काम हाती घ्यावे. ते पुढे म्हणाले की, अनुसूचित जातीतील उपेक्षित गटांबाबत विधानसभेत ना चर्चा होते, ना उपवर्गीकरणाचा विचार केला जातो. त्यामुळे समाजाने अंतर्गत गटबाजी टाळून एकतेने अंगठ्याच्या घडाप्रमाणे राहावे, हा मौलिक सल्ला त्यांनी दिला. कार्यक्रमात दहावी व बारावीच्या परीक्षेत ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या मातंग समाजातील विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. स्विमिंग खेळात प्राविण्य मिळवलेल्या सिद्धांत वानखडे या गुणवंत विद्यार्थ्याचाही गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी प्रा.नाटकर यांनी मार्गदर्शन केले. प्रा. प्रवीण देशमुख यांच्या ज्वलंत व्याख्यानाने उपस्थितांना जागृतीचा संदेश मिळाला. मुक्ता साळवे यांचे उदाहरण देत शिक्षणामुळे मिळणाऱ्या सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा त्यांनी अधोरेखित केली. "चॉकलेट नको, आम्हाला पुस्तक द्या" ही मागणी करणाऱ्या मुक्ता साळवेंप्रमाणे नव्या पिढीनेही शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. हा कार्यक्रम लो.अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना व कार्याला आदरांजली वाहणारा ठरला असून, विद्यार्थ्यांसाठी तो प्रेरणादायी व्यासपीठ बनला आहे. यावेळी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक वानखडे यांनी केले तर फाउंडेशन ची भूमिका अरविंद वानखेडे यांनी विशेष केली. विशाल तेलंगे, सागर कळणे, ज्ञानेश्वर वानखडे, दिनेश वाघमारे, नरेश बावणे, विजय तायडे यांनी विशेष परिश्रम घेतले. नव्या पिढीला सामाजिक भान व शैक्षणिक भूक निर्माण करणारा हा उपक्रम यशस्वीपणे पार पडल्याची समाधानकारक भावना आयोजकांनी व्यक्त केली.

# गोदावरी अर्बन मुकुटबन शाखेकडून बॅरिकेट्सचे वितरण



वणी - सहकार क्षेत्रातील सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसा.लि नांदेड, शाखा मुकुटबन, 5 वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुकुटबन पोलीस स्टेशन ला बॅरिकेट्स चे वितरण करण्यात आले.

मुकुटबन पोलिस स्टेशन ला केले बरिकेट्स वितरीत, पाचवा वर्धापन दिन थाटात संपन्न

गोदावरी अर्बनचे संस्थापक खासदार हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर सर, उप महाव्यवस्थापक दो मॅडम, तसेच सहायक महाव्यवस्थापक रविजी झळे सर यांच्या विशेष उपस्थितीत तथा वणी शाखेचे शाखा व्यवस्थापक विजय मोडक यांच्या उपस्थितीत गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसा.लि नांदेड, शाखा मुकुटबन चा, 5 वा वर्धापनदिन दि. 18 जुलै 2025 ला मोठ्या उत्साहात पार पडला. रोपटं लावणं आणि सोपं असतं, मात्र त्याची जोपासना करणं तितकंच कठीण... आणि जोपासना जर योग्य पद्धतीने झाली तर... त्या रोपट्याचे रूपांतर एक मोठ्या वटवृक्षात पहायला मिळते... त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आज आपल्यासमोर उभी असलेली गोदावरी अर्बनची मुकुटबन शाखा. यावेळी समूहाचे असिस्टंट जनरल मॅनेजर रवी झळे, वणी शाखा व्यवस्थापक विजय मोडक, मुकुटबन शाखेचे व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, शाखाधिकारी धम्मपाल निमसरकार, उपव्यवस्थापक दिप्ती मल्लूरवार, अधिकारी चेतन ठाकरे, सहायक अधिकारी रविंद्र तावाडे, सहायक अधिकारी सचिन जुनगरी, विपीन गावंडे, सर्व दैनिक प्रतिनिधी उपस्थित होते.

# बोटाचे ठसे लागत नाही मग पोस्टाचे नवीन खाते निघणार कसे ?

## सात महिन्या पासून निराधारांचे पैसे थकले, साथी निराधार संघटनेने विचारला जाब

जनमाध्यम प्रतिनिधी




घाटंजी - गेल्या सात महिन्यापासून ज्येष्ठ नागरिकांचे श्रावणबाळ, संजयगांधी योजनेचे निराधार पेन्शन थकीत आहे. तसेच तालुक्यातील अपंग, विधवा यांना मिळणारे निराधारचे पैसे हे सुद्धा थकीत आहे. ते तात्काळ मिळण्यात यावे यासाठी साथी निराधार संघटनेचे मुख्य संयोजक महेश पवार यांनी तहसील कार्यालयात येऊन जाब विचारला.

सरकारने डीबीटी अंतर्गत निराधारांना पेन्शन देण्याचे ठरविले. त्यामुळे ज्यांचे अकाउंट अपडेट आहे त्यांना निराधार मिळत आहे. परंतु ज्यांच्या अकाउंट मध्ये प्रॉब्लेम आहे अशांना पोस्टाचे नवीन खाते काढण्यास तहसील मधून सांगण्यात येत आहे. ही वृद्ध मंडळी पत्रपूर्ती करून पोस्टात जाता मात्र तिथे बोटांचे ठसे न लागल्याने त्यांचे अकाउंट खाते निघण्यास अडचण निर्माण झालेली आहे. आणि यामुळेच त्यांचे सात महिन्यापासून निराधार पेन्शन थकीत आहे. ज्या वृद्धांचे बोटांचे ठसे लागत नाही आणि नवीन पोस्टाचे खाते काढण्यास अडचण येत आहे अशा वृद्धांसाठी तहसील कार्यालयामार्फत खास करून एक यादी तयार करावी आणि जुन्याच अकाउंटला क्लिअर करावे अशी मागणी साथी निराधार संघटनेचे महेश पवार यांनी तहसीलदाराकडे केलेली आहे. ज्येष्ठ नागरिकांना थकल्या वयात मजुरीला जाऊन पोट भरणे शक्य नाही. कारण शरीरात त्राण नाही. पैसे कमवीत नाही म्हणून घरातही मान नाही. वृद्धापणामुळे अनेक आजार जोडलेले असतात. साध्या ब्लडप्रेशर, शुगरच्या गोळ्या सुद्धा घेण्यासाठी यांच्या जवळ पैसे नसतात.

हे महत्वाचे त्यांच्या साठी शासन बनलेला आहे. अशा परिस्थितीत त्यांना आधार असतो तो फक्त निराधार पेन्शनचा. मात्र हेच पैसे गेल्या सात महिन्यापासून थकलेले आहे. वृद्ध, दिव्यांग, विधवा यांना मिळणारे निराधारचे पैसे तात्काळ मिळण्यात यावे ही कळकळीची विनंती निराधार विभागाचे नायब तहसीलदार यांना करण्यात आली आहे.

# महाराजस्व अभियानांतर्गत सावळी सदोबा येथे समाधान शिबिर

जनमाध्यम प्रतिनिधी

सावळी सदोबा - महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत आर्णी तालुक्यातील सावळी सदोबा येथे दिनांक 24 जुलै 2025 गुरुवार रोजी 11 वाजता साई मंगल कार्यालय सावळी सदोबा येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती तहसील कार्यालयामार्फत प्रसिद्धी पत्रिकाद्वारे प्रसिद्ध करण्यात आली आहे.

आमदार राजुभाऊ तोडसाम यांची उपस्थिती

या समाधान शिबिरात शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, महावितरण विभाग, पशुसंवर्धन विभाग, महसूल विभाग, महिला व बालकल्याण विभाग, निम्न पैनगंगा प्रकल्प विभाग, कृषी विभाग, बचत गट या विभागाचे तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे आणि संबंधित विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित राहून आप आपल्या विभागाशी संबंधित तक्रारी व अडचणी ऐकून घेऊन त्या सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतील तसेच घरकुल योजना, नवीन विहिरी मंजूर, आधार कार्ड अपडेट, राशन कार्ड, श्रावणबाळ बाळ व संजय गांधी निराधार योजनेतील व लेक लाडकी योजना, लाडकी बहीण योजना यातील अनेक समस्या व अडचणी आणि लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी असतील त्या सोडविण्यासाठी या समाधान शिबिरात प्रयत्न केले जातील. सावळी सर्कलमधील ज्या ज्या गावातील तेथील लोकांच्या अडचणी असतील त्या त्यांनी लेखी स्वरूपात तहसील कार्यालयात किंवा गावातील पटवारी, ग्रामसेवक यांच्याकडे कळविल्यास या समाधान शिबिराच्या दिवशी तिथेच त्याचे उत्तर मिळेल. या समाधान शिबिराला आर्णी केळापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रा. राजूभाऊ तोडसाम, आर्णी तहसीलदार, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती, पाणी पुरवठा विभाग आणि महावितरणचे अभियंता व अधिकारी वर्ग तसेच इतर सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती आर्णीचे तहसीलदार वैशाख वाहूरवाघ यांनी दिली आहे.

# आझाद मैदान जलतरण तलावाच्या जलतरणपटूंचा झोनल स्पर्धेत जलवा



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - जाजू इंटरनॅशनल स्कूल येथे पार पडलेल्या झोनल लेव्हल स्विमिंग चॅम्पियनशिपमध्ये आझाद मैदान जलतरण तलावाच्या जलतरणपटूंनी शानदार कामगिरी करत एकूण २० सुवर्ण, २५ रजत आणि ९ कास्य पदकांची लयलूट करत सांघिक विजेतेपद पटकावले. या कामगिरीमुळे त्यांनी चॅम्पियन ट्रॉफी आपल्या नावे केली.

या स्पर्धेचे आयोजन १३ जुलै २०२५ रोजी करण्यात आले होते. विजेत्या खेळाडूंना पदक व ट्रॉफी प्रदान करण्यात आली. हा गौरव मा. श्री. प्रकाशजी जाजू यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जाजू इंटरनॅशनल स्कूलच्या संचालिका श्रीमती शिल्पा जाजू, अर्मेच्युअर ॲक्वाटीक असोसिएशनचे पदाधिकारी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत अपूर्व यश मिळवणाऱ्या जलतरणपटूंनी यशाचे श्रेय त्यांच्या युवा प्रशिक्षक कुणाल बी. चौहान आणि यश वि. तुमसरे यांना दिले. तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांनी सर्व जलतरणपटूंना त्यांच्या कामगिरीबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या विजयामुळे आझाद मैदान जलतरण तलावाच्या खेळाडूंनी आपली तयारी, प्रतिभा आणि संघर्षशक्ती सिद्ध केली असून, जिल्ह्यातील जलतरण क्षेत्रात ही कामगिरी मैलाचा दगड ठरली आहे.

# दिग्रस तालुक्यात २८ ग्रामपंचायतीवर येणार महीलाराज !

## सर्वसाधारणसाठी २८ अनुसुचित जमातीसाठी सुटल्या १२ जागा

जनमाध्यम प्रतिनिधी



दिग्रस - दिग्रस तील ५५ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत शुक्रवारला सकाळी ११ वाजता येथील तहसील कार्यालय उपविभागीय तथा नियंत्रण अधिकारी आशिष बिजवाल, तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी मयूर राऊत, नायब तहसिलदार तथा निवडणूक अधिकारी रामेश्वर तुम्बने यांच्या उपस्थितीत काढण्यात आली.

५५ पैकी २८ ग्रामपंचायतीवर महीला सरपंच राहणार असून यामध्ये यामध्ये सर्वसाधारण, वर्गातील महीला अनुसुचित जाती प्रवर्ग अनुसुचित जमाती प्रवर्ग महीलाचा समावेश राहणार आहे. तर उर्वरित ग्रामपंचायतवर याच प्रवर्गातील पुरुषांना स्थान मिळणार आहे. तर ५५ पैकी २८ जागावर सर्व साधारण १२ जागावर अनु जाती व जमाती ला स्थान मिळेल तालुक्यातील साखंगा खु अनु जाती महिला, देऊरवाडा (पु) अनु जाती महिला, विठाळा अनु जाती, कटी अनु जमाती महिला, सेवानगर अनु जमाती महिला, आष्टा अनु जाती महिला, वाई (लिंगी) अनु जाती महिला, झिरपुरवाडी ना.मा.प्र महिला, साखरी ना.मा.प्र महिला, आरंभी ना.मा प्र महिला, ईसापुर ना.मा.प्र महिला, धानोरा बु ना. मा.प्र महिला, हरसूल ना. मा.प्र महिला, रामनगर ना.मा. प्र महिला, चिंचपात्र ना. मा.प्र महिला, तिवरी सर्वसाधारण, धानोरा(खु) सर्वसाधारण महिला, खेकडी सर्वसाधारण महिला, खंडापुर सर्वसाधारण महिला, रोहणादेवी सर्वसाधारण महिला, कळसा सर्वसाधारण महिला, वाई मेंढी सर्वसाधारण महिला, माळहिवरा सर्वसाधारण महिला, डोळंबा सर्वसाधारण महिला, सिंगद सर्वसाधारण महिला, राई तलाव सर्वसाधारण महिला, मरसूळ सर्वसाधारण महिला, पेढू सर्वसाधारण महिला, वरंदळी सर्वसाधारण महिला निंभा सर्वसाधारण महिला राहणार आहे.

# वेचक

## चि.सार्थक भवरे शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात १२ मेरिट !



पुसद - नुकत्याच जाहीर झालेल्या 5 वी च्या शिष्यवृत्ती परिक्षेत पुसद येथील जेट किड्स इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी सार्थक दिपक भवरे ह्याने विशेष प्राविण्यासह राज्यातून 12 वा मेरिट यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या बुद्धीची कसोटी पारखणारी स्कॉलरशिप परिक्षा महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे तर्फे 5 वी आणि 8 वी तील विद्यार्थ्यांकरीता आयोजीत केली जाते. यापूर्वी देखील नामांकित राष्ट्रीय मिलिटरी स्कूल, ऑल इंडिया सैनिक स्कूल, नवोदय विद्यालय अशा विविध परीक्षेत सार्थकने उत्तुंग कामगीरी बजावली आहे. आता शिष्यवृत्ती परिक्षेत संपादन केलेल्या त्याच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याच्या यशात जेट किड्स स्कूलचे संचालक, शिक्षक, अश्विनी वाडीकर मॅडम-सर, कौस्तुभ घुमाळे सर ज्ञानदीप अकादमी, तसेच आई-बाबा यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. सार्थकच्या यश प्राप्तीमुळे समाजात त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांना नवचैतन्याचे प्रशिक्षण

यवतमाळ - स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाबाबत दक्ष असलेले शिक्षक, इतर विद्यार्थ्यांच्याही गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी तितकेच आग्रही असले पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे यांनी केले. स्थानिक दिनदयाल प्रबोधिनीत 'सिखें' संस्थेच्या वतीने आयोजित चार दिवसीय नाविन्यपूर्ण प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी 'सिखें'च्या नॅशनल हेड वर्षा परचुरे, स्टेट लीड डॉ. शरदचंद्र पाटील उपस्थित होते. या प्रशिक्षणात वाचन आणि संख्याज्ञान या मूलभूत विषयांच्या समजपूर्वक व प्रभावी अध्यापनावर भर देण्यात आला. कळंब, बाभूळगाव आणि यवतमाळ पंचायत समिती अंतर्गत ४२५ शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शैक्षणिक बांधिलकी अधोरेखित केली. प्रशिक्षणात कृतीप्रधान सत्रे, कार्यशाळा, प्रात्यक्षिके आणि समूहचर्चेद्वारे नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती शिकविण्यात आल्या. मार्गदर्शनासाठी सिखें संस्थेच्या अंजली खुरम, आशिष केळसीकर, संभाजी भिसे, नितीन पखाले, अश्विनी पुणपुणे, अश्विनी शहा, मोहन चुनकबोटलावार व सोनाली लोखंडे यांची उपस्थिती लाभली. 'टीचर इनोव्हेटर प्रोग्राम'मुळे शिक्षकांना नवीन पद्धती आत्मसात करता आल्या असून, विद्यार्थ्यांना समजून घेऊन आनंददायी शिक्षण देण्यासाठी प्रेरणा मिळाल्याचे मत सहभागी शिक्षकांनी व्यक्त केले. या उपक्रमामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया अधिक बळकट होणार आहे, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## बाभूळगाव तालुक्यात ३३ ग्राम पंचायतींचा कारभार आता राहणार महिलांच्या हातात

बाभूळगाव - तालुक्यात सुमारे 33 ग्राम पंचायतींचा कारभार महिलांकडे राहणार असून या ठिकाणी महिलाराज येणार आहे. त्याच प्रमाणे यावेळी सात ठिकाणी ईश्वरचिठ्ठीद्वारे आरक्षण काढण्यात आले. यातही महिलांचेच आरक्षण निघाल्याने अनेकांचा हिरमोड झाल्याचे दिसून आले. दि. 18 जुलै रोजी तहसिल कार्यालयाच्या सभागृहामध्ये तालुक्यातील 64 ग्राम पंचायतींसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी उपविभागिय अधिकारी गोपाल देशपांडे हे होते तर निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार मिरा पागोरे, नायब तहसिलदार आय.एम. कांबळे, नायब तहसिलदार सय्यद यामीन यांचेसह अनेक गावातील नागरिक, सरपंच, महिला, ईच्छुक उमेदवार उपस्थित होते. बाभूळगाव तालुक्यातील सार्वत्रिक ग्राम पंचायत आरक्षण या प्रमाणे - 1) अनुसुचित जाती प्रवर्ग -फत्तेपूर, फाळेगाव, कोंढा, राणी अमरावती तसेच महिला आरक्षण- घारफळ(ई. चि.), यरंडगाव(ई.चि.), गवंडी(ई.चि.), सावंगी मांग(ई.चि.), 2) अनुसूचित जमाती प्रवर्ग - कोठा अलिपूर, कोपरा-1, बारड, आष्टारामपूर, पंचगव्हाण, यावली, महिला आरक्षण - महम्मदपूर, विरखेड, पिंपरी ईजारा, मालखी, आलेगाव(ई.चि.), बोरगाव भिलुक्षा, 3) नागरिकांचा मागास प्रवर्ग - नांदुरा खुर्द, नायगाव, मुबारकपूर, करळगाव, खडकसावंगा, भिमोणा, चोंढी, नांदेसावंगी, महिला आरक्षण - दाभा(ई.चि.), पिंपळखुटा, वरूड, वाटखेड बु., मिटणापूर, पहूर, नागरगाव, सावर, वेणी, 4) सर्वसाधारण प्रवर्ग - परसोडी, सारफळी, गणोरी, डेहणी, खर्डा, तांभा, सुकळी, कोपरा जानकर, भटमार्ग, शिंदी, दिघी-1, विमणापूर, मालापूर, महिला आरक्षण - आलेगाव देवि, लोणी, गोंधळी, वाटखेड खुर्द, गळव्हा, उमरी, पाचखेड, देवगाव, कोटंबा, टाकळगाव, सरूळ, नांदुरा बु., दिघी-2, माहुली(ई.चि.) या प्रमाणे काढण्यात आले.

# शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - ग्राम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेतर्फे मागील हंगामात अनेक शेतकऱ्यांनी पेरणी व लागवडीसाठी प्राधिकाच्या माध्यमातून जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून पीक कर्ज घेतले होते मात्र निसर्गाचा लहरीपणा अतिवृष्टी यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही परिणामी शेतकऱ्यांच्यापदरी निराशा आली भरीसभर शेतमालाला सन्मान जनक भाव सुद्धा नव्हता त्यामुळे शेतकऱ्याची कर्ज फेडण्याची ताकद उरली नाही त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या अशा आशयाचे निवेदन राळेगाव प्राधिकाच्या वतीने तहसीलदार राळेगाव यांना देण्यात आले.

राळेगाव ग्राम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष सचिन हुरकुंडे उपाध्यक्ष राजेश काळे यांनी नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा ठराव मांडला या ठरावाला सर्व संचालकांनी एकमताने पाठिंबा दिला या ठरावानुसार ग्राम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्यावतीने तहसीलदार अमित भोईटे यांना निवेदन देण्यात आले निवेदनामध्ये शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांना येणाऱ्या हंगामासाठी पुन्हा नव्याने पीक कर्ज द्यावे नैसर्गिक संकटामुळे तसेच सुलतानी सरकारमुळे कर्जबाजारी झालेले शेतकरी अडचणीत आहेत त्यांना पुन्हा उभारी देण्यासाठी तातडीने कर्जमाफी करून दिलासा द्यावा सोबतच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना शासनातर्फे पन्नास हजाराचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार होते अजूनही राळेगाव ग्राम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या 94 नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजाराचे अनुदान मिळाले नाही ते सुद्धा शासनाने द्यावे सोबतच गेल्या दोन-तीन वर्षांचे शेतकऱ्यांचे पीक विम्याचे पैसे शासनाकडे प्रलंबित आहे ते सुद्धा शासनाने त्वरित वितरित करावे. सद्यस्थितीत शेतकरी आर्थिक अडचणीत आहे अशावेळी शासनाने कर्जमाफी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजाराचे प्रोत्साहन पर अनुदान पिक विम्याचे पैसे उपलब्ध करून दिले तर शेतकऱ्यांना संकट काळात मोठा आर्थिक दिलासा मिळेल निवेदन देतेवेळी अध्यक्ष सचिन हुरकुंडे उपाध्यक्ष राजेश काळे संचालक जानराव गिरी अशोक पिंपरे विनायक नगराळे विनोद नरड गजानन पाल नितीन महाजन कृष्णाजी राऊळकर तातेबर पिसे प्रभाकर राऊत शेतकरी लियाकत सैय्यद प्रवीण महाजन सुमित डाखोरे विक्की राऊत कर्मचारी अजय भाये आदि उपस्थित होते.

# तालुक्यात १२० ग्रामपंचायतीमध्ये ५९ महिला तर ६१ पुरुष सरपंच होणार

## पुसद तालुक्यातील जि.प., ग्रा. पंचायत आरक्षण सोडत जाहीर

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता एकूण ८ गट व १६ गण साठी प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्याकरिता दि.१४ जुलै २०२५ रोजी तहसीलदार महादेव जोरवर यांच्या नेतृत्वाखाली आली आहे. त्या अनुषंगाने दि.१४ जुलै २०२५ रोजी प्रारूप प्रभाग रचना पंचायत समिती तसेच पुसद तालुक्यातील १२० ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी संबंधित ग्रामपंचायतीचे सचिव यांच्यामार्फत नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आले होते. तालुक्यातील १२० ग्रामपंचायतीवर ५९ महिला सरपंच तर ६१ पुरुष सरपंच होणार असल्याचे आता अधोरेखित झाले आहे.

तालुक्यातील हर्षी, चोंढी, ब्राह्मणगाव, भंडारी, राजना, (बु)पेंट्रा, बान्सी, येलदरी या ठिकाणी स्त्री सरपंच राहणार असून घाटोडी, हिवळणी (त), माणिकडोह, मरसूळ, मांजरजवळा, कोपरा(बु), पारवा, नानंद (खुर्द), जनुना या ठिकाणी पुरुष सरपंच होणार आहे.

तर अनुसूचित जमातीमध्ये कृष्णानगर, मोहा (इ), रोहडा, फुलवाडी, आरेगाव, खडकदरी, नांदुरा (इ), बुटी, शिळोणा, बेलोरा (बु.), लाखी या ठिकाणी स्त्री तर कुंभारी, रामपूरनगर, मोप, गौळखुर्द, चिखदार, वडगाव, जामनाईक-एक, वेणी, जवळी, गहुली या ठिकाणी पुरुष सरपंच होणार आहे. इतर मागासवर्गीय महिलांमध्ये शिंदी, चिकणी, हुडी खुर्द, काटखेडा, गौळ बुद्रुक तर इंदिरानगर, भोजला, इसापूर, उडदी, काकडदाती, काटखेडा, खंडाळा, पार्डी, बोरगडी, वरुड, श्रीरामपूर, सिंगरवाडी, गायमुखनगर, गौळ मांजरा, जमशेदपूर, मांडवा, हिवळणी (पा), कान्होळ, जवळी, दगडथानोरा नानंद इजारा, बोरी खुर्द, शिवणी, सावरगाव व सावंगी या ठिकाणी पुरुष महिला सरपंच होणार आहेत. तर इतर ग्रामपंचायतीवर खुला प्रवर्गाकरिता २५ महिला तर २४ पुरुष सरपंच होणार आहेत.

# सचिन पिल्लेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन १९ जुलै रोजी होणार

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - प्रभाग क्र. २० मधील नागरिकांच्या प्रश्नांना तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख विभागप्रमुख सचिन पिल्लेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन शनिवार, दिनांक १९ जुलै २०२५ रोजी दुपारी १२ वाजता गुल्हवरी ले-आऊट, भोसा येथे संपन्न होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याचे उद्घाटन शिवसेना (उबाठा) पक्षाचे ज्वलंत नेते, खासदार मा. संजय भाऊ देशमुख यांच्या शुभहस्ते होणार असून, आमदार संजय भाऊ देरकर हे या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड, जिल्हा प्रमुख किशोर इंगळे, विधानसभा संपर्कप्रमुख संतोष ढवळे, उपजिल्हा प्रमुख प्रविण शिंदे, प्रवीण पांडे व राजेंद्र घोटे, सहकार सेना जिल्हा कार्याध्यक्ष जितेश नावडे, महिला आघाडी जिल्हा प्रमुख कल्पना दुधवाई, विदर्भ विधानसभा संघटिका सागर ताई पुरी, अल्पसंख्याक विभागाचे प्रमुख सैय्यद दाऊद व आरिफ अली काजी, तालुका प्रमुख गजानन पाटील, वाहतूक संघटक अब्दुल साजिद रहेमान, तसेच शहर प्रमुख विनोद पवार, अतुल गुल्हाणे व चेतन शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. राहुल वखरे, रिजवान हाशमी, शिवानंद भिटकरी, समद भाई, पवन शर्मा आणि सतीश स्थुल हे कार्यक्रमाचे निमंत्रक असून, या जनतेच्या जिव्हाळ्याच्या सोहळ्यास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# देशाबाहेर दौऱ्याकरीता इच्छुक शेतकऱ्यांकडून प्रस्ताव आमंत्रित

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : कृषी विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरीता कृषी विभागाकडून देशाबाहेर अभ्यास दौरा आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विविध देशांनी विकसित केलेले शेतीविषयक तंत्रज्ञान, तेथील शेतकऱ्यांनी त्याचा केलेला अवलंब व त्याद्वारे त्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ याबाबत त्या त्या देशातील शास्त्रज्ञ, शेतकरी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा, क्षेत्रिय भेटी तसेच संस्थांना भेटी इत्यादीद्वारे शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरिता देशाबाहेर अभ्यास दौरे आयोजित केले जातात. दौऱ्याकरीता सर्व घटकातील शेतकऱ्यांना एकूण खर्चाच्या 50 टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त एक लक्ष रुपये यापैकी जे कमी असेल ती रक्कम अनुदान म्हणून दिली जाते. दौऱ्याकरीता जाणारा लाभार्थी हा स्वतः शेतकरी असावा. स्वतःच्या नावे चालू कालावधीचा सातबारा व आठ अ उतारा असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन शेती असावी. शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी असणे आवश्यक. शेतकरी कुटुंबमधून फक्त एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. सोबत शिधापत्रिका, आधार कार्डाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक. शेतकऱ्याचे वय सहलीला निघण्याच्या दिवशी किमान 25 वर्षे पूर्ण असावे. शेतकरी वैध पारपत्रधारक पासपोर्ट असावा. पारपत्राची वैध मुदत दौरा निघण्यापूर्वी किमान तीन महिन्यापेक्षा जास्त असावी. शेतकऱ्याने यापूर्वी केंद्र, राज्य शासनाच्या कोणताही विभाग, कृषी विद्यापीठामार्फत तसेच स्थानिक स्वराज्य संस्था मार्फत अर्थसहाय्याने विदेश दौरा केलेला नसावा. योजनेच्या अनुषंगाने जिल्ह्याकरिता 5 चे लक्षांक प्राप्त आहे. सदर लक्षांकमध्ये महिला शेतकरी करीता 1, केंद्र, राज्य कृषी पुरस्कार प्राप्त, पिक स्पर्धा विजेते शेतकऱ्यांमधून 1, तसेच इतर शेतकऱ्यांकरिता 3 अशा पद्धतीने विभागणी करण्यात आलेली आहे.

# ग्रामपंचायत गायमुखनगर हद्दीत चिखलाचे साम्राज्य, मूलभूत सुविधांपासून नागरिक वंचित



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - तालुक्यातील व शहरालगत असलेल्या ग्रामपंचायत गायमुख नगर हे नेहमीच वादाच्या भोवऱ्यात असते, सार्वजनिक, रस्ते नाल्या, पाणी असे विविध समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.

त्यमागील महत्वाचे म्हणजे ग्रामपंचायत शासन व प्रशासनाचा नियोजन शून्य कारभार आहे, ग्रामपंचायतच्या निष्क्रिय उदासीन धोरणमुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहे साध्या पावसाळ्याचे दिवस सुरु असून पावसाळ्यापूर्वी सार्वजनिक नाल्यांची साफसफाई करणे गरजेचे होते व तसेच संबंधित ग्रामपंचायतीच्या हद्दीत ज्या ठिकाणी रस्ते चिखलमय होण्याची संभावना असते त्या ठिकाणी, उपाय योजना करणे हे ग्रामपंचायतची नैतिक जबाबदारी आहे, परंतु ग्रामपंचायत गायमुख नगरची कार्यकारणी हे केवळ आणि केवळ भरमसाठ टक्केवारीच्या नादात त्यांना नागरिकांच्या या समस्यांचा विसर पडला आहे. असे सर्व सामान्य नागरिकांमधून बोलल्या जात आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### वारकरी साहित्य परिषदेची बैठक

**कुऱ्हा-** रविवार२० जुलै २०२५ रोजी अमरावती येथे वैष्णवी लॉन्स, किया शोरूम बाजूला, शशीनगर ,बडनेरा रोड, अमरावती येथे श्री विठुरायाच्या सर्व संतांचे विचार तसेच संत साहित्य समाजातील सर्वापर्यंत पोहोचवण्यासाठी स्थापन झालेल्या वारकरी साहित्य परिषदेच्या संत जनाई- मुक्ताई- बहीणाई महिला हरिपाठ मंडळ राज्यस्तरीय स्पर्धेचे नियोजनासाठी जिल्ह्यातील सर्व वारकरी बांधवांना निमंत्रित करण्यात येत आहे. हभ्प. किशोर महाराज उगले व ह.भ.प. यामिनीताई मेहरे जिल्हाध्यक्ष वारकरी साहित्य परिषद अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे या बैठकीसाठी अमरावती जिल्ह्याचे वारकरी साहित्य संपर्कप्रमुख सुरेश निकम हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.वैकुंठ वाशी मालुश्रीताई पाटील यांच्या संकल्पनेतील संत जनाबाई- मुक्ताई-बहिणाबाई ही महिला हरिपाठ मंडळाच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्याच्या हेतूने बैठकीचे नियोजन करण्यात आलेले आहे.



### म. फुले वि.मंडळाचा वर्धापन दिन

**अमरावती-** म. फुले मागासवर्गीय विकास महामंडळ अमरावती चा ४७ वा वर्धापन दिन प्रादेशिक व्यवस्थापक एस. एल. गायकवाड यांच्या अध्यक्षते खाली तर अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.सर्वप्रथम मान्यवरांनी म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या अष्टपैलू जीवनावर प्रकाश टाकला.याप्रसंगी आकाश बसवनाथे, सी. एन. सुरजे, प्रतिभा शेखदार, स्वस्तिक कदम, जयश्री नरवाडे गौरी दिशा हिवराडे, जिल्हा व्यवस्थापक अवघते,पत्रकार सचिन गजभिये, सुमित इंगळे,चव्हाण, साहिल मुंडे,खेडकर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाला कर्मचारी वर्ग, मोठया संख्येने उपस्थित होता.

### सैनिकी पाल्यांचे वसतिगृह प्रवेश सुरू

**अमरावती-** अमरावतीमध्ये माजी सैनिकी मुलांचे वसतिगृह, नवसारी जवाहर नवोदय विद्यालयाच्या मागे असून या वसतिगृहामध्ये एकुण ४८ मुलांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था आहे. तसेच सैनिकी मुलींचे वसतीगृह, नंदनवन कॉलनी, कॅम्प, अमरावती येथे असून या वसतिगृहामध्ये एकुण ४८ मुलींची राहण्याची व भोजनाची व्यवस्था आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात माजी सैनिकांच्या पाल्यांना अती अल्प दरात सैन्याच्या रॅन्कप्रमाणे भाडे आकारले जाते व वीर पत्नी यांच्या पाल्यांना या वसतीगृहामध्ये विनामुल्य प्रवेश देण्यात येतो.प्रवेश घेण्यासाठी संबंधित अधीक्षक, अधीक्षका यांचेकडून प्रवेश पुस्तिका खरेदी करून अर्ज त्यांच्याकडे सादर करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. माजी सैनिक पाल्यास दरमहा २ हजार ५०० रूपये तर सिव्हिल पाल्यास दरमहा ३ हजार ५०० रूपये मिळतील.अधिक माहितीसाठी खालील नमुद दूरध्वनीवर किंवा प्रत्यक्ष संपर्क साधावा.सैनिकी मुलांचे वसतिगृह, नवसारी, अमरावती (०७२१-२५३०३६६), ८३२९९६८३०१, ८६६८९६४६६२ तर सैनिकी मुलींचे वसतिगृह, नंदनवन कॉलनी, अमरावती (०७२१-२५५०४२९), ८८३०८६५३३७ आणि जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती (०७२१-२६६११२६) यावर संपर्क साधावा.

### अहिल्यादेवी होळकर गौरव अभियान

**अमरावती-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरव अभियान १ जुलै ते ३१ मे २०२६ पर्यंत जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने आरोग्य विभागामार्फत दरमहा प्रत्येक आरोग्य संस्थेमध्ये महिलांच्या आरोग्याबाबत उपक्रम राबविण्यात येणार आहे.या उपक्रमाअंतर्गत आरोग्य संस्थानिहाय दरमहिन्यात शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. महिला सक्षमीकरण यामध्ये महिलांसाठी एकूण ४८८ आरोग्य संस्था उपक्रम राबविणार आहेत. त्यामध्ये ५ लाख ८६ हजार २३८ महिलांना लाभ मिळणार आहे. या अभियान अंतर्गत खालीलप्रकारे शिबिर आयोजित करण्यात येत आहेत. लाभार्थ्यांची गर्भधारणापूर्व समूपदेशन तपासणी, उपचार याप्रमाणे तपासण्या करण्यात येतील, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिली.

# आता मनपा शाळा व शिक्षकांच्या सक्षमीकरणासाठी 'विनोबा'चा हातभार

**अमरावती/का.प्र.** शासकीय शालेय शिक्षणात गुणवत्ता आणि नवोपक्रम आणण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या संकल्पनेतून अमरावती महानगरपालिका ने आज 'आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमा' चा शुभारंभ केला आहे.

पुणे येथील 'ओपन लिंक्स फाऊंडेशन'च्या सहकार्याने राबवला जाणारा हा उपक्रम, जिल्ह्यातील शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक सक्षम बनवून त्यांच्या कार्याला नवी दिशा देणार आहे.या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे 'विनोबा ॲप' चा प्रभावी वापर. संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षकांना परस्परांशी जोडून, त्यांच्यात संवाद साधून आणि नवनवीन कल्पनांची देवाणघेवाण करण्यास प्रोत्साहन देऊन शिक्षकांमध्ये उत्साह निर्माण करण्यात विनोबा ॲप ने यश मिळवलं आहे. या अभिनव ॲपमुळे शिक्षकांना शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी एक मजबूत व्यासपीठ मिळेल आणि त्यांच्यातील परस्पर संवाद वाढून एक सक्षम शिक्षक समुदाय निर्माण होईल. यामुळे शिक्षकांना प्रेरणा मिळेल आणि ते उत्साहाने नवनवीन शैक्षणिक उपक्रम राबवू शकतील.

अमरावती महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक



तसेच मनपा उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनात शिक्षण विभागातर्फे विविध नवनवीन उपक्रम राबविले जात असून त्यामुळे पटसंख्येत वाढ झाल्याचे चित्र दिसून येते. त्याच प्रमाणे या उपक्रमामुळे केवळ शिक्षकांचे सक्षमीकरणच होणार नाही, तर प्रशासकीय स्तरावरही याचा मोठा फायदा होणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा उंचावेल. या निमित्ताने अमरावती महानगरपालिका येथील शिक्षणाधिकारी, केंद्र प्रमुख आणि तंत्रस्नेही शिक्षक यांची एकदिवसीय कार्यशाळा आयुक्त आमरावती महानगरपालिका येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अमरावती महानगरपालिकाच्या शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी महत्वपूर्ण पाऊल आहे, असे म्हटले 'आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम' हा केवळ तंत्रज्ञानाचा अवलंब नसून, तो शिक्षकांना प्रेरणा देऊन आणि प्रशासकीय प्रक्रिया अधिक कार्यक्षम बनवून शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न आहे असे आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून नमूद केले. ओपन लिंक्स फाऊंडेशन चे विजय वावगे यांनी या प्रसंगी सांगितले की, विनोबा ॲपच्या माध्यमातून त्यांना जोडण्यासाठी, शिकण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी एक शक्तिशाली साधन उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.यावेळी ओपन लिंक फाउंडेशनचे विजय वावगे ,सागर गजभिये,रघुनाथ वानखडे यांच्यासह अमरावती महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेतील तंत्रस्नेही केंद्रप्रमुख व शिक्षक उपस्थित होते.

## भातकुलीत रमाई-शबरीचे ९० प्रस्ताव तीन महिन्यांपासून धुळखात

### पंतप्रधान आवासबाबत उपसरपंचांचा सवाल

**टाकरखेडा संभू/वार्ताहर** भातकुली तालुक्यात रमाई आणि शबरी आवास योजनेचे तब्बल ९० प्रस्ताव तीन महिन्यांपासून पंचायत समितीमध्ये प्रलंबित असून, या लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेत अद्यापही समाविष्ट करण्यात आलेले नाही. यामुळे अनुसूचित जाती-जमातीच्या घटकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. उपसरपंच प्रदीप शेंडे (टाकरखेडा संभू) यांनी याबाबत प्रशासनाला जाब विचारत स्पष्ट भूमिका घेतली आहे. त्यांनी सांगितले की, संबंधित ग्रामपंचायतींनी रमाई आणि शबरी योजनेचे प्रस्ताव पंचायत समितीकडे वेळेवर पाठवले होते, मात्र तरीही पीएम आवासच्या उद्दिष्टांमध्ये या लाभार्थ्यांना स्थान देण्यात आलेले नाही. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत केंद्र शासनाने गेल्या सहा महिन्यांत



सर्व सामाजिक घटकातील लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करून देण्याचा निर्धार केला होता. जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये उद्दिष्टांचे वितरण पूर्ण झाले असून काही लाभार्थ्यांना दिवाळीनंतर तर काहींना दोन ते तीन महिन्यांपूर्वीच लाभ मिळाला आहे. तालुक्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या ९० जणांचा समावेश आजतागायत झाला नाही, ही बाब आश्चर्यकारक आहे. यामध्ये रमाई योजनेचे ६० आणि शबरी योजनेचे ३० प्रस्ताव आहे. पीएम आवासचे उद्दिष्ट आले असतांना रमाई-शबरी योजनेतील पात्र लाभार्थ्यांना स्थान दिले, असा प्रश्न प्रदीप शेंडे यांनी उपस्थित केला आहे.

### स्वच्छतेबाबत आयुक्त सौम्या शर्मा चांडक सक्त

## पार्कींगसाठी आराखडा तयार करा

**अमरावती/का.प्र.** महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज अंबादेवी, एकविरा देवी व हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ या परिसरांची पाहणी केली. परिसरातील वाढत्या गर्दीमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक आणि स्वच्छतेच्या समस्या लक्षात घेऊन त्यांनी संबंधित विभागांना तातडीने उपाययोजना राबवण्याचे निर्देश दिले.

पाहणीदरम्यान आयुक्तांनी पार्किंगची समस्या दूर करण्यासाठी ससनर आणि बांधकाम विभागांना नियोजनबद्ध आराखडा तयार करण्याचे आदेश दिले. अतिक्रमण विभागाला वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच वाहतूक विभागालाही यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे स्पष्ट केले.आयुक्तांनी अंबानाला



**अंबादेवी परिसराची केली पाहणी**

पुलावरील रिक्त जागेचा पार्किंगसाठी उपयोग कसा करता येईल याबाबतही सविस्तर चर्चा केली. अंबानाला स्वच्छ करण्यात आला असला तरी सध्या मोठ्या प्रमाणात कचरा, निर्माल्य, कपडे व इतर वस्तू नाल्यात टाकल्या जात असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर नाल्यांची स्वच्छता जे.सी.पी. मशीनद्वारे सुरू असून, नाल्यातील गाळ त्वरित उचलण्याचे आदेशही त्यांनी दिले. पाहणीदरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दीपक खडेकार, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, उपअभियंते प्रमोद इंगोले, लक्ष्मण पावडे, हेमंत महाजन, अतिक्रमण पथकप्रमुख योगेश कोल्हे, जेष्ठ आरोग्य निरीक्षक विजय बुरे, स्वास्थ निरीक्षक धनिराम कलोसे, रोहीत हडाले, प्रितम रामटेके, मनिष हिरोडे, कर्मचारी उपस्थित होते.

### विशेष गौरव पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित

**अमरावती-** जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक पाल्य, माजी सैनिक, माजी सैनिक वीर पत्नी यांनी विशेष गौरव पुरस्कारासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती येथून अर्ज प्राप्त करुन १ सप्टेंबर २०२५ पर्यंत सर्व कागद पत्रासहित प्रस्ताव जमा करावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांना, वीर पत्नी यांना कळविण्यात येत की, ज्या माजी सैनिक, वीर पत्नी यांच्या पाल्यांना इयत्ता दहावीमध्ये ९० टक्के व बारावीमध्ये ८५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले आहेत व ज्या पाल्यांचा चालू वर्षात आयआयटी, आयआयएम, एम्स अशा नामवंत व ख्यातीप्राप्त संस्थामध्ये प्रवेश मिळाला असल्यास तसेच कोणत्याही क्षेत्रात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त पात्र उमेदवार अर्ज करु शकतात.

## ज्येष्ठांना बँक व्यवहारात येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करा

### भाजपाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर** ज्येष्ठ व वयोवृद्ध नागरिकांना बँक खात्याच्या व्यवहारा दरम्यान त्यांच्या वयोमानानुसार थब लागत नसल्यामुळे पैसे काढताना मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहे. ज्येष्ठांना स्वतःचे पैसे असून सुद्धा त्यांना पैसे काढता येत नाही. त्यांचे आधार कार्ड त्यांच्या खात्याला लिंक असून सुद्धा या अडचणी निर्माण होत आहे, त्यामुळे वयोवृद्ध नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. तसेच ज्या व्यक्तींना हात नाही किंवा अंगठा नाहीत अशा व्यक्तींना फेस द्वारे किंवा डोळ्यांद्वारे पैसे काढता



यावेत यासाठी उपाययोजना करण्यात यावी. करिता जेष्ठ नागरिकांचे बँक खात्याच्या व्यवहारा दरम्यान वयोमानानुसार थंब लागत नसल्यामुळे त्यांना व्यवहार करण्यास होत असलेल्या अडचणींवर उपाययोजना करण्यात यावी. याबाबतचे निवेदन आज दिनांक १७ जुलैला भारतीय जनता पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांना देण्यात आले आहे.यावेळी नरेश बर्वे,आशिष मेहत्रे, आकाश प्रजापती,निलेश भुस्कडे,प्रदीप तायडे,अनिकेत व वाढ ,प्रशांत धवे उपस्थित होते.

### सहकार क्षेत्रातील योगदानाबाबत प्रस्ताव सादर करा

**अमरावती-** सहकार क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सहकारी संस्थांना त्यांचे सहकार क्षेत्रातील योगदानाबाबत पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी संस्थांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या संस्थेचे मुख्यालय असलेल्या तालुक्यातील उपनिबंधक, सहायक निबंधक, सहकारी संस्था या कार्यालयांशी संपर्क साधून आपल्या संस्थांचे प्रस्ताव ३१ जुलै २०२५ पर्यंत सादर करावेत. अडचण असल्यास उपनिबंधक, सहायक निबंधक, सहकारी संस्था व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था या कार्यालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थाचे सहायक निबंधक ग. म. डावरे यांनी केले आहे.

## चक्रधर स्वामींची विचारधारा महान-कुलगुरू

### महानुभाव अध्यासन केंद्रातर्फे व्याख्यानमाला



**अमरावती/का.प्र.** श्री चक्रधर स्वामींची विचारधारा महान आहे. अध्यासनाच्या माध्यमातून त्या त्या महान विचारवंतांचे विचार विद्यार्थी व समाजातील तळागाळातील माणसांपर्यंत झिरपत जावे व समाजाची उन्नत व प्रगत दिशेने वाटचाल व्हावी, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या महानुभाव अध्यासन केंद्र व कर्तव्य मंगल कार्यालय, श्री प्रशांत महल्ले यांच्या सहकार्यातून कर्तव्य लॉन, रेवसा फाटा, अमरावती येथे पाच दिवसीय प्रबोधन व्याख्यानमालेचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना ते बोलत होते. उद्घाटक म्हणून कविश्वर कुलाचार्य श्री कारंजेकर बाबा, महानुभाव राजापेठ आश्रम, अमरावती तसेच व्याख्याते उपाध्ये कुलाचार्य श्रीवर्धनस्त बिडकर बाबा रणाईचे जि. जळगाव, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. दिनेश निचित, मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. अण्णा वैद्य,अध्यासन केंद्र समन्वयक महंत डॉ. सोनपेठकर बाबा आदी विचारपीठावर उपस्थित होते.

उद्घाटक कवीश्वर कुलाचार्य महंत श्रीकारंजेकर बाबा यांनी स्मृतिस्थळ या ग्रंथाचे महत्त्व अधोरेखित करुन स्मृतीस्थळातील निवडक आठवणींचा उल्लेख करताना कवी नरेंद्र यांची कवी निष्ठा किती महत्त्वाची होती, एकूणच महानुभाव्य वाङ्मयांमध्ये स्मृतिस्थळ या ग्रंथाचे काय महत्त्व आहे, याविषयी सविस्तर सांगितले. दीप प्रज्वलन व विद्यापीठ गीताने उद्घाटनीय समारंभाची सुरुवात झाली. या पाच दिवसीय प्रबोधन व्याख्यानमालेचे प्रयोजन व महानुभाव अध्यासन केंद्राची भूमिका विषद करताना सोनपेठकर बाबा यांनी सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचा विचार समाजापर्यंत पोहोचण्यासाठी विद्यापीठ पातळीवरून होणा-या विविध कार्यक्रमाचा आढावा घेतला. कार्यक्रमात अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष झाल्याबद्दल महंत कारंजेकर बाबा यांचा राऊळ माय राऊळ बापू, पारायण मंडळ अमरावतीर्फे शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी केले. व्याख्यान कार्यक्रमाला अमरावती शहरातील महानुभाव संप्रदायिक भिक्षुक मंडळी तसेच वासनिक मंडळी उपस्थित होते.

## महाराष्ट्रात फडणवीसांच की गुंडांचे सरकार?

### राष्ट्रवादी श.प.पक्षाच्या ओबीची विभागाचे प्रदेश सरचिटणीस मंगेश भटकर पाटील यांचा सवाल

**अमरावती/का.प्र.** काल विधानभवनात भाजप आमदार पडळकर याचे समर्थक येऊन विरोधकांवर हल्ले करतात. फडणवीस यांनी 'कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा' या सरकारच्या काळात कायदा सुव्यवस्थेचा तर तीन तेरा वाजलेच पण आता तर विधानभवनात सुद्धा गुंडगिरी सुरू झाली असून महाराष्ट्रात फडणवीसांचे की गुंडांचे सरकार? असा सवाल राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या ओबीची विभागाचे प्रदेश सरचिटणीस मंगेश भटकर पाटील यांनी केला आहे.



फडणवीस साहेब आज तुमच्या पक्षाचे आमदार, कार्यकर्ते विरोधी आमदारांच्या जीवावर उठले, तर जनते सोबत हे काय करत असतील याचा विचार करा. तुमच्या कार्यकाळात विधानसभेसारखी जागा जर सुरक्षित नाही तर तुम्ही राज्यातील जनतेला काय सुरक्षा द्याल. भाजप राज म्हणजे गुंडाराज असे जनतेनी सामजावे काय?आज राज्यात वाढती गुंडगिरी, राज्यात गुटक्याचा सुळसुळाट, आज आमच्या आया बहिणींना रस्त्यावरून फिरणे अश्यक्य झाले आहे. स्त्री सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आहे?साहेब दुसऱ्याच्या पक्षाची फोडाफडी करण्याऐवजी ज्या कामांकरिता जनतेने निवडून दिले त्यावर लक्ष द्या. आणि फडणवीस साहेब सर्वात मोठा प्रश्न हा आहे की गुड कार्यकर्ते विधानभवनात घुसले कसे? तुम्ही त्या पडळकर वर काय कारवाई करणार? या प्रकाराची जबाबदारी तुम्ही घेणार का? की या पडळकरला ही क्लीन चिट देणार?असे प्रश्नही उपस्थीत केले आहे.

## 'चुकीची जीवनशैली व उद्भवणाऱ्या व्याधीवर उपाययोजना'

### विद्यार्थी व पालकांसाठी आरोग्य भारतीची 'आरोग्य वारी'

**अमरावती/का.प्र.** सध्याच्या धकाधकीच्या काळात सर्वांची जीवनशैली बदलत चालली आहे. त्याचा थेट परिणाम आरोग्यावर होत आहे. ही गंभीर बाब लक्षात घेऊनच अमरावती महानगर आरोग्य भारती तर्फे 'चुकीच्या जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या व्याधींवर उपाय योजना' या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक सांस्कृतिक भवनात सोमवार २१ जुलै २०२५ रोजी सायंकाळी सहा ते साडेआठ या कालावधीत ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. याच कार्यक्रमात विदर्भ युथ



**वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन**

वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांचा सत्कार आयएमए तर्फे करण्यात येणार आहे .या कार्यक्रमात मुलांच्या आहारासंबंधी व चुकीच्या आरोग्य शैलीमुळे होणाऱ्या आरोग्य त्रासाविषयी 'प्रयासचे' संचालक डॉ.अविनाश सावजी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

किशोरवयीन मुलांच्या समस्यांबाबत बालरोग तज्ञ डॉ. जयंत पांढरीकर, मुलांची एकाग्रता वाढविण्यासंबंधी डॉ.राजेश गाडबैल व डॉ .दीपा गाडबैल मार्गदर्शन करणार आहेत. विशेष बाब म्हणजे मुळात रोगच निर्माण होऊ नये यासाठी जीवनशैली कशी असावी याविषयी आरोग्य भारतीचे राष्ट्रीय सचिव व ख्यातना वक्ते डॉ. अशोक कुमार हे मार्गदर्शन करणार आहेत. गॅलेक्सी सर्जिकल अँड लॅप्रोस्कॉपिक हॉस्पिटल अमरावती, आयएमए अमरावती, आर्ट ऑफ लिव्हिंग, विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी यांच्या सहकार्याने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.आरोग्यदायी कार्यक्रमाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन इंडियन मेडिकल असोसिएशन अमरावतीच्या अध्यक्षा डॉ. अलका कुथे व सचिव डॉ. राधा सावदेकर यांनी केले आहे.

# ग्रेट पती ते ग्रेट सामाजिक कार्यकर्ता



प्रथम स्मृती दिनानिमित्त

हेमंत कुलकर्णी एक आदर्श व्यक्तिमत्व व अमरावती शहरातील ख्यातनाम वकील. आज त्यांना जाऊन एक वर्ष झाले. परंतु आजही ते आपल्या आठवणीत कायमस्वरूपी आहे. जेव्हापासून आमची कॉलेज जीवनामध्ये भेट झाली तेव्हापासून ते आदर्श पती, आदर्श पिता, आदर्श सासरे आणि आदर्श आजोबा या प्रवासापर्यंत.

१९८२ पासून वकिलीला सुरुवात केल्यानंतर प्रपंच्यावर सोपवलेल्या प्रत्येक कामामध्ये त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणाने काम केल्याने ते 'बेस्ट पती' होते. त्यांचा स्वभाव प्रत्येक कर्मचाऱ्याला, नागरिकाला, क्लाइंटला, नातेवाईकाला, दोस्त-मित्राला मदत करणारा. त्यांची ही जी प्रवृत्ती होती ती त्यांनी शेवटपर्यंत सांभाळली. मित्रांमध्ये वेळप्रसंगी ते रागवत सुद्धा. परंतु तो प्रेमळ राग होता. त्या रागाच्या पाठीमागे समोरच्याचे भविष्य उज्वल व्हावे हा त्यातील सात्विक हेतू. कोर्टात त्यांची वकील मित्रमंडळी त्यांना 'हेम भाऊ' या टोपण नावाने ओळखत.

त्यांचे बालपण हे गेटच्या आतमध्ये गेले असल्यामुळे ते निळकंठ मंडळाचे सक्रीय कार्यकर्ते होते. तसेच ते निळकंठ मंडळाचे सचिव होते. निळकंठ मंडळाचे जेव्हा ते सेक्रेटरी होते तेव्हा पैशाचा हिशेब स्वतः जातीने बघत. निळकंठ मंडळ त्यांचा जीव की प्राण. मंडळाच्या बाबत कुठलीही घटना किंवा कुठलाही कार्यक्रम हा त्यांच्याकरिता 'प्रायोरिटी' राहायचा. न्यायालयात वकिली करताना पैसा हा उद्देश त्यांचा कधीही नव्हता. गरजूंना न्याय मिळवून देणे हेच त्यांचे ध्येय. बँकेत देखील सातत्याने महत्त्वाचे केसेस ते चालवत. बँकेमध्ये सुद्धा पॅनलवर होते. सिटी क्लबचे सेक्रेटरी पद त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे सांभाळले. अनेकांना मदत करणे हा त्यांचा बाणा. त्यांनी कधीही कोणाशी वाद घातला नाही.

कॉलेज काळात ते युवक काँग्रेसचे सचिव होते. त्यांनी पूर्ण आयुष्य सगळ्यांचे भले व्हावे याकरिता खर्ची घातले. आजही त्यांच्या चांगुलपणाचा उहापोह होतो. त्यांच्या पश्चात पत्नी सुनंदा कुलकर्णी, मुलगा वैभव कुलकर्णी, सून आणि एक नात असा चार जणांचा परिवार सोडून गेलेले आहेत. पण आजही त्यांची कमी संपूर्ण परिवाराला जाणवते. मुलगा वैभव कुलकर्णी हा सुद्धा एक उत्कृष्ट अधिवक्ता आहे. त्यांच्या सहकार्यामुळे मी वर्ग एकच्या अधिकारी पदापर्यंत पोहोचू शकले. आज त्यांचे वर्षश्राद्ध. त्यानिमित्त त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली...

■ **सुनंदा कुलकर्णी**

# मैत्री जपणारा : हेमचंद्र

हेमचंद्र नारायणराव कुळकर्णी यांचा आज प्रथम स्मृतिदिन. त्यानिमित्य त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन. हेमंत कुळकर्णी हे मुळचे आकोट येथील रहिवासी शिक्षणाचे निमित्याने ते भाऊ व बहिणीसह अमरावती येथे त्यांचे आजोबा कै. नारायणराव केवले यांच्याकडे शिक्षणासाठी आले. येथुनच अभिनंदन पेंढारी व दिपक हुंडीकर यांची मैत्रीची सुरवात झाली.निळकंठ व्यायाम मंडळात खेळत असता त्यांचा मंडळाच्या कार्यात सहभाग सुरु झाला. व्यायाम, कुस्ती, पोहणे यात त्यांची विशेष आवड. ते महाविद्यालयीन संघातून विद्यापीठाच्या कुस्ती स्पर्धामध्ये सहभागी होत. महाविद्यालयात शिकत असतांना विद्यार्थी चळवळीतही सक्रिय होता.एकवर्षी राज महाविद्यालयांत छात्रसंघाचा अध्यक्ष म्हणून निवडून आला. निळकंठ मंडळात तो लेझीम पथकापासून सर्वच पथकात भाग घेत होता. संस्थेच्या गणेशोत्सव, क्रीडा स्पर्धा, व्याख्यान माला सांस्कृतिक कार्यक्रम यात हिरीरीने भाग घेत होता. काही वर्ष त्याने व्यायाम शाळेची जबाबदारी ही सांभाळली होती. संस्थेत सचिव म्हणून काम केले. त्याकाळात त्याने रक्तदान शिबिरात भाग घेतला वर्षातुन तीन चार वेळा तो स्वतःहून सामान्य रुग्णालयात जाऊन अनेक वर्ष रक्तदान करीत व सहकारी मित्रांनाही रक्तदान करण्यास प्रेरणा देत होता.

शिवाजी विधी महाविद्यालयातून एल. एल. बी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्याने ॲड विजय केवले, ॲड आप्पासाहेब कुळकर्णी यांचे मार्गदर्शनात वकीलीचा प्रारंभ केला.आपल्या पक्षकारांना न्याय मिळवून दिला.अमरावती शहर युवक काँग्रेसमधेही तो सक्रिय होता. या सर्व बाबींमुळे त्यांचा जनसंपर्क दांडगा होता व मित्रपरिवारही मोठा होता.अडचणीच्या वेळी आवाज दिल्या बरोबर सहकार्यासाठी तत्पर हजर होऊन मनापासून सहकार्य करीत असे. तो परखड विचारांचा वक्ता होता. त्याने कौटुंबिक जबाबदारीही व्यवस्थितपणे सांभाळली.भाऊ, बहीण, नातलग यांचेशी सतत संपर्कात होता. या सर्व वाटचालीत आमच्या वाहिनी ॲड सुनंदा कुळकर्णी यांची त्याला मोलाची साथ होती. त्यांनी मुलगा वैभवलाही वकील केले व तो आज दिल्ली येथे चांगल्या परीने कार्य करीत आहे. गतवर्षी उन्हाळयाच्या सुटी म्हणुन दिल्लीस गेले असता अल्प आजाराने सगळयांना सोडून गेले. परंतु मनात जुन्या आठवणी व स्मृती सदैव कायम आहेत. आज प्रथम स्मृतीदिनानिमित्य श्रद्धांजली.

■ **अभिनंदन पेंढारी,**
■ **दिपक हुंडीकर**
**अमरावती**

# मोफत औषधांचा दावा: किती खरा, किती खोटा?



**मोफत उपचार आणि औषधांची तरतूद करणारे सरकारचे आरोग्यविषयक कार्यक्रम उपलब्ध असतानाही बहुतांश रुग्ण खासगी आरोग्यसेवेकडे वळतात, असे एका सॅम्पल सर्व्हेमध्ये आढळून आले आहे. असे का होते? लोक सरकारी रुग्णालयांमध्ये का जात नाहीत?**

भारतात मधुमेह आणि उच्च रक्तदाबाच्या रुग्णांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर) आणि जागतिक आरोग्य संघटनेनुसार, देशात अंदाजे दहा कोटी लोकांना रक्तदाब आहे आणि आठ कोटींहून अधिक लोक मधुमेहग्रस्त आहेत. ही संख्या दरवर्षी वाढते आहे. केंद्र शासनामार्फत 'राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम' सन २०१० पासून राबवला जातो. या कार्यक्रमांतर्गत कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग, पक्षाघात, इत्यादी १३ प्रकारच्या आजारांचा प्रतिबंध व नियंत्रणासाठी तपासणी व आवश्यक औषधे उपलब्ध करून देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमात आरोग्यवर्धिनी केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील ३० वर्षांवरील स्त्री-पुरुषांची तपासणी व मोफत औषधे उपलब्ध करून दिली जाणे अपेक्षित आहे. उच्च रक्तदाब व मधुमेह या दीर्घकालीन आजारांवर रुग्णांना नियमितपणे औषधोपचार घेणे आवश्यक असते. या असंसर्गजन्य आजारांची माहिती व नियंत्रणासाठी, शासनाकडून 'आयुष्यमान भारत कार्यक्रम'अंतर्गत नियमितपणे आरोग्य तपासणी शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच रुग्णांचा उपचारांवरील खर्च कमी व्हावा, म्हणून नियमित व योग्य वेळी उपचार घेण्यासाठी आरोग्यवर्धिनी केंद्रातून उच्च रक्तदाब आणि मधुमेहासाठी आवश्यक मोफत उपचार व औषधे उपलब्ध करण्याची तरतूद आहे. मात्र बहुतांश रुग्ण हे खासगी रुग्णालयातून उपचार घेत असल्यामुळे, या उपचाराचा व औषधांचा खर्च रुग्णाला स्वत:च्या खिशातून करावा लागतो. साहजिकच, यामुळे कुटुंबावरील आर्थिक भार वाढतो; हे विविध अभ्यासांतून समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर, निम्न आर्थिक गटातील कुटुंबांमध्ये उच्च रक्तदाब व मधुमेह असलेल्या रुग्णांवर खासगी ठिकाणी उपचार घेताना होणारा खर्च आणि आरोग्यवर्धिनी केंद्रातून सेवा घेताना येणाऱ्या अडचणी समजून घेण्याच्या उद्देशाने पाहणी केली. या पाहणीत सोलापूर व नाशिक शहरातील एकूण ४०० कुटुंबांतील ४५० रुग्णांची माहिती नोंदवण्यात आली. यापैकी ३५.७८ टक्के (१६१ रुग्ण) हे रक्तदाब, २८ टक्के (१२६ रुग्ण) मधुमेह, तर रक्तदाब व मधुमेह हे दोन्ही असणाऱ्या रुग्णांचे प्रमाण ३६.२२ टक्के (१६३ रुग्ण) इतके होते.

पाहणीत समाविष्ट असलेली बहुतांश कुटुंबे गरीब वस्त्यांमध्ये राहणारी व निम्म्यापेक्षा जास्त (५३.७५ टक्के) कुटुंबे ही हातावर पोट असणारी होती. ही कुटुंबे रोजमजुरी, घरकाम, बांधकाम, नाक्यावर काम, विडीकाम, ड्रायव्हर किंवा रिक्षा चालवणे अशा अस्थिर उत्पन्नाच्या स्रोतांवर अवलंबून होती. याव्यतिरिक्त, १०९ (२७.२५ टक्के) कुटुंबे ही फळे-भाजी विक्री, पापड-बांगडी बनवणे, पिठाची गिरणी, शिवणकाम, वगैरे असे लहान व्यवसाय करत होती. तर ६० (१५ टक्के) कुटुंबे स्थानिक व्यवसाय, हॉस्पिटलमध्ये किंवा कंपनीत सुरक्षारक्षक म्हणून कंत्राटी पद्धतीने काम करत होती. आर्थिक परिस्थितीकडे पाहिल्यास २२६ (५६.५ टक्के) कुटुंबांचे मासिक उत्पन्न हे १० हजार रुपयांपेक्षादेखील कमी होते. म्हणजेच आजच्या महागाईच्या काळात त्यांचे उत्पन्न मूलभूत गरजाही पूर्ण करू शकत नाहीत, हे आमच्या लक्षात आले. ११७ कुटुंबांचे उत्पन्न १० ते २० हजार दरम्यान होते. फक्त ५७ कुटुंबांचे उत्पन्न २० ते ३५ हजारांच्या दरम्यान होते. वरील सर्व कुटुंबांची आर्थिक परिस्थिती दीर्घकालीन आजारासाठी नियमित औषधोपचार घेऊ शकेल अशी नव्हती.

**हे रुग्ण औषधे कुठून घेतात?**

आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये आयोजित तपासणी शिबिरांमध्ये रुग्णांची नोंद घेऊन, त्यांना कार्ड दिले जाते आणि त्या आधारे रुग्णांना मोफत औषधे नियमित दिली जाणे अपेक्षित आहे. आम्ही पाहणी केलेल्या ४५० रुग्णांमध्ये तब्बल ९४ टक्के (४२३) रुग्ण खासगी मेडिकलमधून पदरमोड करून औषधे खरेदी करतात. फक्त सहा टक्के (२७) रुग्णांनाच सरकारी दवाखान्यातून मोफत औषधे मिळत होती. पाहणीत सहभागी ३८८ (९७ टक्के) कुटुंबांचे मासिक उत्पन्न २० हजार रुपयांपेक्षा कमी होते. परवडत नसले तरीही या कुटुंबांतील बहुतांश (८६.२९ टक्के) रुग्णांना खासगी मेडिकलमधूनच औषधे घ्यावी लागतात. त्यामुळे कमी उत्पन्न गटातील लोकांना साध्या आजारांवरही नियमित उपचार घेणे कठीण जाते.

डॉक्टर व लॅब तपासणी वगळता प्रत्येक रुग्णाला दरमहा सरासरी ९९९ रुपये (वार्षिक ११,९८६ रुपये) खर्च येत होता. एकाच कुटुंबात एकाहून अधिक रुग्ण असतील, तर ही रक्कम दुप्पट किंवा अधिक होत होती. या पाहणीतील सहभागी कुटुंबांचा फक्त रक्तदाब आणि मधुमेहाच्या औषधांसाठी वर्षाला एकूण ५० लाख ७० हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च होतो, हे लक्षात आले. या कुटुंबाची मासिक उत्पन्नाच्या सुमारे नऊ टक्के रक्कम ही फक्त औषधांवर खर्च होते.

हा खर्च करताना या कमी उत्पन्न गटातील कुटुंबांना काही मूलभूत गरजांनाच कात्री लावावी लागते. अनेकदा घरखर्च, शिक्षण, अन्न यावरचा खर्च कमी करून औषध घेण्याचा निर्णय घेतला जातो. औषधांवरचा हा नियमित खर्च ही केवळ आरोग्य समस्या न राहता या कुटुंबासाठी आर्थिक लढाईदेखील आहे.

**लोक सरकारी दवाखान्यात का जात नाहीत?**

सरकारी दवाखान्यात मोफत औषधांची सुविधा उपलब्ध असूनही रुग्ण खासगी मेडिकलमधून औषधे विकत घेतात. यामागे पुरेशा औषधांचा अभाव. औषधांचा नियमित तुटवडा ही मुख्य कारणे आहेत. रुग्णांच्या मते, सरकारी दवाखान्यात पूर्ण महिन्याची औषधे दिलीच जात नाहीत. बहुतेक वेळा फक्त तीन ते पाच दिवसांची औषधे मिळतात. त्यामुळे वारंवार दवाखान्यात हेलपाटे घालावे लागतात. ते रोजमजुरी करणाऱ्या रुग्णांना शक्य होत नाही. याशिवाय, सरकारी दवाखान्यांमध्ये मोठी गर्दी असते. त्यामुळे रांगेत तासंतास थांबावे लागते. काही रुग्णांना दवाखाना लांब असल्याने तेथे जाणे कठीण जाते. पाहणीतील सुमारे एक चतुर्थांश रुग्णांना सरकारी दवाखान्यात मधुमेह व रक्तदाबाच्या औषधांची मोफत सुविधा उपलब्ध आहे, याची माहितीच नव्हती. तसेच काही रुग्ण सरकारी औषधांवर विश्वास ठेवत नाहीत. तर काही जणांच्या मते खासगी डॉक्टरांनी लिहिलेली औषधे सरकारी दवाखान्यात मिळत नाहीत. अशी काही कारणे पाहणीतून समोर आली. या सर्व कारणांमुळे रुग्ण नाइलाजाने खासगी मेडिकलमधून औषधे विकत घेतात.

राज्यातील सर्वसामान्य व कष्टकरी जनतेला सरकारी दवाखान्यातून रक्तदाब आणि मधुमेहाच्या मोफत औषधांची सुविधा मिळेल, अशी घोषणा करण्यात आली आहे. मात्र, फक्त आरोग्य शिबिरे घेऊन आणि रुग्णांची नोंदणी करून अपेक्षित बदल होणार नाही किंवा एवढ्यावर कार्यक्रमाचे यश ठरवता येणार नाही. रुग्णसंख्येनुसार प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र आणि आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये औषधांचा साठा नियमित व पुरेशा प्रमाणात उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच, याबाबत गाव-वस्त्यांमध्ये जनजागृती करणे, आणि जास्तीत जास्त गाव-वस्त्यांमध्ये तपासणी शिबिरांचे आयोजन करून नवीन रुग्णांना सरकारी आरोग्य केंद्रांमार्फत औषधे मिळवून देणे आवश्यक आहे. सरकारी आरोग्यसेवा सक्षम करून व लोकांपर्यंत त्याची योग्य माहिती पोहोचवून, कुटुंबांवर येणारा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी करता येईल. केवळ आर्थिक खर्चापोटी बरेच मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचे रुग्ण अर्ध्यातून उपचार सोडून देतात. हेच रुग्ण भविष्यात गंभीर आणि गुंतागुंतीच्या आजारांना सामोरे जातात.

ही पाहणी म्हणजे हिमनगाचे टोक आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, महाराष्ट्रात साधारण दीड ते दोन कोटींपेक्षा जास्त उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचे रुग्ण असण्याची शक्यता आहे. त्यांचा औषधांवर होणारा खर्च सरकारी दवाखान्यांमुळे वाचणार असेल, तर सामान्यांच्या खिशाचा आर्थिक भार कमी होऊ शकतो. आरोग्य योजनांचे कागदावरचे स्वरूप व प्रत्यक्ष अंमलबजावणी यातली तफावत प्रचंड मोठी आहे. सध्या पूर्णपणे न परवडणाऱ्या औषधांसाठी खासगी मेडिकलवर अवलंबून असलेले, पाहणीतील व तत्सम अनेक लोक, जेव्हा शासकीय मोफत आरोग्यसेवांच्या दर्जा व औषध उपलब्धतेविषयी खात्री वाटून या सेवांचा लाभ घेतील, तेव्हाच 'राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम' यशस्वी झाला, असे म्हणता येईल.

■ **विनोद शेंडे/**
■ **डॉ धनंजय काकडे**

# 'बँक राष्ट्रीकरण आणि अर्थक्रांती'

भारतातील बँकांचे राष्ट्रीयकरण ही एक परिवर्तनकारी घटना होती ज्याने भारतीय बँकिंग उद्योगात फार मोठा बदल झाला. आज जी काही देशाची प्रगती झाली आहे. त्यात बँक राष्ट्रीयीकरणाची महत्वाची भूमिका आहे. बँकांचे राष्ट्रीयकरण म्हणजे बँका सरकारी मालकीच्या असणे होय. सर्वप्रथम १९४९ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. त्यानंतर १९ जुलै १९६९ रोजी १४ बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. बँकांच्या ठेवी ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहेत त्यावर आधारित हे होते. ह्यात सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ बडोदा, देना बँक, यूको बँक, कॅनरा बँक, युनाइटेड बँक, सिंडिकेट बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, अलाहाबाद बँक, इंडियन बँक, इंडियन ओव्हरसीज बँक आणि बँक ऑफ महाराष्ट्र ह्या प्रमुख १४ बँकांचा समावेश होता. हे देशातील पहिले आणि सर्वातमोठे बँकांचे राष्ट्रीयकरण होते. हा देशहिताचा महत्वपूर्ण निर्णय तेव्हाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी घेतला होता. ह्या बँक राष्ट्रीयीकरणाचे फायदे अजूनही भारतीय जनता मोठ्या आनंदाने घेत आहे.

त्यानंतर १५ एप्रिल १९८० मध्ये ६ बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. हे ज्या बँकांच्या ठेवी २०० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहेत त्यावर आधारित होते. ह्यात आंध्रा बँक, कॉर्पोरेशन बँक, न्यू बँक ऑफ इंडिया, ओरिएंटल बँक ऑफ इंडिया, पंजाब आणि सिंध बँक, विजया बँक ह्या ६ प्रमुख बँकांचा समावेश होता.तेव्हाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी खालील प्रमुख कारणांसाठी बँकांचे राष्ट्रीयकरण केले होते. खऱ्या अर्थाने ही अर्थक्रांतीच्या दिशेने राष्ट्रहितासाठी उचलेले मोठे पाऊल होते.




१) स्वातंत्र्यानंतर, भारत सरकारने देशासाठी नियोजित आर्थिक विकास स्वीकारला होता. पंचवार्षिक योजनांतर्गत स्वीकारण्यात आलेल्या समाजवादी धोरणांची भारतातीतलं बँकांचे राष्ट्रीयकरण आवश्यक होते. ह्यामुळे हरितक्रांती, श्वेतक्रांती यशस्वी होऊ शकली. हरितक्रांतीमुळे आपला देश अन्नधान्याने समृद्ध झाला. एकवेळ अशी होती की देशाच्या पंतप्रधानांना अन्नधान्य मुबलक नसल्यामुळे नागरिकांना एकवेळ उपाशी राहण्याचे आवाहन तेव्हाचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी केले होते. एव्हढा मोठा अन्नधान्याचा तुटवडा तेव्हा होता.

२) १९६२ मध्ये चिन सोबतच्या युद्धामुळे आणि १९६५ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धांमुळे अनेक आर्थिक धक्क्यांमुळे सार्वजनिक वित्त व्यवस्थेवर प्रचंड दबाव निर्माण झाला होता. हा दबाव मोकळा करण्यासाठी बँकांचे राष्ट्रीयकरण आवश्यक होते.

३) सलग दोन वर्षाच्या दुष्काळामुळे केवळ अन्नटंचाई निर्माण झाली नाही तर अमेरिकन अन्न शिपमेंटवर अवलंबून राहिल्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा देखील धोक्यात आली होती.

४) अन्न सुरक्षेत देशाला स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने भारतात हरितक्रांती सुरु झाल्यानंतर शेतीला भांडवलाची आवश्यकता होती. त्यामुळे बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले.

५) अर्थव्यवस्थेच्या नियोजित विकासासाठी अर्थव्यवस्थेद्वारे निर्माण होणाऱ्या भांडवलावर काही प्रमाणात सरकारी नियंत्रण आवश्यक होते.

६) त्या बरोबरच सामाजिक कल्याण, खाजगी मक्तेदारींवर नियंत्रण ठेवणे, ग्रामीण भागात बँकांचा विस्तार (आर्थिक समावेशन), प्रादेशिक समतोल आणि शहरी-ग्रामीण दरी दूर करणे हे सुद्धा मुख्य उद्देश होते.

बँक राष्ट्रीयीकरणाचे फायदे :-

१) ग्राहकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आणि सेवा सुधारण्यात मदत झाली.२) बँक राष्ट्रीयीकरणामुळे बँकांनी ग्रामीण भागात विस्तार करण्यास सुरुवात केली. यामुळे अर्थव्यवस्थेचाही विस्तार झाला आणि देशाच्या दुर्गम भागातही रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या.३) बँक राष्ट्रीयीकरणामुळे गेल्या २८ वर्षात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या शाखा ७२१९ वरून ५७००० पर्यंत ८०० टक्क्यांनी वाढल्या आहेत. ठेवी आणि कर्जामध्ये ११,००० टक्के आणि ९००० टक्क्यांनी मोठी वाढ झाली आहे.४) बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर सुरु झालेल्या प्राधान्य क्षेत्र कर्ज योजनेमुळे कृषी आणि संबंधित क्षेत्रे राष्ट्रीय उत्पन्नात सर्वात मोठे योगदान देणारे म्हणून उदयास आली.५) बँक राष्ट्रीयीकरणामुळे लोकांच्या बचतीला मोठ्या प्रमाणात एकत्रित करण्यास आणि त्याचा उत्पादक हेतूंसाठी वापर करण्यास मदत झाली.६) गरीब आणि गरजू लोकांना कर्ज मिळणे सोपे झाले.७) बँकिंग क्षेत्रात सरकारी नियंत्रण वाढल्याने आर्थिक स्थैर्य आले.

२०१७ मध्ये केंद्र सरकारने विलीनीकरणाची तयारी केली. ह्यामुळे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या इतर पाच उप बँकांचा समावेश करण्यात आला. यामध्ये स्टेट ऑफ बिकानेर अँड जयपूर, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, स्टेट बँक ऑफ इंडिया पतियाळा आणि स्टेट बँक ऑफ हैद्राबाद यांचे बँकेत विलीनीकरण करण्यात आले.

२०१९ मध्ये केंद्र सरकारने जवळपास १० राष्ट्रीयकृत बँकांचे एकमेकांमध्ये विलीनीकरण केले. ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि युनायटेड बँक ऑफ इंडिया या दोन्ही बँक पंजाब नॅशनल बँकेत विलीन आल्या. सिंडिकेट बँकेचे कॅनरा बँकेत विसर्जन करण्यात आले. आंध्र बँक आणि कॉर्पोरेशन बँक युनियन बँक ऑफ इंडियामध्ये विलीन झाली. अलाहाबाद बँक इंडियन बँकेत तर देना बँक आणि विजया बँकेचे बँक ऑफ बडोद्यात विलीनीकरण करण्यात आले.

केंद्र सरकारने सरकारी बँकांच्या खासगीकरणाचा घाट घातला आहे. त्याला बँकिंग क्षेत्रातील तज्ञ, कर्मचारी, अधिकारी त्यांच्या संघटनांनी कडाडून विरोध केला आहे. पण केंद्र सरकार त्यावर अडून बसली आहे. त्यासाठीची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. खासगी बँकांच्या राष्ट्रीयीकरणापासून सुरु झालेला हा प्रवास आता राष्ट्रीय बँकांच्या खासगीकरणापर्यंत येऊन ठेपला आहे.

१९९१ मध्ये रिफॉर्म्स आले. ह्या नंतर बँकांचा चेहरा मोहरा बदलला. कंत्राटीकरणावर भर देण्यात आला. काल पर्यंत बँकामध्ये सेवा देणे होते. आता उद्देश बदलला आहे. तो आता जास्तीत जास्त नफा कमविणे झाला आहे. सर्व बँका नफा कामविणाच्या मागे धावत आहेत. कंत्राटीकरण ह्या नवीन फॅडने जन्म घेतला आहे. कंत्राटीकरण म्हणजे दुसरे तिसरे काही नसून केवळ जनतेचे शोषण आहे. एकीकडे बँकांचा भरमसाठ व्यवसाय वाढत आहे, नफा पण वाढत आहे तर दुसरीकडे कर्मचाऱ्यांची भरती होत नाही आहे. त्यामुळे ग्राहक सेवा दिल्या जास्त नाही आहे. ग्राहक सेवेवर अनिष्ठ परिणाम होतो आहे. ग्राहकांमध्ये असंतोष निर्माण होतो आहे. त्यामुळे ग्राहक सरकारी बँकांवर नाराज होतात व त्यांच्या मध्ये सलोख्याचे संबंध निर्माण होत नाही आहेत.

बँक राष्ट्रीयीकरणानंतर सरकारी बँकांचा मूळ उद्देश हा सेवा देणे होता आणि आताही तेच अपेक्षित आहे ना की नफा कमविणे आहे. कालपर्यंत बँक मोफत सेवा देत होत्या, त्यात ए.टी.एम. फ्री, पासबुक फ्री, स्टेटमेंट फ्री, खात्यात रक्कम जमा करणे, काढणे ह्या सर्व सेवा अगदी मोफत होत्या. आता ह्या सर्व सेवांसाठी बँका शुल्क लावत आहेत. बँकिंग हा भारतीय नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. हा अबाधित ठेवण्यासाठी बँक उद्योगातील बहुसंख्य असलेली संघटना ए.आय.बी.ई. ए. ही नागरिकांच्या भल्यासाठी आंदोलने, संप व जोरदार संघर्ष करीत आहे.राष्ट्रीयकृत बँका वाचवायचा असतील तर जन आंदोलन करणे ही काळाची गरज आहे.

■ **अरविंद सं. मोरे,**
**अध्यक्ष, बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन, (ए.आय.बी.ई.ए.) मुंबई, मो. ९४२३१२५२५१**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच
अकोला जिल्हा विशेष

# अकोट शहरात सोमवारपासून अतिक्रमण हटाव मोहीम

## शहरातील सर्वच मार्गावरील अतिक्रमण हटणार - रस्ते घेणार मोकळा श्वास

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट शहरात पुन्हा एकदा अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येणार असून, नगरपालिका प्रशासनाने अतिक्रमण धारकांना २४ तासांची अंतिम मुदत दिली आहे. काहींनी स्वखुशीने आपली अतिक्रमणे हटवली असली तरी, उर्वरित अतिक्रमणांवर सोमवारपासून बुलडोझर चालणार आहे.

शहरातील वाहतुकीस अडथळा ठरणारी तसेच सांडपाणी निचऱ्याच्या नाल्यांवर उभारलेली अतिक्रमणे हटविण्याची ही व्यापक मोहीम असून, मुख्य रस्ते, नाले व चौकातील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात येणार आहे.

अकोटचे मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे यांच्याकडे मूर्तिजापूरचा अतिरिक्त प्रभार असल्याने पहिल्या टप्प्यात मूर्तिजापूरमधील अतिक्रमणांवर कारवाई होणार असून, दुसऱ्या टप्प्यात अकोट शहरात ही मोहीम राबवली जाईल.

**छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिजामाता नगर मार्ग अतिक्रमणमुक्त होणार**

दि. २१ जुलैपासून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिजामाता नगर परिसरातील तसेच इतर मुख्य चौकांतील अतिक्रमण हटविण्याची तयारी पूर्ण झाली आहे. काही व्यावसायिकांनी तात्पुरत्या स्वरूपात तर काहींनी पक्की अतिक्रमणे उभारल्याने रस्ते अरुंद झाले होते. त्यामुळे पादचारी व वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

**या भागांत अतिक्रमण अधिक**

- छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिजामाता नगर
- छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अकोला मार्ग
- छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सराफा लाइन
- अकोला नाका ते दर्यापूर नाका
- सोनू चौक ते नरसिंग रोड

मान्सूनपूर्व नालेसफाई दरम्यान अतिक्रमणामुळे समस्या निर्माण होत होती. अनेक दुकानदारांनी टिनशेड उभारून दुकानाचा विस्तार रस्त्यापर्यंत केला होता. त्यामुळे वाहतूक कोंडी नित्याची बाब झाली होती. नागरिकांनी यासंबंधी वारंवार नाराजी व्यक्त केली होती.

**मुख्य नाल्यांवरील अतिक्रमण आधी हटवले जाणार**

शहरातील सर्व नाल्यांवर तसेच समोर उभारलेली शेड व दुकाने पहिल्या टप्प्यात हटवली जातील, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

**मिरवणूक मार्गावरील अतिक्रमण हटणार का?**

सोनू चौक ते सराफा बाजार रस्त्यावर सतत वाहतूक कोंडी निर्माण होते. याच मार्गावर गणेश आणि नवदुर्गा विसर्जन मिरवणुका निघतात. अडथळ्यामुळे मिरवणुकीला अडचण निर्माण होते. या मार्गावर पक्की अतिक्रमणे असून, ओटे आणि टिनशेड उभारले गेले आहेत. ती हटवली गेल्यास मिरवणूक मार्ग मोकळा होण्यास मदत होईल.

**प्रशासनाचा इशारा – अतिक्रमण स्वखुशीने हटवा**

नगरपालिकेने ऑटोरिक्षा द्वारे अतिक्रमण धारकांना सूचना दिल्या आहेत. अतिक्रमण धारकांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढावीत अन्यथा प्रशासन कारवाई करेल, असा इशारा मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे यांनी दिला आहे.

## अनु. जाती जमाती आयोगाच्या उपाध्यक्षांनी घेतला आढावा

**अकोला :** अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य धर्मपाल मेश्राम यांनी आज जिल्हा परिषदेत विविध योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. अनुसूचित जाती, जमातीसाठीच्या कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी आवश्यक आहे. योजनांचे उद्दिष्ट लक्षात विभागांनी त्यानुरूप काम करणे आवश्यक आहे, असे निर्देश श्री. मेश्राम यांनी यावेळी दिले. आयोगाचे उपाध्यक्ष श्री. मेश्राम यांनी प्रथम बैठकीद्वारे सहाय्यक आयुक्त समाजकल्याण व जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडून योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

---

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२४६/२०२५ — प्रोसेस नं.११३८३/२०२५
चौ.ता. २५/०८/२०२५ — दिनांक : १६/०७/२०२५

**अर्जदार :** १. प्रतिभा प्रशांत मानकर २. भूषण प्रशांत मानकर दोघेही रा. प्लॉट नं. १७४ बी, उन्नती नगर, कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रशांत दादाराव मानकर
**पत्ता :-** रा. प्लॉट नं. १७४ बी, उन्नती नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रशांत दादाराव मानकर यांचे दि. १४/०२/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २५/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

### चौकशीची जाहिर नोटिस

जा.क्र. १८७८/२०२५ दि. ०८/०७/२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.

अर्ज क्रमांक :- ३५९/२०२५ कलम २२
नेमता तारिख - १४/०८/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक:- सेठ बन्सीधर दहीगांवकर हायस्कुल एज्युकेशन सोसायटी, तेल्हारा. जि. अकोला नोदणी क्रमांक. एफ. १२० - बाबत अर्जदार विठठलरावरमेशराव खारोडे. रा. जुने शहर. तेल्हारा. सर्व संबंधित लोकांसया जाहिर नोटिसीनेक ळिवण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.

१) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
अ) जंगम मिळकत (वर्णन) :- काहिनाहि
आ) स्थावर मिळकत (वर्णन):- मौजे सात्काबाद ता. तेल्हारा. जि. अकोला. एफ. एस. नं. ०६ अ, मालमत्ता क्र. ६३. एकुण प्लॉट १५३००.० चौ. मीटर यावर ८२.८६ चौ.मीटर व्यायाम शाळेचे बांधकाम त्याची किंमत : - ११,९०,६५०.०० / - ( अकरा लाख नव्वद हजार सहाशे पन्नास रूपये फक्त) सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठ विणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त अकोला यांचे शिक्क्यानीशी आज दिनांक ०८.०७.२०२५ रोजी दिली.

१) वर्तमान पत्रा करिता २) न्यासाचे प्रवेश व्दार
३) न्यासाची मालमत्ता ४) नगरपालिका कार्यालय
५) कार्यालयीन नोटि सबोर्ड
शामुना-वाय३०६-प्रधआसान्यानोकाअ-७-२०११-५,००० प्रती-पीए ४

शिक्का — अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

---

### चौकशीची जाहिर नोटिस

जा.क्र. १८७२/२०२५ दि. ०८/०७/२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.

अर्ज क्रमांक :- ३५८/२०२५ कलम २२
नेमता तारिख - १४/०८/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक:- सेठ बन्सीधर दहीगांवकर हायस्कुल एज्युकेशन सोसायटी, तेल्हारा. जि. अकोला नोदणी क्रमांक. एफ. १२० - बाबत अर्जदार विठठलरावरमेशराव खारोडे. रा. जुने शहर. तेल्हारा. सर्व संबंधित लोकांसया जाहिर नोटिसीनेक ळिवण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.

१) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
अ) जंगम मिळकत (वर्णन) :- काहिनाहि
आ) स्थावर मिळकत (वर्णन):- मौजे सात्काबाद ता. तेल्हारा. जि. अकोला. एफ. एस. न. ०६ अ, मालमत्ता क्र. ६३. एकुण प्लॉट १५३००.० चौ. मीटर यावर शैक्षणिक इमारती साठी तळ मजला ५८४.४६ चौ.मीटर व पहिला मजला २९९.६६ चौ.मीटर शाळेचे बांधकाम त्याची किंमत : - १,३५,६१८८६.०० / - ( एक करोड पस्तीस लाख एकसष्ट हजार आठ शेषह्यांशी रूपये फक्त ) सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठ विणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त अकोला यांचे शिक्क्यानीशी आज दिनांक ०८.०७.२०२५ रोजी दिली.

१) वर्तमान पत्रा करिता २) न्यासाचे प्रवेश व्दार
३) न्यासाची मालमत्ता ४) नगरपालिका कार्यालय
५) कार्यालयीन नोटि सबोर्ड
शामुना-वाय३०६-प्रधआसान्यानोकाअ-७-२०११-५,००० प्रती-पीए ४

शिक्का — अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

---

### चौकशीची जाहिर नोटिस

जा.क्र. १८८३/२०२५ दि. ०८/०७/२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.

अर्ज क्रमांक :- ३६०/२०२५ कलम २२
नेमता तारिख - १४/०८/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक:- सेठ बन्सीधर दहीगांवकर हायस्कुल एज्युकेशन सोसायटी, तेल्हारा. जि. अकोला नोदणी क्रमांक. एफ. १२० - बाबत अर्जदार विठठलरावरमेशराव खारोडे. रा. जुने शहर. तेल्हारा. सर्व संबंधित लोकांसया जाहिर नोटिसीनेक ळिवण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.

१) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
अ) जंगम मिळकत (वर्णन) :- काहिनाहि
आ) स्थावर मिळकत (वर्णन):- मौजे सात्काबाद ता. तेल्हारा. जि. अकोला. एफ. एस. न. ०६ अ, मालमत्ता क्र. ६३. एकुण प्लॉट १५३००.० चौ. मीटर यावर [illegible] १ ला [illegible] १०६० [illegible] - १,[illegible] त्रयान [illegible] सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठ विणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त अकोला यांचे शिक्क्यानीशी आज दिनांक ०८.०७.२०२५ रोजी दिली.

१) वर्तमान पत्रा करिता २) न्यासाचे प्रवेश व्दार
३) न्यासाची मालमत्ता ४) नगरपालिका कार्यालय
५) कार्यालयीन नोटि सबोर्ड
शामुना-वाय३०६-प्रधआसान्यानोकाअ-७-२०११-५,००० प्रती-पीए ४

शिक्का — अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

---

### Change In Name

I have change my name From
**RAJESH CHANDRA TRIPAHI**
(As per old passport Name/Wrong Name)
To
**RAJESH CHANDRA TRIPATHI**
(New Name as per on Two Photo ID) Passport No. B 8102731.
Address – SAI EAGLE APARTMENT QTR NO S3, MADHAV NAGAR, AKOLA PIN : 444004, MAHARASHTRA, INDIA

---

### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस द्वारे सुचित करण्यात येते की आमचे पक्षकार मे. सुमीत इन्डस्ट्रीज तर्फे पार्टनर स्वप्नील शर्मा यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे शिवणी ता.जि.अकोला येथील एमआयडीसी प्लॉट क्र.यु-२१/१/१ बाबतचे फायनल लिज डिड दि. ३०.०६.२०२१ दस्त क्र. ३९९१ हे हरवले/अनावधानाने गहाळ झाले आहे व शोधून सापडलेले नाही त्याबाबत रितसर पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट दिलेला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्तेबाबत अथवा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, गहाण अगर बोजा असल्यास किंवा काही हितसंबंध असल्यास खालील पत्यावर कागदपत्रासहीत आजपासुन सात ७ दिवसाचे आत भेटावे अन्यथा कोणाचा कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**S.A.Deshpande**
**Advocate**
Opp. Civil Court, Station Road,
Akola Tq. Dist. Akola
Mob. 9823091377

---

### चौकशीची जाहिर नोटिस

जा.क्र. ३४८/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला
मुर्तिजापूर रोड, डी.एस.पी. बंगलाच्या जवळ, अकोला.

एस. आर. एन. क्रमांक :AKL/०२९९३/१८/२३
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक :१२/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री मारुती व महादेव मंदिर न्यास कैलास टेकडी अकोला बाबत
न्यासाचा पत्ता :- कैलास टेकडी अकोला,
अर्जदार - सुनिल रतनलाल शर्मा,
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळिवण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अकोला, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Fees | 500.00 |

अ) जंगम मिळकत : रोख रु. 500 मात्र

स्थावर मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | शहर किंवा गांव गांव | सी एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्रं. | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरुप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Akola | Sheet no.43 Plot no.9/2 | Total area 2500 sq.ft. (232.03 sq. mts.) on which co | Nil | B | 1500000/- |

ब) स्थावर मिळकत : रोख रु. 1500000 मात्र (अक्षरी रुपये पंधरा लाख मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १३.२.२०२४ रोजी दिली.

प्रत:- १. उपरोल्लेखीत मालमत्तेवर डकविणेसाठी.
२. न्यासाचे कार्यालयावर डकविणेसाठी
३. स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी.
४. या कार्यालयाच्या नोटीस बोर्ड वर डकविणेसाठी.
५. (इतर असल्यास उल्लेख करावा.)
टिप :आवश्यक ✓ तेथे खुण करावी

शिक्का — अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

---

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२७९/२०२५ — प्रोसेस नं.११५३८/२०२५
चौ.ता. २६/०८/२०२५ — दिनांक : १७/०७/२०२५

**अर्जदार :** १. सुरेश गणेशराव देवीकार रा. केडिया प्लॉट, आईस फॅक्ट्रीजवळ, अकोला. ता. जि. अकोला २. सुभाषजी गणेशराव देवीकार रा. सातारा परीसर, हाय कोर्ट कॉलनीजवळ, फ्लॅट नं. २१, तिरूपती कॉम्प्लेक्स, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद ३. सुनंदा मनोहर राजुरकर रा. मनोहर राजुरकर, प्लॉट क्र. १२. ब्लॉक क २. प्रिया दर्शनी परीसर, सुफेला भिलाई, दुर्गे, छततीसगढ ४. लता प्रभाकरराव पुनसकर रा. चंदन शेष महाराज मंदिराजवळ, शिवाजी चौक, राहटगांव, अमरावती. ५. पदमा किशोरराव फुलकर रा. गजानन महाराज मंदिराजवळ, शिव मंदिर, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गणेशराव मारोती देवीकार
**पत्ता :-** रा.केडिया प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गणेशराव मारोती देवीकार यांचे दि. १०/०८/२०१८ रोजी केडिया प्लॉट, आईस फॅक्ट्रीजवळ, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२५२/२०२५ — प्रोसेस नं.११५४४/२०२५
चौ.ता. २६/०८/२०२५ — दिनांक : १७/०७/२०२५

**अर्जदार :** १. अमित यशवंत महाजन रा. अमित बिल्डिंग, गड्डाम घराजवळ, गड्डाम प्लॉट, अकोला. ता. जि अकोला २. रोहित यशवंत महाजन रा. फ्लॅट नं. २२, बिल्डिंग ए, आनंद पार्क सोसायटी, एसएन-४९/१/२ए, आनंद पार्क जवळ, शेवटचा बसस्टॉप, गणेश नगर, वाडेगांव शेरी, पुणे सिटी, ३. अंजली दिपक जायकर रा. एच.नं. १०-१-३३२, श्रीक्रिपा निवास, जयप्रकार नगर, दुर्गा माता मंदिराजवळ, आसरजन, वाडेपुरी, नांदेड.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. यशवंत शामराव महाजन २. सुलभा यशवंत महाजन
**पत्ता :-** रा. दोघेही रा. अमित बिल्डिंग, गड्डाम घराजवळ, गड्डाम प्लॉट, अकोला. ता. जि अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत यशवंत शामराव महाजन यांचे दि. १५/११/२०२४ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत सुलभा यशवंत महाजन यांचे दि. २१/०२/२०२३ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२३५/२०२५ — प्रोसेस नं.१०५२१/२०२५
चौ.ता. ०५/०८/२०२५ — दिनांक : ०५/०७/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती श्रद्धा संजय कौसल २. शेखर संजय कौसल ३. स्नेहा संजय कौसल ४. श्रीमती सुनिता श्रीराम कौसल सर्व रा. मुरलीधर टावर, राउतवाडी रोड, बारा ज्योर्तिलिंग मंदिराजवळ, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : संजय श्रीराम कौसल
**पत्ता :-** रा. मुरलीधर टावर, राउतवाडी रोड, बारा ज्योर्तिलिंग मंदिराजवळ, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संजय श्रीराम कौसल यांचे दि. ०२/०६/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराचे क्र.१ चे पति तर अर्जदार क्र.२ चे वडिल नामे **पांडूरंग कृष्णराव चौधरी** यांचा **दिनांक ०५/०४/२०२५ रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मृत्यू झाला. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १५/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय क.स्तर, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३५२/२०२५
**केसरबाई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२८.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
१. केशरबाई देविदासराव गादे, वय ८१ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.कुंड सर्जापूर, हातुर्णा, अमरावती, ता.जि.अमरावती
२. सुनिता सुभाष बांबळ, वय ६० वर्षे. व्यवसाय - घरकाम रा.मामर्डे लेआऊट, शंकर नगर, १६, जयरंभा नगर, उकली, अमरावती
३. रणजित देविदास गादे, वय ५० वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.कुंड सर्जापूर, हातुर्णा, अमरावती, ता.जि.अमरावती
४. किरण संजय टिंगसे, वय ४४ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.कमोद नगर, श्री.जी.हाईट फ्लॅट नं.५, नाशिक, ता.जि.नाशिक

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **देविदासराव बळीराम गादे** हे दिनांक 16.11.2010 रोजी **Amravati** येथे मयत झाले. अर्जदार **केशरबाई देविदासराव गादे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **केशरबाई देविदासराव गादे व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १५.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४५९/२०२५ ने.ता.२५/०८/२०२५

**अर्जदार -**
१. **श्रीमती सुगन शिवराम जवंजाळ,** वय ७७ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री सतिश शिवराम जवंजाळ,** वय ४० वर्षे, धंदा - मजुरी
दोघेही रा.पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सविता नंदु पळसपगार,** वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम रा.फुबगांव, पो.कुरळपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन** २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पति तर अर्जदार नं.२ व ३ चे वडिल नामे **शिवराम उंदराजी जवंजाळ हे दिनांक १८/१२/२०२४ रोजी पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १५.०७.२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## तहसिलदार, तिवसा यांचे न्यायालय

**रा.मा.क्र./एम.आर.सी.-८१/ / मोझरी /२०२४-२०२५**

**क्रमांकः प्रस्तु-१/स.म.अ./जन्म-मृत्यू नोंदणी/कावि-५१९/२०२५** **दिनांक ०८/०७/२०२५**

**जाहीरनामा**

या व्दारे सर्वत्र नागरिकांना सुचित करण्यात येते की, **अर्जदार मुस्ताक अकबर बेग, रा.मोझरी,** ता.तिवसा, जि.अमरावती यांनी महाराष्ट्र जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) व जन्म व मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ भारत राजपत्र दिनांक ११/०८/२०२३, व मा.जिल्हाधिकारी अमरावती यांचे आदेश क्र.ः-अका/एमएजी/डे-२७/जन्म व मृत्यू नोंदणी (सुधा.) अधि/आदेश/कावि-८१९/२०२३, दिनांक २३/१०/२०२३ व सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र. ः जमुनो २५२५/ई.ऑ.(९९११८१)/ प्र.क्र.२२/कु.क.,दिनांक १२ मार्च २०२५ नुसार अर्जदार **मुस्ताक अकबर बेग, रा.मोझरी,** ता.तिवसा, जि.अमरावती यांनी त्यांचे **आजोबा नामे ः इब्राहीम बेग इस्माईल बेग यांचा दिनांक २५/०६/१९८२** रोजी **मोझरी** येथे **मृत्यू** झाला असल्यामुळे त्यांच्या **मृत्यूची नोंद** ग्राम पंचायत कार्यालय, **मोझरी** येथे होण्याकरिता आदेश मिळावा म्हणून अर्ज दाखल केला.

त्याअर्थी, ज्या कोणाला सदर प्रकरणी आक्षेप वा हरकत घ्यावयाची असेल त्यांनी जाहिरनामा प्रसिध्दी झाल्यापासून **१५ दिवसांचे आत** आपला आक्षेप अर्ज लेखी आवश्यक पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अर्ज स्विकारण्यात येणार नाही तथा त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

शिक्का

**सही /-**
**(मयुर कळसे )**
**तहसिलदार, तिवसा**

---

## तहसिलदार, तिवसा यांचे न्यायालय

**रा.मा.क्र./एम.आर.सी.-८१/ / मोझरी /२०२४-२०२५**

**क्रमांकः प्रस्तु-१/स.म.अ./जन्म-मृत्यू नोंदणी/कावि-५१७/२०२५** **दिनांक ०८/०७/२०२५**

**जाहीरनामा**

या व्दारे सर्वत्र नागरिकांना सुचित करण्यात येते की, **अर्जदार रशीद बेग बाबा बेग, रा.मोझरी,** ता.तिवसा, जि.अमरावती यांनी महाराष्ट्र जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) व जन्म व मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ भारत राजपत्र दिनांक ११/०८/२०२३, व मा.जिल्हाधिकारी अमरावती यांचे आदेश क्र.ः-अका/एमएजी/डे-२७/जन्म व मृत्यू नोंदणी (सुधा.) अधि/आदेश/कावि-८१९/२०२३, दिनांक २३/१०/२०२३ व सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र. ः जमुनो २५२५/ई.ऑ.(९९११८१)/ प्र.क्र.२२/कु.क.,दिनांक १२ मार्च २०२५ नुसार अर्जदार **रशीद बेग बाबा बेग,रा.मोझरी,** ता.तिवसा, जि.अमरावती यांनी त्यांचे **आजोबा नामे ः इस्माईल बेग रहेमान बेग यांचा दिनांक ०७/०३/१९६०** रोजी **मोझरी** येथे **मृत्यू** झाला असल्यामुळे त्यांच्या **मृत्यूची नोंद** ग्राम पंचायत कार्यालय, **मोझरी** येथे होण्याकरिता आदेश मिळावा म्हणून अर्ज दाखल केला.

त्याअर्थी, ज्या कोणाला सदर प्रकरणी आक्षेप वा हरकत घ्यावयाची असेल त्यांनी जाहिरनामा प्रसिध्दी झाल्यापासून **१५ दिवसांचे आत** आपला आक्षेप अर्ज लेखी आवश्यक पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अर्ज स्विकारण्यात येणार नाही तथा त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

शिक्का

**सही /-**
**(मयुर कळसे )**
**तहसिलदार, तिवसा**

---

प्रो.क्र. /२०२५

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक २७२/२०२५ ने.ता.२५.०८.२०२५

**अर्जदार ः**१. आबीद खान इस्माईल खान, वय ६२ वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.खोलापूर, ता.भातकुली, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **ईस्माईल खॉं करीम खॉं** हे दि.**११.०४.१९९०** रोजी मयत झाले. अर्जदार **आबीद खान इस्माईल खान**, वय ६२ वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा.खोलापूर, ता.भातकुली, जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**०३.०७.२०२५** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **ईस्माईल खॉं करीम खॉं** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **ईस्माईल खॉं करीम खॉं** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०७.०७.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

## जाहीर नोटीस

प्रो.क्र.१४०६८/२०२५
दिनांक १६ जुलै २०२५

Appendix E, No.7
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Shri R.T.Ghogle
10th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**NOTICE TO SHOW CAUSE WHY EXECUTION SHOULD NOT ISSUE (0.21, R.16)**

Spl.Dkst./92/2023
**Surendra Sudhakarrao Taware - Vs- Baburao Balaji Khandekar**
NEXT DATE 22.07.2025

To,
Baburao Balaji Khandekar
R/o. C/o. Sandeep Tayade, Kumbhallal Dulari Wada, Sambhodhit Nagar, Rahatgaon
Tq.Dist.Amravati (Maharashtra)

Whereas **Surendra Sudhakarrao Taware** has made application to this Court for execution of decree in Suit No., on the allegation that the said decree has been transferred to him by assignment or without assignment, this is to give you notice that y ou are to appear before this Court **10th Jt.Civil Judge, Sr.Dn., Amravati** on the 22.07.2025, to show cause why execution should not be granted.

Given under my hand and the seal of the Court, this 16.07.2025.

शिक्का

**10th Jt.Civil Judge,**
**Sr.Dn., Amravati**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**श्री.कालदाते साहेब, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७२६/२०२५
**मनोहरराव आसोले व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०७.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Manoharrao Shripatrao Asole, Age 80 Yrs. Occu.: Retired
2. Sau.Jaya Pradiprao Dehankar, Age 50 Yrs. Occu.: Household R/o. Near Hanuman Mandir, Subhash Colony, Dastur Nagar Rd.Amravati
3. Sau.Srita Prashantrao Ambadekar, Age 47 Yrs. Occu.: Household R/o. 6, Panchawati Apartment, Sector-5, Near Sahakar Bazar, Airoli, Navi Mumbai, Dist. Thanek-400708

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Pramila Mohanrao Asole हे दिनांक 20.12.2024 रोजी Amravati येथे मयत झाले. अर्जदार Manoharrao Shripatrao Asole & Oths. यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Manoharrao Shripatrao Asole & Oths. वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४.०५.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३१४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# मेडिकल कॉलेजसाठी निवडलेली अदिलाबादची जागा बदला

## आ. सुलभा खोडके यांनी विधानसभेत लावून धरला मुद्दा



**अमरावती/का.प्र.**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी अदिलाबाद येथील जागा निश्चित केली आहे. मात्र ही जागा शहरापासून १२ ते १३ किमी दूर आहे. त्यामुळे तेथे तयार होणा-या रुग्णालय व महाविद्यालयात जाणे रुग्णांसाठी त्रासदायक होणार आहे. या ठिकाणी मेळघाटसह इतर ग्रामीण भाग व स्थानिक रुग्णांना वैद्यकीय सुविधांचा लाभ मिळावा, हाच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा उद्देश आहे. मात्र त्या ठिकाणी इमारत उभी झाल्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची उपयुक्तता गरजू नागरिकांसाठी होणार नाही. त्यामुळे जागा निश्चितीसंदर्भात समितीने घेतलेला निर्णय बदलावा. तसेच शहरालगत नागपूर हायवेवरील कृषी विद्यापीठाच्या जागेचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्याचा मुद्दा आ. सुलभा खोडके यांनी सभागृहात उपस्थित केला.

अमरावती येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय दोन वर्षापासून सुरु झाले असून, जिल्ह्यातील गोर-गरीब व सर्वसामान्य रुग्णांना आरोग्य सुविधांचा लाभ मिळणे, हीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची खरी उपलब्धता आहे. या महाविद्यालयात १०० विद्यार्थी क्षमतेचे महाविद्यालय व ४३० बेडचे रुग्णालय सुरु करण्याची भूमिका घेत संबधित जिल्ह्यातील गरीब, गरजूंना चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात, त्यांना इतरत्र उपचारासाठी जावे लागू नये, असा शासनाचा उद्देश आहे. मात्र महाविद्यालय स्थापनेसंदर्भात समितीने शहरात येऊन अदिलाबाद येथील जागा निवडली. परंतु ही जागा अमरावती शहरापासून १२ ते १३ किमी दूर असल्याने गैरसोईची ठरणार आहे. त्यामुळे जागेसंदर्भात समितीचा निर्णय बदलण्याची मागणी आ. सुलभा खोडके यांनी केली आहे.

**कृषी विद्यापीठाची जागा ग्रामीण भागासह सर्वच रुग्णांसाठी सोईची**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे शहराच्या मध्यभागी व जिल्ह्याच्या सर्व भागातून येणाा-या रुग्णांना सोयीचे व्हावे म्हणून अमरावती बायपासा मार्गावरील कृषी विद्यापीठाची ७,३५,३५१ चौरस मीटर म्हणजेच जवळपास ७५ हेक्टर जागेपैकी २५ एकर जागा शासकीय महाविद्यालया करिता घेण्यात यावी, असा शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी व संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनी २०२२ मध्ये डॉ. संजय पराते यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निर्देश दिलेले होते. ही जागा शहरातच जिल्ह्यातील १२ तालुक्यातील कोणत्याही रुग्णांना सहज पोहोचण्यासाठी सोईची आहे. त्यामुळे या जागेचा प्रस्ताव मान्य करावा, अशी मागणी लावून धरली आहे.

# हिपॅटायटिस डे जनजागृती वॉकॅथान २७ जुलैला

## नोंदणी करण्याचे आवाहन

Dr. HEDGEWAR HOSPITAL
WORLD HEPATITIS DAY 2025
WALKATHON

**अमरावती/का.प्र.**

हिपॅटायटिस विषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने , जागतिक हिपॅटायटिस दिवसानिमित्त २७ जुलै रोजी, डॉ. हेडगेवार हॉस्पिटल व डॉ. अंजली कविमंडन मेमोरियल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने वॉकॅथॉनचे आयोजन करण्यात आले आहे.डॉ. हेडगेवार हॉस्पिटलच्या भाराणी मेमोरियल क्रिटिकल केयर युनिट, नंदा मार्केट येथून या वॉकॅथॉनची सुरुवात सकाळी ७.३० वाजता होणार आहे तर समारोप कविमंडन हॉस्पिटल, दस्तूर नगरमध्ये होईल.

हिपॅटायटिसची कारणे, गांभीर्य व प्रतिबंध या महत्वाच्या विषयांवर जनजागृती व्हावी, या उद्देशाने हा लोकोपयोगी कार्यक्रम शहरातील प्रसिद्ध अशा दोन हॉस्पिटल्सकडून एकत्रिपणे आयोजित करण्यात आला आहे. हिपॅटायटीस होण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे व्हायरल इन्फेक्शन. पण अनेक विविध कारणांमुळे हिपॅटायटीस होतो. हिपॅटायटीस म्हणजे यकृताला सूज येणे . उदा .विषाणू, अल्कोहोल, औषधे, किंवा काही विशिष्ट आजार. हिपॅटायटीसचे मुख्य प्रकार ए, बी, सी, डी आणि ई आहेत. हिपॅटायटीसचे निदान आणि उपचार लवकरात लवकर करणे महत्वाचे आहे, कारण यामुळे गंभीर गुंतागुंत होऊ शकते. यामुळे या आजाराकडे गांभीर्यानं लक्ष देणे अगत्याचे आहे.हिपॅटायटिस डे निमित्त जनजागृतीसाठी वॉकेथॉन २०२५ रॅलीचे आयोजक डॉ. अमित कविमंडन, डॉ.मानसी कविमंडन , डॉ.अनिल कविमंडन , जनकल्याण सेवा संस्थेचे अध्यक्ष अजय श्रॉफ, सचिव गोविंद जोग, डॉ.हेडगेवार हॉस्पिटलचे प्रकल्प संचालक डॉ.यशोधन बोधनकर परिश्रम घेत आहेत . हिपॅटायटिस डे जनजागृती रॅलीचे हे दुसरे वर्ष आहे. गत वर्षी या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या वर्षीदेखील मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी होण्याचे आणि अधिक माहितीसाठी विजय यादव-९९७०८८१७२१,विकास लिखीतकर-०८७९३२ ६७०९५ किंवा जय यांच्याशी ८०८०६४५४४८ या क्रमांकावर अथवा https://forms.gle/z4a52EmafZ5wEvZ18 या लिंकवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नांदगाव केंद्रावरील ज्वारी खरेदीचे चुकारे रखडले

## शेतकरी आर्थिक अडचणीत





**हमीभावाने खरेदी केलेल्या ज्वारीची प्रोसेस पूर्ण करून शासनाकडे पाठविण्यात आली परंतु अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात मध्ये खरेदी केलेल्या ज्वारीची रक्कम शासनाकडून अद्यापही जमा करण्यात आली नाही.सरासरी एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होत आहे.**

परीक्षित ढेकेकर पाटील,
अध्यक्ष खरेदी विक्री संस्था, नांदगाव खंडेश्वर

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

खरेदी विक्री संस्थेमार्फत राज्य शासनाकडून नांदगाव खंडेश्वर केंद्रावर हमीभावाने शेतकऱ्याकडून खरेदी करण्यात आलेल्या ज्वारीचे चुकारे रखडले असून एकूण १४२ शेतकऱ्यांचे २ कोटी ४१ लक्ष २६५० रुपयाचे रक्कम रखडली असल्याची माहिती खरेदी विक्री संस्थेकडून मिळाली.

अंदाजे एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनही ज्वारी विक्रीची रक्कम शासना कडून मिळाली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होत आहे. तालुक्यात यावर्षी उन्हाळ्यात ज्वारी पिकाचा पेरा असून शासनाचा हमीभाव ३३७१ प्रतिक्विंटल असल्यामुळे शेतकऱ्यांनी योजनेमध्ये ज्वारी विक्री करण्यास प्रतिसाद दिला. नांदगाव खरेदी विक्री संस्थेकडे ऑनलाइन नोंदणी झालेल्या १४२ शेतकऱ्यांची ७१५० क्विंटल ज्वारी या केंद्रावर हमीभाव अंतर्गत खरेदी करण्यात आली. सरासरी एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन सुद्धा अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यावर ज्वारीची रक्कम जमा झाली नाही.त्यामुळे शेतकऱ्यांचा खिसा अद्यापही रिकामाच आहे. सध्या खरिपाचा हंगाम सुरू असल्याने शेतकऱ्याला शेती करिता पैशाची नितांत गरज आहे.तेव्हा खरेदी केलेल्या ज्वारीचे चुकारे तात्काळ करण्यात यावे अशी शेतकऱ्याकडून मागणी होत आहे.या केंद्रावर अद्यापही नोंदणी केलेले ५३ शेतकरी ज्वारी मोजणीच्या प्रतीक्षेत आहे.

# अमरावती विभागात आठवडाभरात आटोपणार खरीपाच्या पेरण्या

## अद्याप ९२ टक्के पेरण्या पूर्ण

**अमरावती/का.प्र.**

अमरावती विभागात पावसाने काहीशी उघडीप दिली आहे. त्यामुळे खरिपातील पेरण्यांना वेग आला आहे. आता पेरण्या अंतिम टप्प्यात असून एकूण खरिपातील सरासरी लागवडीखालील ३१.६० लाख हेक्टरपैकी २९.०१ लाख हेक्टर म्हणजे ९१.०८ टक्के क्षेत्रात पेरण्या आटोपल्या आहेत. येत्या आठवडाभरात पेरण्या उरकण्याची शक्यता असल्याचे कृषी विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

अमरावती विभागात गेल्या आठवड्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली आहे. याआधी जवळपास पंधरा दिवस चांगला पाऊस झाला. विभागात जून महिन्यात १५९ मिमी म्हणजे १०७ टक्के पाऊस झाला. जुलैमध्ये १७ तारखेपर्यंत ११७.५ मिमी म्हणजे ८९.४ टक्के पाऊस झाला. गेल्या १ जूनपासून आतापर्यंत सरासरी २७९ मिमीच्या तुलनेत २७६ मिमी म्हणजे ९९ टक्के पर्जन्यमानाची नोंद झाली आहे.

विभागातील बुलढाणा जिल्ह्यात ७.०३ लाख हेक्टर (९५.६ टक्के), अकोला ३.८४ लाख हेक्टर (८९ टक्के), वाशीम ३.५३ लाख हेक्टर (८८.४ टक्के), अमरावती ६.५२ लाख हेक्टर (९५.५ टक्के) आणि यवतमाळ जिल्ह्यात ८.०७ लाख हेक्टर (८८.८ टक्के) क्षेत्रात खरिपाची पेरणी आटोपली आहे. विभागात दरवर्षीप्रमाणे यंदाही सोयाबीन पिकाचे क्षेत्र सर्वाधिक आहे. सोयाबीनच्या लागवडीखालील सरासरी क्षेत्र १४.६३ लाख हेक्टर असून आतापर्यंत १३.८५ लाख हेक्टर म्हणजे ९४.६९ लाख हेक्टरमध्ये सोयाबीनचा पेरा झाला आहे. त्या तुलनेत यंदा कपाशीचे क्षेत्र कमी झाले आहे. विभागात कपाशीचे सरासरी लागवडीखालील क्षेत्र हे १०.९२ लाख हेक्टर आहे. आतापर्यंत ९.६७ लाख हेक्टर म्हणजे ८८.५९ टक्के क्षेत्रात कापूस पिकाची लागवड झाली आहे. यंदा पावसाच्या अनियमिततेने उडीद आणि मूग या पिकाच्या लागवडीवर विपरीत परिणाम झाला आहे. अमरावती विभागात मुगाचे सरासरी लागवडीचे क्षेत्र ३५ हजार ६२ हेक्टर इतके आहे. आतापर्यंत केवळ ८ हजार ८६१ म्हणजे २५.२७ टक्केच क्षेत्र मुगाच्या लागवडीखाली आले आहे. उडदाचे सरासरी क्षेत्र ३१ हजार ३२७ हेक्टर आहे, त्यापैकी केवळ ८ हजार ८३३ हेक्टर (२८.२ टक्के) उडदाच्या लागवडीखाली आले आहे. मक्याचे सरासरी लागवडीचे क्षेत्र ४५ हजार ४६१ हेक्टर इतके असताना आतापर्यंत ९५ हजार ७९२ हेक्टर म्हणजे तब्बल २१० टक्के क्षेत्रात मक्याची लागवड करण्यात आली आहे.

# ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूलमध्ये दंत तपासणी शिबीर

**अमरावती-**ऑर्किड सिटी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मौखिक स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच सुरुवातीच्या टप्प्यावर दंतविकारांची ओळख करणे असा होता.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. श्रुतिका मंकार (सहाय्यक प्राध्यापक, पेडियाट्रिक डेंटिस्ट), डॉ. शिवानी कांतेले (मसूळ व प्रत्यारोपण तज्ज्ञ) होत्या. त्यांच्या बरोबर समीर गवळी, नेहा शेवणे आदी डॉक्टरांच्या टीमाने विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी करून आवश्यक सल्ला दिला.संचालन समीक्षा बिजवे यांनी प्रभावीपणे केले. त्यांच्या स्पष्ट आणि सहज संवादामुळे विद्यार्थ्यांना विषयाशी जोडून ठेवण्यात मदत झाली.उपक्रमामध्ये संगीता पवार यांचे विशेष योगदान राहिले. त्यांनी शिबिराच्या आयोजन, समन्वय व अंमलबजावणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.कार्यक्रमाचे शाळेच्या प्राचार्य, शिक्षकवर्ग तसेच पालकांनी मनापासून कौतुक केले. शाळा व्यवस्थापनाचा विश्वास आहे की शैक्षणिक विकासासोबतच विद्यार्थ्यांचे आरोग्यदृष्ट्या मार्गदर्शन करणेही अत्यंत गरजेचे आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.




# अतिक्रमण कारवाईत ६ ट्रक साहित्य जप्त

**अमरावती-**महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत झोन क्र. २ राजापेठ व पूर्व झोन क्र. ३ दस्तूरनगर परिसरात मोठी अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक आणि उपायुक्त (प्रशासन) डॉ. मेघना वासनकर यांच्या आदेशानुसार ही कारवाई अतिक्रमण विभागाद्वारे करण्यात आली.सदर कारवाई दरम्यान जुने रेल्वे स्टेशन समोरील मंगलम हॉटेलपासून खापर्डे बाग, बस स्टॅन्ड डेपो, पोलीस पेट्रोल पंप, मालटेकडी परिसरातील ज्यूस हातगाड्या, पाणीपुरवठा विभाग कार्यालय, जिल्हा परिषद कॉटर, कॉंग्रेस भवन समोर, रंगाळा ते राजेंद्र कॉलनी रोड तसेच रुक्मिणीनगर रोड ते सायन्सस्कोर मैदान या परिसरातील सर्व अतिक्रमण हटवण्यात आले. एकूण ६ मोठे ट्रक भरून साहित्य जप्त करण्यात आले आहे.ही कारवाई अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, योगेश कोल्हे, निरीक्षक अन्सार अहमद, शहेबान, पोलीस अधिकारी श्री. हिरुडकर तसेच अतिक्रमण कर्मचारी यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडली.



# अमरावतीत एकवटणार तीन राज्यातील तेली समाज उद्योजक

## उद्योजक मेळावा व समाजातील गुणवंतांचा सत्कार

**अमरावती/का.प्र.**

सामाजिक क्षेत्रात अग्रेसर कैलास छाया चॅरिटेबल ट्रस्ट अमरावतीच्या वतीने येत्या रविवारी २० जुलै रोजी अंबानगरी अमरावतीत राज्यस्तरीय तेली समाज उद्योजक मेळावा व समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या उद्योजक मेळाव्याच्या निमित्ताने महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गोवा या तीन राज्यातील उद्योजक एकवटणार आहे.

कैलास छाया चॅरिटेबल ट्रस्ट, यश असोसिएट्स, आसरा रेस्टॉरंट व सावली महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजित या राज्यस्तरीय मेळाव्याचे उद्घाटन रविवार २० रोजी सकाळी १० वाजता तेली समाजाचे नेते व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार आहे. कैलास छाया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व तेली समाजातील प्रसिद्ध उद्योजक कैलास गिरोळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मेळव्यास महाराष्ट्र प्रांतिक तेली समाजाचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार रामदास तडस, माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून तेली समाजातील विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे.







राज्यातील तसेच बाहेरील राज्यातील तेली समाजातील उद्योजक एकाच व्यासपीठावर येऊन समाजाला दिशा मिळावी तसेच त्यांच्यात चर्चा होऊन विचारांचे आदान प्रदान व्हावे आणि विविध उद्योगांना वाव मिळावा सोबतच तेली समाजातील गुणवंतांचा यथायोग्य सन्मान होऊन येणाऱ्या पिढी समोर आदर्श निर्माण व्हावा या उदात्त हेतूने या राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. अंबानगरी अमरावतीत प्रथमच आयोजित या अभिनव मेळाव्यास समस्त तेली समाज बांधवांनी व उद्योजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक मयूर जीरापुरे, छाया कैलास गिरोळकर व तेली समाज हितकारक मंडळांने केले आहे.

सुशील आगरकर यांचे व्याख्यान

उद्योजक मेळाव्याच्या निमित्ताने मुंबई येथील चेज कंपनीचे संचालक व मोटिवेशनल स्पीकर सुशील आगरकर हे आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून मार्गदर्शन करणार आहे. स्थानिक बाजारातील रणनीती, संभाव्य ग्राहक, नेटवर्किंग, स्टार्टअप व्यवसायाला लागणारा निधी, जागतिक घडामोडींचा स्थानिक मार्केटवर होणारा परिणाम अशा विविध विषयांवर ते मार्गदर्शन करून उद्योजकांसोबत संवाद साधणार आहे.

### समाज भूषण गुणवंतांचा होणार सत्कार



इयत्ता दहावी व बारावीमध्ये गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्षेत्रात उत्तुंग यश प्राप्त करून नावलौकिक प्राप्त करून तेली समाजाचे भूषण ठरणाऱ्या गुणवंतांचा सत्कार या कार्यक्रमात करण्यात येणार असून आतापर्यंत २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या नावाची नोंदणी झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

### तेली समाजाला संघटित करण्याचा प्रयत्न : कैलास गिरोळकर



महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गोवा आणि छत्तीसगड आधी राज्यात तेली समाजाचे मोठ्या प्रमाणावर प्राबल्य असून ह्या समाजातील उद्योजकांना एकत्र करून व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांना संघटित करण्याच्या दृष्टिकोनातून अशा प्रकारचा अभिनव उपक्रम राज्यात प्रथमच आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यासाठी आतापर्यंत तीन राज्यातील १२०० उद्योजकांची नोंदणी झाली असल्याची माहिती कैलास गिरोळकर यांनी दिली.

### गळफास घेऊन युवकाची आत्महत्या

**करजगाव :** येथील एका २६ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता उघडकीस आली.प्रतीक किसान आखूड (२६) रा. इंदिरानगर, करजगाव असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदन करिता अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. प्रतिकने जरी दोरीच्या साह्याने छताच्या पंख्याला गळफास घेतला होता. आत्महत्येचे कारण स्पष्ट झाले नाही. या प्रकरणी शिरजगाव पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे.

# पोटे अभियांत्रिकीत अलुमनी टॉक

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावतीच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातर्फे आय.सी.आय. व आय.एस.एस.सी. स्टूडंट चॅप्टर च्या संयुक्त विद्यमाने अलुमनी टॉकचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात माजी विद्यार्थिनी श्वेता खांडेकर व ज्ञानेश्वरी हटवार यांचा सत्कार करण्यात आला. दोघींनीही विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेबाबत सखोल मार्गदर्शन केले.कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. मोहम्मद जुहेर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विभाग प्रमुख डॉ. सचिन सराफ, डॉ.अनुप चितकेश्वर व प्रा.अब्दुल रहमान यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी झाला.



# राष्ट्र सेविका समितीच्या अ.भा.कार्यकारिणी आणि प्रतिनिधींची बैठक

## ३८ प्रांतातील ४२५ प्रतिनिधी सहभागी



**अमरावती/का.प्र.**

राष्ट्र सेविका समितीच्या अखिल भारतीय कार्यकारिणी आणि प्रतिनिधींच्या अर्धवार्षिक बैठकीला आज १८ जुलै रोजी नागपूर येथील स्मृती मंदिरातील रेशीम बाग येथे मुख्य संचालिका श्रीमती शांता कुमारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सुरुवात झाली.समितीच्या या बैठकीत ३८ प्रांतातील ४२५ प्रतिनिधी सहभागी झाले आहे.

आज सकाळी उद्घाटन सत्रात, प्रमुख कार्यवाहिका सीता गायत्री अन्नदानम यांनी समितीच्या कार्याचा अहवाल सादर केला आणि प्रशिक्षण वर्गांचा आढावाही घेतला.समितीच्या शाखा, मीलन केंद्रे, शाखा असलेले जिल्हे आणि सेवाकार्यात वाढ झाली आहे. १७९९ ठिकाणी महिलां साठी सेवाकार्य सुरू झाले आहे. सेवाकार्यात संस्कार वर्ग, स्वावलंबन, आरोग्य आणि योग केंद्रे चालवली जातात. दुर्गम भागातील मुलींसाठी वसतिगृहे चालवली जात आहेत.



वर्ष २०२५ मध्ये, देशभरात विविध ठिकाणी २२४वर्ग आयोजित करण्यात आले ज्यामध्ये सुमारे १५,२७३ सेविकांना प्रशिक्षण देण्यात आले.लोकमाता देवी अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त गेल्या वर्षीपासून आतापर्यंत विविध ठिकाणी ४३९२ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमां मध्ये १ लाख ५१ हजार ५१९ नागरिकांनी सहभाग घेतला.मंदिर आणि नदी स्वच्छता, वृक्षारोपण, देवी अहिल्याबाईंच्या जीवनावर आधारित नाट्य-नृत्य सादरी करण,संशोधन प्रबंध सादरीकरण, वक्तृत्व, निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. महेश्वरमध्ये ‘शिवसंकल्प स्वरनाद’ हा विशेष भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या बैठकीत समितीचे विविध स्तरावरील अधिकारी उपस्थित आहेत. ही बैठक २० जुलै रोजी संपन्न होईल.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### आष्टीच्या राहुल तायडे हत्या प्रकरणाचा उलगडाः
# पायाने नाल्यात दाबून मित्रांनीच केली हत्या
## दोघे हैदराबादमधून ताब्यात, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात राहणाऱ्या राहुल तायडे यांच्या मृत्यूमागील रहस्याचा अखेर उलगडा झाला असून, हे प्रकरण अपघाताचे नसून थेट खूनाचे असल्याचे उघड झाले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या अमरावती युनिटने केवळ २४ तासांत दोघा आरोपींना हैदराबाद येथून अटक करून एक धक्कादायक कटाचा पर्दाफाश केला आहे. १६ जुलै रोजी बेनोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत वघाळ गावाजवळील नाल्यात एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला होता.





मृतदेहाची ओळख पटवताना, तो आयमा नगर, आष्टी येथील रहिवासी राहुल अशोकराव तायडे (वय ३९) असल्याचे स्पष्ट झाले. या आधी त्याच्या बेपत्ता होण्याची नोंद ११ जुलै रोजी आष्टी पोलिस ठाण्यात करण्यात आली होती.

तांत्रिक विश्लेषण, कॉल डिटेल्स आणि गुप्त माहितीच्या आधारे ☞(पान २ वर)

**नाल्यात फेकला मृतदेह-** दारूच्या नशेत तिघांमध्ये वाद झाला. यातच गौरवने राहुलच्या डोक्यावर पाय देऊन श्वासोच्छवास थांबवला आणि गोपालने त्याच्या पाठीवर पाय देत दडपले. मृत्यू झाल्यानंतर मृतदेह जवळच्या नाल्यात फेकून दिला. आरोपी मृतकाची दुचाकी व मोबाईल घेऊन पसार झाले होते. या प्रकरणात पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर अधीक्षक पंकज कुमावत, मोर्शी उपविभागीय अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरण वानखडे, पो.उ.नि. सागर हटवार यांच्या नेतृत्वात पथकाने कामगिरी बजावली. कारवाईत रविंद्र बावणे, बळवंत दाभणे, गजेंद्र ठाकरे, भुषण पेठे, पंकज फाटे, संजय प्रधान यांच्यासह सायबर युनिट व बेनोडा पोलीस ठाण्याचे योगदान राहिले. या प्रकरणी भा.दं.वि. कलम १०३(१), ३८५ अन्वये गुन्हा दाखल असून, पुढील तपास ठाणेदार विवेक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# गंभीर गुन्ह्यातील आरोपी पोलिसांच्या तावडीतून फरार
### -परतवाडा पोलिस स्टेशनकडून माहिती देणाऱ्यास ५० हजारांचे बक्षीस

**-विशेष पथके तैनात, परिसरात नाकाबंदी**

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा पोलिस स्टेशन अंतर्गत दाखल असलेल्या गुन्हा क्र. ४९१/२५, कलम १०९(१) भारतीय दंड संहिता (BNS) अंतर्गत अटक करण्यात आलेला आरोपी नामदेव बळीराम दहिकर हा पोलिसांच्या PCR (Police Custody Remand) कस्टडीमधून पळून गेल्याची गंभीर घटना घडली आहे. सदर आरोपीला धारणी रोडने तपासाच्या अनुषंगाने नेण्यात येत असताना, त्याने पोलिसांच्या ताब्यातून पळ काढत डोंगराळ भागात पलायन केले.

या प्रकारामुळे संपूर्ण पोलिस विभागात खळबळ उडाली असून आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष



पथके तैनात करण्यात आली आहेत. परिसरात नाकाबंदी करून डोंगर, जंगल व शेतशिवारात कसून तपास सुरू आहे. श्वानपथकाचीही मदत घेतली जात आहे.

परतवाडा पोलिस स्टेशनकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, सदर फरार आरोपीबद्दल कोणत्याही प्रकारची माहिती मिळाल्यास ती तात्काळ पोलिसांना कळवावी. आरोपीच्या अचूक ठिकाणाची माहिती देणाऱ्या व्यक्तीस ५०,०००/- रुपयांचे रोख बक्षीस देऊन गौरवण्यात येईल, असे अधिकृतरित्या जाहीर करण्यात आले आहे.

माहिती देण्यासाठी ९१५८९६६६७२, ९०२१७९४७३४, ९९२१५४५३०४, ९६७३२९१७८९, ९८३४५९५६५० या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा. पोलिसांनी नागरिकांना आश्वस्त केले आहे की माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल. परतवाडा पोलीसांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करत असून, लवकरच आरोपीला अटक करण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

### कृषी नगर सशस्त्र गँगवॉर प्रकरणः
# सात आरोपींना ठोकल्या बेड्या
## पोलिसांनी केला भाई दादांचा घटनास्थळी 'रोड शो'

**अकोला/प्रतिनिधीः-** गुरुवारी रात्री सिव्हिल लाईन पोलिस ठाणे हद्दीतील स्थानिक कृषी नगर येथे दोन गटात सशस्त्र गँगवॉर झाले होते. या प्रकरणी शुक्रवारी रात्री पोलिस प्रशासनाने अटकेतील भाई - दादांची घटनास्थळ परिसरात 'रोड शो' करीत चांगलीच फजिती केली. दरम्यान आता या प्रकरणी पोलिसांकडून आरोपींची धरपकड सुरू असून शुक्रवारी सायंकाळ पर्यंत सात आरोपींना बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, कृषी नगरातील दोन गटात



गुरुवारी रात्री सात वाजताच्या सुमारास तलवार, रॉड व बंदुकीचा वापर करून गँगवॉर झाले. या गँगवॉर मध्ये तब्बल आठ जण किरकोळ जखमी झाले होते. सदर प्रकरणी तत्काळ दोन आयपीएस अधिकारी, सिव्हिल लाईन पोलिस, गुन्हे शाखा, फॉरेन्सिक लॅब☞(पान २ वर)

**यांना करण्यात आली अटक -**

या गँगवॉर प्रकरणी अकोला पोलिस दलाने मोठ्या बंदोबस्तात शुक्रवारी रात्री अटक आरोपींची घटनास्थळी व रहिवासी दहशतीच्या परिसरात कृषी नगरात 'रोड शो' केला. यावेळी भाई दादांना संपूर्ण परिसरातील नागरिकांची माफी मागायला लावत यानंतर या परीसरात कोणीही अशा प्रकारचे गुन्हेगारी कृत्य करू नये अशी सक्त ताकीद देण्यात आली. अटक आरोपींमध्ये सतीश वानखडे, आकाश गवई, धम्मा वानखडे, शुभम हिवाळे, अंकुश क्षिरसागर, स्वप्नील बागडे, अनिकेत मल्हार, शंतनु तायडे, धम्मपाल तायडे, अनिकेत सावळे यांचा समावेश आहे. ☞(पान २ वर)

# क्रुझर-टाटा एसची धडक, ३ जखमी
## वडगाव फत्तेपूर जवळ अपघात

**परतवाडा/प्रतिनिधीः-** परतवाडा-अंजनगाव मार्गावर वडगाव फत्तेपूर जवळ चिखलदराकडे जाणाऱ्या मार्गावर टाटा एस आणि क्रुझर वाहन यांची जोरदार धडक झाली. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. ही अपघाताची घटना आज शुक्रवार १८ जुलै रोजी सकाळी समोर आली आहे. जखमींवर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे.

परतवाडा-अंजनगाव मार्गावर नेहमी अपघात होत





आहेत. आठवडाभर पूर्वी या मार्गावर युवा व्यापारी अग्रवाल यांचा अपघातात मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाच शुक्रवारी सकाळी वडगाव-फत्तेपूर मार्गावर टाटा एस आणि क्रुझर यांच्यात धडक झाली. अपघातात क्रुझरमध्ये बसलेले तीन लोकं गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. धडक☞(पान २ वर)

## सख्या भावाकडून मारहाण

**अमरावती :-** फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत बिच्छु टेकडी परिसरात दोन सख्या भावांचा वाद उफाळून आला. यावेळी एकाने दुस-याला काठीने माराहाण केली.

या घटनेची तक्रार शाम मारोतराव सहारे (रा. अमरावती) यांनी १७ जुलै रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी किशन मारोतराव सहारे याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# बनावट सोनं दाखवून मारहाण करत रक्कम हिसकावली
## -महिनाभर फरार आरोपी अखेर गजाआड -स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वस्तात सोनं मिळेल या आमिषात अडकवून फसवणूक करणाऱ्या टोळीचा आणखी एक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणातील तब्बल एक महिना फरार असलेले दोन आरोपी अखेर स्थानीक गुन्हे शाखेच्या जाळ्यात सापडले आहेत. फसवणुकीच्या या प्रकरणात तीन लाख रुपये जबरदस्तीने हिसकावल्याची घटना घडली होती. ही घटना १७ जून २०२५ रोजी घडली होती.

पोलिस सुत्रानुसार, पद्मिनी भरणे (वय ४५, रा. सारखनी,



ता. किनवट, जि. नांदेड) यांना दीपक पल्लाडे या इसमाने सोन्याच्या अधिक लाभाचे आमिष दाखवले. त्याच्या साथीदारांसह त्यांनी बनावट गिळ्या दाखवत मारहाण करून तीन लाख रुपये हिसकावले आणि चारचाकी गाडीतून पळ काढला. या प्रकरणात नांदगाव खंडेश्वर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला होता. दीपक उर्फ अश्विन पल्लाडे, शामराव राखडे आणि सचिन तोडसाम यांना अटक झाली होती. मात्र, या टोळीचे प्रमुख सूत्रधार लक्ष्मण देवीदास जाधव (रा. कारंजा, जि. वाशिम) व त्याचा सहकारी कैलास भाऊराव जाधव (रा. सावंगी, दारव्हा, यवतमाळ) हे फरार होते. १७ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेला माहिती मिळाली की लक्ष्मण जाधव आपल्या घरी आला आहे. पोउनि मुलचंद भांबुरकर यांच्या नेतृत्वाखाली तात्काळ छापा टाकण्यात☞(पान २ वर)

## ९५ हजाराचा मुद्देमाल लंपास

**अमरावतीः-** गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वलगाव रोड स्थित रजनी मंगल कार्यालयाजवळ १७ जुलै रोजी एक घरफोडीची घटना उघडकीस आली. चोराने एका घरातून ९५ हजाराचा मुद्देमाल लंपास केला आहे. या घटनेची तक्रार प्रकाश तुकाराम काळे (वय ६०, रा. अमरावती) यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# तपोवन परिसरात बिबट्याने केली पाळीव श्वानाची शिकार
### -नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** तपोवन परिसरात राहणारे तथा तपोवन संस्थेचे उपसचिव ऋषिकेश देशपांडे यांच्या घरात मध्यरात्री बिबट शिरला. बिबट्याने त्यांच्या घरातील पाळीव श्वानावर हल्ला करून त्याला फस्त केले.या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शुक्रवारी सकाळी जेव्हा कुटुंबीय जागे झाले तेव्हा त्यांना घरातील श्वान बांधलेल्या जागेवर दिसून आला नाही. त्याची चेन तिथेस पडलेली होती. यामुळे श्वानाची शोधा शोध सुरू झाली. कुटुंबीय जेव्हा त्याला शोधत होते तेव्हा त्यांच्या घरातील मागील झुडूपामध्ये विक्षिप्त अवस्थे मध्ये तो दिसला. या परिसरात बिबटयाच्या पायांचे ठसे आणि कुत्र्याला ओढून आणण्याचे☞(पान २ वर)



# पदोन्नती झालेल्या शिक्षक बंधू-भगिनींना वेतनवाढ द्या
### महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** ज्या शिक्षक बंधू भगिनींची पदोन्नती झाली आहे, त्यांच्या कामात जर पदोन्नती मुळे बदल होत असेल,तर त्यांना अतिरिक्त वेतनवाढ देण्याच्या मागणीचे निवेदन आज दि.१८जुलैला महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखा अमरावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुगल यांना दिले.

निवेदन देतेवेळी अजयानंद पवार (जिल्हाध्यक्ष),शैलेंद्र स.दहातोंडे (जिल्हा सरचिटणीस) व अनिल जगनाडे उपस्थित होते.



एका पदावरुन दुसऱ्या नविन पदावर नियुक्ती झाल्यावर जेंव्हा दुसऱ्या पदावरील कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पहिल्या पदापेक्षा अधिक नसतात, तेंव्हा मनासे (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११(२) वेतन निश्चिती करण्यात यावी असे नमुद केले आहे. सदर नियमांचा अवलंब हा चट्टोपाध्याय आयोगानुसार शिक्षकांना १२ वर्षानंतर ☞(पान २ वर)

# देशी पिस्तुल व जिवंत काडतुसांसह दोघे गजाआड
### -शहरात दहशत निर्माण करण्याचा कट उधळला
### -गाडगेनगर पोलिसांची मध्यरात्री कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** देशी बनावटीचे पिस्तुल व दोन जिवंत काडतुसे घेऊन शहरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना गाडगेनगर पोलिसांच्या डी.बी. पथकाने मध्यरात्रीच्या कारवाईत अटक केली आहे. या टोळीच्या अटकेमुळे शहरात अवैध शस्त्रांच्या वापराचा आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

१५ जुलै रोजी रात्री १०.४५ वाजता टिपू सुलतान मार्केट परिसरात एका तरुणाने किरकोळ कारणावरून देशी बनावटीचे पिस्तुल दाखवत नागरिकांना धमकावल्याची माहिती डी.बी. पथकाला मिळाली. यानंतर पोलीस पथक सतर्क झाले आणि त्या परिसरात गस्त वाढवण्यात आली. मध्यरात्री १२.४० वाजता संबंधित तरुण त्याच्या मित्रासह मार्केटच्या मागील बाजूस बसलेला असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी तत्काळ छापा टाकत मोहम्मद अनस मोहम्मद शकील (वय २०, रा. यास्मीननगर) याला अटक केली. त्याच्याकडून एक देशी ☞(पान २ वर)

# झेडपी साऊर सर्कल झाले खोलापूर पंचायत समितीच्या दोन गणाचे देखील नाव बदलले

**टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-** भातकुली तालुक्यात जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांच्या पुनर्रचनेची अधिसूचना निवडणूक विभागाच्या वतीने नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये गट आणि गण कायम ठेवण्यात आले असले तरी त्यांची नावे आणि सीमा मोठ्या प्रमाणात बदलण्यात आल्या आहेत.

नवीन रचनेनुसार झेडपी गट 'साऊर सर्कल' चे नाव बदलून खोलापूर सर्कल झालेले आहे तसेच यापूर्वी असलेले निंबा आणि पूर्णा नगर पंचायत समिती सर्कलचे नाव बदलून वाठोळा शुक्लेश्वर आणि हातुर्णा पंचायत समिती गण झालेले आहे. पूर्वी साऊर, आसरा आणि खोलापूर हे झेडपी गट होते. मात्र,

### भातकुली तालुक्यात जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गण पुनर्रचना

**ग्रामपंचायत व गावांचा तपशीलः**

खारतळेगांव जीप सर्कलमध्ये–१५ ग्रामपंचायती व ४१ गावे
खोलापूर सर्कलमध्ये – १३ ग्रामपंचायती, ३५ गावे
आसरा सर्कलमध्ये – २० ग्रामपंचायती व ५५ गावे

या नव्या रचनेविरोधात २१ जुलै २०२५ पर्यंत आक्षेप सादर करता येणार आहेत. इच्छुक नागरिकांनी व प्रतिनिधींनी आपले आक्षेप लेखी स्वरूपात दिलेल्या वेळेत संबंधित विभागास सादर करावेत,असे आवाहन करण्यात आले.

आता साऊर चे नाव बदलून खोलापुर या नावाने नविन गट तयार करण्यात आला आहे. या नव्या रचनेनुसार, साऊर, खारतळेगांव, वाठोडा शुक्लेश्वर, खोलापूर, आसरा आणि हातूर्णा या पंचायत समितीच्या गणाचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये निंबा आणि पूर्णा नगर या गावांऐवजी वाठोडा शुक्लेश्वर व हातूर्णा यांचा समावेश करून नवे गण तयार करण्यात आले आहेत.

## भाईगिरीतून तरुणावर चाकूहल्ला

**अमरावती :-** भाईगिरीतून एका तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पंचशिलनगरात उघडकीस आली.

पंकज रविंद्र रॉय (रा. अमरावती) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी कपील राजु पांडे (रा. अमरावती) याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

## जिल्ह्यात कलम ३८ लागू

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३८ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यात लागू करण्यात आला असून दि. १५ जुलै ते ३१ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत हा आदेश लागू राहील.

या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक, विशाल आनंद यांनी एका आदेशान्वेय जाहीर केले आहे.

# २७ वर्षीय युवकाने केला ४२ वर्षीय महिलेचा विनयभंग
### -चिपर्डा येथील घटना

**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील चिपर्डा येथे २७ वर्षीय युवकाने ४२ वर्षीय महिलेचा घरात घुसून विनयभंग केल्याची घटना बुधवारी (दि. १६) रात्री अकरा वाजताच्या सुमारास घडली.

रोशन बाळू सावरकर (वय २७) असे आरोपीचे नाव आहे. महिलेच्या पतीचे निधन झाले असून तिला एक मुलगी आहे. मुलगी अमरावती शिक्षण घेत आहे. सदर महिला घरी एकटीच राहते. घटनेच्या दिवशी आरोपी हा महिलेच्या घरी मागच्या दाराची कडी तोडून आत आला व विनयभंग करुन महिलेला मारण्याची धमकी दिली.

सदर घटनेची तक्रार महिलेने १७ जून रोजी खल्लार पोलिस स्टेशनला दिली. त्या तक्रारीवरुन खल्लार पोलिसांनी आरोपी रोशन सावरकर विरुध्द कलम ७४,३२९(४)बिएसएन नुसार गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक केली. घटनेचा पुढील तपास ठाणेदार रविंद्र बारड यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ किशोर घुगे करित आहे.

# महापलिकेची दक्षिण झोनमध्ये अतिक्रमणावर धडक कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका दक्षिण झोन क्रमांक ४ अंतर्गत नवाथे प्लॉटपासून ते बेनाम चौक, डी मार्ट परिसर, साईनगर, गोपाल नगर, रेल्वे क्रॉसिंग तसेच साई मंदिर अकोली या परिसरात अतिक्रमणांवर मनपाने धडक मोहीम राबवली.

रस्त्यांवर अनधिकृतपणे उभ्या करण्यात आलेल्या हातगाड्या, चायनीज गाड्या व इतर खाद्य विक्रेत्यांच्या गाड्या मनपाच्या अतिक्रमण पथकाने जप्त केल्या. यासोबतच काही दुकानदारांनी दुकान हद्दीबाहेर वाढवलेले पत्र्याचे शेड आणि लोखंडी बांधकामही हटवण्यात



आले.

या कारवाईमुळे स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. रहदारीला अडथळा निर्माण करणाऱ्या अतिक्रमणामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली होती.☞(पान २ वर)

## निर्मलाबाई गावंडे यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद माजी प्राचार्य डॉ.एकनाथराव गावंडे यांच्या पत्नी निर्मलाबाई गावंडे यांचे आज १८ जुलै रोजी सकाळी तीन वाजता दीर्घ आजाराने निधन झाले.मृत्यू समयी त्यांचे वय ७४ वर्षे इतके होते.



हिंदू स्मशानभूमी मध्ये निर्मलाबाई यांच्यावर आज अंतिम संस्कार पार पडले. यावेळी पंचक्रोशीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात मुलगा प्रा.डॉ.अमित,सुमित,मुलगी डॉ.वर्षा गावंडे, सूना, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.त्या कल्याणी नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालिका तसेच विदर्भ शिक्षण संस्था अचलपूर कॅम्प येथेही कार्यकारणी सदस्य म्हणून कार्यरत होत्या.